साप्ताहिक

# माणूस

१७ सप्टेंबर/८३/दोन रुपये

# इंदिरा गांधींना पर्याय?




## स्वप्नांचे अर्थ आणि परामानसशास्त्र



## लेबलांच्या पलिकडचे 'आजचे कवी'

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : तेविसावे

अंक : सोळावा

१७ सप्टेंबर १९८३

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ

संजय पवार

## सप्रेम नमस्कार..

माणूस (२७ ऑगस्ट) मध्ये 'कामाठीपुऱ्यातील कीड' या लेखात वेश्याव्यवसायाविषयी ललिता बर्वे ह्यांनी मांडलेल्या समस्येविषयी काही विचार–

'माणसं भुकेनं मरतात, तहानेनं मरतात, श्रमानं मरतात; पण लैंगिक इच्छांपायी कोणी मेल्याचं काही ऐकिवात नाही. म्हणजे जी गरज एवढी अपरिहार्य नाही त्यासाठी 'कुणाचा तरी बळी' असे लेखिका म्हणते हे विधान एका अर्थाने अशास्त्रीय आहेच; पण एकांगीही आहे. लैंगिक भुकेपायी कोणी मरत नसेल; पण त्यापायी मनुष्याच्या व विशेषत: पुरुषाच्या मनात ज्या विकृती वा समाजविघातक विचार निर्माण होतात व त्याचा जो स्फोट होतो तो भयंकर आहे! मुंबई-कलकत्ता-दिल्ली यांसारख्या शहरांतील एकूण गुन्हेगारीच्या मागे या लैंगिक अतृप्तीचा केवढा ज्वालामुखी आहे याची कल्पनाच करता येणार नाही. लग्न-संसार करण्याची संधी मिळालेल्या पुरुषाला त्याची लैंगिक भूक पूर्ण करण्याचा एक सर्वसंमत मार्ग असतो तरीही त्याच्या मनात प्रसंगोपात असे विकल्प येतातच आणि याचे मूळ पुरुष-प्रकृतीत आहे. पुरुष हा स्त्रीसंबंधाबाबत वरवरच्या वृत्तीचा आहे. क्षणिक अभिव्यक्ती तृप्ती त्याला पुरते. याउलट स्त्री ही याबाबत सखोल वृत्तीची आहे. त्यामुळे ती ह्यासंबंधात जास्त मन:पूर्वक वागते. तिच्या एकनिष्ठ वृत्तीचे मूळ अन्य गोष्टींपेक्षा या तिच्या प्रकृतिवैशिष्ट्यात आहे. ही निसर्गदत्त वस्तुस्थिती आहे व तिला दुर्लक्षून किंवा टाळून किंवा तिच्यावर राग करून या समस्येचा विचार करता येणार नाही.

२९ ऑगस्ट ८३ — सुहास बापट, ठाणे

आपली 'इस्लामिक बॉंब' ही लेखमाला संपली आणि आज मानवजातीवर कोसळणाऱ्या नजीकच्या संकटाची चाहूल लागल्यामुळे विचारी मन अस्वस्थ झाले; पण उपाय काय? ही लेखमाला वाचीत असतानाच मी चर्चिल-रूझवेल्ट यांची चरित्रे वाचत होतो. त्यांतील चर्चिलबद्दल मला सांगावेसे वाटते की–

१ मार्च १९६५ या दिवशी इंग्लंडने हायड्रोजन-बॉंब बनवायला सुरुवात केली आणि चर्चिल यांच्यातला तत्त्वज्ञ जागा झाला! ते म्हणाले, 'आपण काय करायला हवे? कुठल्या दिशेने आपण वळलो तर आपले जीवन आणि जगाचे भवितव्य सुरक्षित होईल? वृद्धांच्या दृष्टीने या गोष्टी महत्त्वाच्या नाहीत. ते लवकरच जगाचा निरोप घेतील; परंतु आज जी छोटी मुले खेळात दंग आहेत, जे तरुण आज कार्यमग्न आहेत त्यांच्याकडे पाहता पोटात गलबलते. जर परमेश्वराला या मानवाचा कंटाळाच आला तर उपलब्ध अण्वस्त्रे लक्षात घेता यांच्या पुढे काय वाढले आहे?'

आपल्या लेखमालेने या गंभीर प्रश्नाचे उत्तर दिले आहे. आज या लेखमालेने जवळजवळ दाखवून दिले आहे की, सर्व राष्ट्रे अण्वस्त्र–सज्जच आहेत. कोणीही या जगाचा जाणूनबुजून किंवा अजाणता, निष्काळजीपणानेसुद्धा विनाशकाल आणू शकेल. आपल्या भारतीय राजकारणावरही असा प्रकाश पडतो की, आपल्याकडे आपापसातील मतभेद कोणीही विसरत नाही आणि भिकार बुद्धिमत्तेची लक्तरे मात्र चव्हाट्यावर आणतात!

'आपली मुलं' ही शिक्षणमालाही अनेक दृष्टींनी उपयुक्त आहे हे मी गेल्या ५० वर्षांच्या शैक्षणिक अनुभवावरूनच लिहीत आहे. आज बिचाऱ्या शालेय मुलांकडे कोणीही लक्ष देत नाही. अनेक पालकांना असे वाटते की, मुलांना शिकविणे आपले काम नाही. खासगी शिक्षक पैशाच्या जोरावर मुलास शिकविण्यास ठेवले की झाले आपले काम! व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण याने चित्राद्वारे फार मार्मिक टीका केली होती. पुस्तकांच्या-वह्यांच्या भाराने ही मुले वजन उचलण्यास शिकतील; गणित नाही. हल्ली या मुलांच्या भवितव्याने माझे मन अत्यंत त्रस्त होऊ लागले आहे.

शाळेत शिक्षण बहुसंख्येने (विद्यार्थ्यांच्या) होतच नाही. शिक्षित पालकांना त्यांच्या व्यवसायमग्नतेमुळे त्यांच्याकडे लक्ष देता येत नाही. लेखिका शोभा भागवत यांचे विचार पटतील, पण केव्हा? स्वत: पालक थोडा तरी वेळ मुलांना प्रेमाने शिकवतील तेव्हा 'छडी लागे छमछम विद्या येई घमघम' हे दिवस संपले!

५ सप्टेंबर ८३ — के. जी. कुलकर्णी, मुंबई

पुणे वार्ता

# दिवस गणपतीचे

सणासुदीचे दिवस कसे हळूहळू उलगडत जातात. नको त्या पाहुण्यासारखे अचानक येऊन टपकत नाहीत. आधी निसर्गाचा उत्सव सुरू होतो, मग माणसांचा! बालकवींच्या कवितेतला श्रावण रिमझिमत असतो आणि मनात भाद्रपदाच्या आठवणी साचायला लागतात. लक्षात येतं, अरेच्चा! गणपती आलेच की! इकडे तिकडे नजर टाकली की जो तो त्याच तयारीत गुंतलेला.

संध्याकाळच्या दिव्यांच्या लखलखाटात दुकानातल्या गणपतींच्या आराशी– चार हात बांधलेला, चारी हात सोडलेला, कधी हातात मोदक, पायाशी त्याचं लाडकं वाहन, कमळातला, मोरावरचा, नाचणारा, खेळणारा. कलेचे ठरीव, ठाशीव तरीही विविध आविष्कार. रंगसुद्धा किती वेगवेगळे, सुखवणारे. गणपतीची आपल्याला हवी ती मूर्ती निवडण्यात वेळ किती छान जातो. बुकिंग आधी झालेलं असलं की, मग साहेबांच्या घरी येण्याची तयारी करायला लागायचं.

गणपती बसायच्या आधी दोन दिवस ज्या माणसानं मंडईजवळच्या तुळशीबागेत चक्कर टाकलेली नाही, त्या माणसाला आपण तरी शंभरपैकी शंभर मार्क कधी देणार नाही. भरलेले रस्ते, दुतर्फा या विशेषणाला वेढून टाकणारी गर्दी, रंगलेली दुकानं आणि प्रत्येक दुकानाभोवती उत्साही प्रसन्न गर्दीची रांगोळी.

चकचकीत चांदीचे हार, तोरणं, माळा, चक्र, जीगचे, कलाबुतीचे हार, गणपतीच्या गळयात घालायच्या माळा, देवघराला लावायला तोरणं, रंगीबेरंगी, सोनेरी–चंदेरी कागद, थर्माकोलच्या कमानी, त्याला लावायचे चकचकीत बल्ब, दिव्यांच्या माळा– काय घेऊ, काय नको असं होईपर्यंत नुसतं बघत रहायचं आणि मग आपल्या घराचा, देवघराचा अंदाज घेऊन यातल्या काही तरी छान छान वस्तू घेऊन जायच्या. हरतालिकेचं जाग्रण असं आरास करण्यात घालवायचं.

मस्तपैकी कमानी कापायच्या, त्याला छान जांभळया कागदाचे नाचणारे मोर चिकटवायचे, पिसाऱ्यावर चंदेरी कागदाच्या शंकरपाळया लटकवून द्यायच्या. चकचकीत रंगीबेरंगी तोरणं उभी–आडवी लावून द्यायची की झाली घरच्या घरी मस्त आरास.

सकाळी सकाळी गणपती बसतात. त्या आधी पूजेची तयारी. पहाटे पहाटे उठून प्राजक्ताची रास जमवून ठेवायची. त्याच्या माळा करायच्या, कुठून कुठून दूर्वा तोडून आणायच्या. शमी, केवडा, कमळ, सगळं आहे की नाही पुन्हा पुन्हा पहायचं येवढं होईपर्यंत गुरुजी येतातच. मग साग्रसंगीत पूजा. त्या आधी आराशीचं कौतुक झालं की, कालचे श्रम वसूल. पूजा चालूच असते. गरम पाण्यानं आंघोळ. पुन्हा शुद्ध पाण्यानं आंघोळ. मग सुवासिक अत्तर, अष्टगंध,हळद-कुंकू,फूल, केवडा, कमळ,पंचामृत-हातात मोदक.लंबोदर मंगलमूर्तीला मनापासून नटवण्यात गुरुजी बराच वेळ घालवतात.मग टाळयांचं बॅगराउंड म्युझिक, निरांजन–समईचे लाइट इफेक्टस् (दिव्यांच्या माळा आहेतच) आणि मग या उत्सवमूर्तीचं गुणगान– रस्त्यावर लता मंगेशकर आणि घरात आपण– जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती–एकापाठोपाठ एक दणादण आरत्या. 'घालीन लोटांगण' च्या वेळेला टाळयांची द्रुत लय संपली, डोक्यावर फुलं पडली की मखरातली मूर्ती चक्क खुसूखुसू हसतेय असं वाटतं. एवढे साग्र-संगीत लाड करून घेतल्यावर नंतर पाठोपाठ येणाऱ्या गौरीपण अशाच गालातल्या गालात हसतात ते लगेच डोळयांसमोर येतं.

घरातल्या आणि शेजारपाजारच्या सोसायटीच्या, वाडयाच्या सार्वजनिक गणपतीच्या आरतीची वेळ लक्षात ठेवून कधी हिंडायला बाहेर पडायचं, तर कधी खटाखट तुटणारी फिल्म दाटीवाटीनं बघत, गप्पा मारत वेळ काढायचा. १२–१२॥ ला सिनेमा संपला की चांगला ग्रुप जमवून गणपती बघायला बाहेर पडायचं. चालताना हातात वाजणारं पिटपिटं, ३।४ वाजेपर्यंत जागायची तयारी आणि बरोबर गप्पा मारणाऱ्या मित्र-मैत्रिणी असल्या की गणपतींची सजावटसुद्धा किती छान खुलून दिसते. सजावट मात्र कोणतीही– प्रसिद्ध मंदिरं, ऐतिहासिक–पौराणिक प्रसंगापासून थेट सामाजिक संदर्भापर्यंत. म्हणजे आणीबाणीतली एकजूट किंवा काही राजकीय विडंबनापर्यंत! त्यातसुद्धा एक खास 'प्रायोगिक' लाट येऊन मिसळलीच आहे.

मग गाण्याच्या तालावर उघडझाप करणारे विजेचे दिवे थोडयाफार फरकाने सगळीकडेच; पण प्रत्येकाचा ताल वेगवेगळा! भीमसेन जोशींच्या अभंगवाणीपासून 'प्यार की हथकडी' च्या डिस्को म्यूझिकवर हे विजेचे दिवे लवलवत असतात. दोन्हीचं सौंदर्य सारखंच!

८।१० दिवस आरत्या म्हणून म्हणून किंवा तुम्ही स्वखुषीनं कॉलनीच्या उत्सवात स्वयंसेवक वगैरे झाला असलात, तर चिटयापिटया पोरांवर ओरडून आवाज छान बसला की, या गणपतीबुवांना परत जिथल्या तिथे पोचवायची वेळ आली हे जाणवायला लागतं. बाहेरच्या सजावटी शेवटच्या जोमानं पुन्हा लखलखू लागतात. रस्ते वाहायला लागतात, रात्री खडखडून जाग्या होतात आणि दिवस पेंगायला लागतात!

गौरी थाटामाटात येऊन बसलेल्या असतात. गौरींच्या पावलांची घरभर रांगोळी अजून पुसलेली नसते तोवर माहेरवाशीण जेवून घरी जायच्याही लगबगीला लागते. गणपती काहींचे गौरीबरोबर–काहींचे नंतर जाणार असतात.


मग पुन्हा एकदा छानपैकी नटवून पूजा आणि विसर्जनाची तयारी. गणपती मंद, शांत हसत असतो – आशीर्वाद दिल्यासारखा. मूर्ती हलवून जागेवर ठेवली की, का कुणास ठाऊक हा घरातला लाडका पाहुणा जाणार म्हणून गलबलून येतं. मग नाजूक–हलक्या हाताने मूर्ती तबकात. छानपैकी रेशमी वस्त्राने आच्छादलेली. मग अनवाणी पायांनी परतीचा प्रवास सुरू. रस्त्याने असे अनेक पाहुणे परतताना दिसतात. त्यांनी दिलेल्या आरोळया– 'गणपतीबाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या.' अशा आरोळया द्यायला ओळखी–पाळखी लागत नाहीत. तो येण्याचा आनंद आणि जाण्याची हुरहूर सगळयांना सारखीच वेढून टाकते.

गणपती पाण्यात एकवीस वेळा बुडवून बाविसाव्या वेळेला त्याचा प्रवास सुरू झालेला असतो. निर्माल्य पाण्याबरोबर हेलकावे घेत बाजूला पसरत असतं.

गणपती पोचवून घरी आले की आवडता पाहुणा बरेच दिवस घरी राहून गेल्यावर जस मोकळं मोकळं–सैरभैर वाटतं तसंच काहीसं वाटतं.

२–४ दिवसांनी गणपती गेल्याची सवय होते. तोवर दसरा–दिवाळीचे वेध लागलेले असतात!

–मेधा राजहंस




## फेस्टिवलचा दणका !

मंडळी, सणासुदीचे दिवस आले बरं. आता देवदिवाळीपर्यंत अगदी विचारू नका. शिमगाच शिमगा. चराचरात कसा अगदी आनंद भरून राहील. जल्लोष, मिरवणुका, ऑर्केस्ट्रा, पार्ट्या, सिनेमे अन सरतेशेवटी सोडा-वॉटरच्या बाटल्या घेऊन दणकेबाज राडा ... बरं, काही बोलण्याची सोयही नाही. बोलणं सायीचं नाहीच. कारण धार्मिक भावना दुखावतील. तेव्हा, 'कबीरा खडा बजारमें'... असं मनात म्हणत देखावे बघण्याशिवाय दुसरं काय करणार ?

परवा मुंबईत गोविंदा एकदम फॉर्मात झाला. दादर-लालबाग भागात एका टोळीने सतत 'एक दोन तीन चार, वसंतदादांची पोरे हुशार' असा सूर लावला. त्याला लगेच उत्तर म्हणून 'तुझ्या घरात नाही पाणी, घागर रिकामी ग शालिनीताई' असा खडा पुकारा झाला. खरं-खोटं राम जाणे. (आता जेव्हा सौ. शालिनीताई पाटील सौ. इंद्रायणी सावकारांना खरं काय झालं ते सांगतील अन् जेव्हा 'लोकसत्तेत' ते इत्थंभूत छापून येईल तेव्हाच आम्हाला नक्की काय झालं ते समजेल.)

ते काहीही असलं तरीही असीरचचांची हुंडी बरोबर नेम साधून फोडल्यापास्नं दादा मजेत दिसताहेत. हा दहीकाला किती दिवस टिकणार हे भवानीसच ठावे. तिथे रामराव आदिकांकडे अद्याप शितलासप्तमीच सुरू आहे याचं आम्हालाही दुःख वाटतंय.

रक्षाबंधनाचा उत्सव बाबासाहेब भोसल्यांच्या 'सारंग' या निवासस्थानी पार पडला म्हणतात. तिसऱ्या शक्तीच्या अध्वर्यू प्रेमलाकाकी चव्हाण यांनी याप्रसंगी बाबूराव भाव्यांना आणि माणिकराव भांबल्यांना राखी बांधली आणि निष्ठावान गटाचं रक्षण करण्याची विनवणी केली. नंतर केसरीभाताचं जेवण होतं. (तूप वाढायला त्र्यं. गो. देशमुख होते तर !) जेवल्यावर बाबूराव तडक टाक-कागद-दौत घेऊन दिल्लीला गेले आणि कांबळ्यांना राजीनामा देऊन परतले. भोसल्यांना प्रेमलाकाकींनी राखी बांधली की नाही हे अद्याप कळलं नाहीये; परंतु बाबासाहेब भोसले-अंतुले भावले वगैरे हल्ली एकमेकांना राख्या बांधताहेत असा बोलबाला आहे. तिरपुड्यांना राखी बांधावी की नाही आणि कोणी बांधावी याचा घोळ अद्याप चालू आहे.

तिकडे शरद पवार राज्यभर प्रदक्षिणा घालताहेत. खरं तर त्यांनी नुस्ता दिल्लीच्या जगन्मातेभवती पिंगा घातला तरी पुरे; पण त्यांनी काही म्हाताऱ्या खवीसांना घेऊन द्युताचा खेळ सुरू केला आहे. चालायचंच. पवार तरुण आहेत. अन् सोनेरी पहाट उगवायला अजून अवकाश आहे. तोवर द्युताचा खेळ चालू द्या.

तर असे हे सण. खरं तर हे आमोदप्रमोदाचे, मनोमीलनाचे दिवस. त्यात काँग्रेस (आय) वाले कार्यकारिणीवरून भांडताहेत. एकदा का कार्यकारिणी घोषित झाली की आयमायवरून भांडणं जुंपलीच म्हणून समजा. काहींची सर्वपित्री अमावस्या सुरू होईल तर काहींची नवरात्र. सण संपत नाहीतच. ! 

गेल्या बुधवारी मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर, लीला अल्वारीस प्रभृती मंडळींनी जेव्हा मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावर महागाई-विरोधी आरत्या गायला सुरुवात केली तेव्हाच जाणीव झाली की, सणासुदीचे दिवस आले. काहीही म्हणा, महागडं तेल, तुटपुंजी साखर आणि मैद्या-रव्यासाठी रांगा याशिवाय फेस्टिवलचा मजा येतच नाही.

## लिहिण्याजोगी बातमी

रामन राघवने १९६८ मध्ये ज्याप्रकारे पंधरा खून पाडले तशाच स्टाइलमध्ये गेल्या काही दिवसात मुंबापुरीत सहा खून पडले आहेत. यामुळे शहरात दहशतीचे वातावरण पसरले आहे असे वृत्तपत्रांचे आणि ते वाचणाऱ्या लोकांचे ठाम मत बनले आहे.

हे सत्र सुरू होण्याआधी मुंबापुरीत लिहिण्याजोगं काही घडत नव्हते. त्यामुळे पत्रकारांची फारच पंचाईत झाली. पाने भरता भरता मारामार. गेले काही महिने पंजाब आणि आसाम पहिल्या पानासाठी पुरेसा मजकूर पुरवीत असत; पण आता त्यांची कृत्येही 'रोज-मरे-त्याला-कोण-रडे' ह्या तत्त्वावर चौथ्या आणि पाचव्या पानावर जाऊन बसायला लागली आहेत. खुद्द मुंबापुरीतच महानगरपालिका, सेंट्रल रेल्वे, वेस्ट आणि बाँबे टेलिफोन्स अशा संस्था असताना त्यांनीही पहिल्या पानावर येण्याजोगे एकही दुष्कृत्य करू नये ही मोठी नामुष्कीची गोष्ट होती. असो.

या माथेफिरू खुनी माणसाने सायन किंग्ज सर्कल भागात एकूण सहा खून पाडले आहेत आणि हे सारे खून बाबुराव अर्नाळकरांनाही लाजवतील इतक्या रहस्यमय पद्धतीने झाले आहेत. (टीप : मराठीत रहस्यकथांचा पहिला खून बाबुराव अर्नाळकरांनी केला.) खून झालेले सर्व पुरुष आहेत. हे सारे लोक फुटपाथवर राहणाऱ्यांपैकी आहेत आणि त्यांच्या सर्वांच्या प्रेतांजवळ पोलिसांना खुनी माणसाने एक धोंडा ठेवलेला आढळला. यामुळे मुंबापुरीत पुरुषांना रात्री-अपरात्री मोकळेपणे फिरणेही आता अशक्य झाले आहे.

वृत्तपत्रांची तर, ह्या खुन्याचे नेमके वर्णन देण्याची चढाओढ लागली आहे. आतापर्यंतच्या वर्णनानुसार हा माणूस सहा फूट उंच असून त्याचा रंग काळा आहे. डोळे लालभडक आहेत. त्याने केस वाढविलेले असून तो नग्नावस्थेत फिरतो आणि मध्यरात्रीच्या सुमारास आपल्या सावजावर हल्ला चढवितो. हे वर्णन ऐकून रात्री साडेआठपर्यंत आमच्या डोळ्याला डोळा लागला नाही.

या खुनांमुळे पोलिसांनी मात्र शहरात सर्वत्र पहारा वाढविला आहे. आजकाल सर्व रेल्वे–स्थानकांवर आणि उपनगरात नेमाने गस्त घातली जाते. प्लॅटफॉर्मवर आणि फुटपाथवर झोपणारांना पोलीस वेळी–अवेळी दंडुक्याने उठवतात; परंतु अजूनही हा खुनी पोलिसांच्या हाती लागलेला नाही.

या खुन्याबद्दल वेगवेगळे तर्ककुतर्क मात्र लढविले जात आहेत. हा मनुष्य स्प्लिट पर्सनॅलिटीचा असल्यापासून ते पोलीस कमिशनर रिबेरो ह्यांना बदनाम करण्याचा हा डाव आहे, येथवर सारे तर्क लढविले गेले आहेत. ह्या खुनी माणसाने केवळ फूटपाथवरील माणसांवरच हल्ला केलेला असल्याने तो म्युनिसिपल कमिशनर द. म. सुखटणकरांच्या गोटातील असून, पी. यू. सी. एल. आणि ओल्गा टेलीस ह्यांच्या विरोधातील असावा असे आमचे ठाम मत आहे.

## आणखी थोडी माहिती

याच सदरात मागे आम्ही जगजीवनराम काँग्रेसच्या मुंबईतील यूथ विंगच्या उद्घाटनाबद्दल लिहिले होते राजा सिंग नावाच्या एका बिल्डिंग-कांट्रॅक्टर (?) ला या विंगचा प्रेसिडेंट नेमण्यात आले होते आणि प्रसिद्धीसाठी पत्रकारांना प्रत्येकी पन्नास रुपये देण्यात आले होते याबद्दलही आम्ही तुम्हाला सांगितले होते.

या राजा सिंगबद्दल आम्हाला नवी मिळालेली माहिती अशी की, त्यांनी गेल्याच वर्षी शेकडो लोकांना गल्फमध्ये नोकरी देतो असे आमिष दाखवून लाखो रुपये गडप केले होते. याच आरोपाखाली त्यांना त्यांच्या साथीदारांसह गेल्या वर्षी जुलै १८ ला पोलिसांनी अटक केली होती आणि अजूनही त्यांच्यावर कोर्टात केस चालू आहे.

'प्रत्येक कुटुंबातील एका तरी व्यक्तीस नोकरी' (A job in each family) ही ह्या पक्षाची घोषणा जगजीवनराम ह्यांचे सेक्रेटरी सिन्हा ह्यांनी पत्रकारांना अँबॅसिडॉरमध्ये दिलेल्या पार्टीत केलेलीच होती. तिच्या अंमलबजावणीसाठी राजा सिंगसारख्या अनुभवी माणसाची गरज आहेच!

—विष्णू जयदेव

# ललित मुंबई

# झगझगीत मुखवट्यापलीकडे

वर-वर पाहिलं तर तीही माणसंच दिसतात. थेट तुमच्या–आमच्यासारखी. हाडा–मांसाची; मानवी रक्त नसांमधून वाहणारी; पण हा केवळ भ्रम झाला.

अधिक निकट आलात की कळेल की ही जिवंत माणसं नव्हेत. या तर आहेत केवळ प्रतिमा. पडद्यावरच्या! प्रत्यक्ष जगण्याचा भरीवपणा नसलेल्या. केवळ सुबक दर्शनी भाग असणाऱ्या प्रतिमा. इथे राहूनही इथे न जगणाऱ्या.

फार काय माणसंही त्यांना माणूस समजत नाहीत, ती त्यांना देव समजतात. या जमिनीपासून वर असणारे देव. आनंदाच्या नव्या मंदिरातले देव. माणूसपणाचा आभास आणणारे, पण प्रत्यक्षात तो माणूसपणा हरवून बसलेले देव. हे नवे देव आहेत चित्रपट नट–नटचा. फार काय चित्रपटनिर्माते, वितरक यासारखेही जे कोणी या क्षेत्राशी संबंधित आहेत, त्या सर्वांनाच हा देवपणाचा परीसस्पर्श करून ठेवला आहे माणसांनी.

भारतीय चित्रपटसृष्टी आणि त्यातही हिंदी चित्रपट हा एक सतत विचारमंथनात घुसळला जाणारा, वादग्रस्त ठरणारा विषय आहे. त्याची लोकप्रियता, अपरिहार्यता, समाजावरची त्याची परिणामकारकता आणि त्याचा भिकार दर्जा, चांगली आणि वाईट मूल्यं सरसकट भडकपणे मांडण्याचे त्याचे मार्ग आणि त्यामागची एकूण गल्लाभरू वृत्ती हे सारं पुन्हा–पुन्हा चर्चिलं जातं.

भारतीय चित्रपटांवर एक जबरदस्त, भेदक आणि अंतरंगापर्यंत पोचणारा क्ष-किरण टाकला आहे डॉ. गिझेला ऐक आणि डॉ. प्रोडोप ऐक या जर्मन पती–पत्नींनी. भारतीय चित्रपटाबाबत त्यांनी एक चित्रपट बनवला आहे. 'न्यू टेंपल ऑफ हॅपीनेस' या शीर्षकाच्या या चित्रपटात सिनेनट, निर्माता, दिग्दर्शक, वितरक इथपासून सिनेमाच्या तिकिटांचा काळा बाजार करणारे, मंत्र्यांपासून सामान्य प्रेक्षकांपर्यंत अनेक जणांच्या मुलाखती आहेत. चित्रपटसृष्टीशी संबंधित जवळजवळ सर्व मुद्द्यांना त्यामध्ये स्पर्श झाला आहे. या मुलाखतींचे तुकडे, काही यशस्वी हिंदी चित्रपटांतले तुकडे या साऱ्यांची अशी काही सुंदर मांडणी इथे आहे की, कुठल्याही ढळढळीत टीका-टिप्पणीविनाही चित्रपट सांगायचं ते सांगून जातो.

निवेदक सांगतो, भारतामध्ये सर्वाधिक चित्रपट बनतात. १९७८,७९, ८० या सालांतले चित्रपटांचे आकडे पाहिले तर प्रत्येक वर्षी त्यांच्यामध्ये प्रचंड वाढ होते आहे आणि हे सारं अशा देशात की जिथे कित्येक कोटी दारिद्र्यरेषेखाली आहेत, कित्येक कोटी रोज अर्धपोटी आणि उपाशी रहातात. असं या चित्रपटात आहे तरी काय? निर्माते-दिग्दर्शक यांचं याबद्दल काय मत आहे? त्यांना चित्रपटांमधून काय साधायचं असतं?

प्रकाश मेहरा, गुलशन राय इत्यादि निर्मात्या-दिग्दर्शकांवर कॅमेरा. त्यांच्या वागण्या–बोलण्यात भरडपणा जाणवतो. दणकेबाज आत्मविश्वासांनी दिलेली उत्तरं. मी चित्रपटातून काय देतो? नैतिकता, चांगली मूल्यं. नेहमी सत्याचाच विजय होतो, इ. आणि मग जरा खरवडल्यावर बाहेर पडणारा हिशेबी व्यापारीपणा; अर्थातच लोकांना मनोरंजन हवं असतं आणि आम्ही ते देतो. वास्तवता? प्रत्यक्ष वास्तवातच

जगणाऱ्या लोकांना वास्तव हवंच कशाला ? कथेच्या दृष्टीनं अनावश्यक असलेली नाच–गाणी ? टाकतो की आम्ही. लोकांना बरं नाही का वाटतं तेवढंच.

म्हणजे यांची बांधिलकी कशाशी ? कला ? प्रतिभा ? निर्मितीचा आनंद ? समाज ? वास्तवता ? किमान प्राथमिक नीतीमूल्यं ?–या कशाशीही यांचं काही देणं–घेणं नाही. यांची बांधिलकी फक्त पैशाशी !

सत्यजित रे, मृणाल सेन यांच्यावर कॅमेरा रोखलेला. तुम्ही चित्रपट का बनवता ? काही तरी सांगावंसं वाटतं म्हणून. निर्मितीच्या आनंदासाठी. भोवतालच्या परिस्थितीबद्दल काही म्हणावंसं वाटतं म्हणून. मृणाल सेन म्हणतात, भोवतालच्या समाजात प्रचंड दारिद्र्य दिसतं. भयानक शोषण दिसतं. या साऱ्यांचा भेदक वेध घेण्यासाठी मी चित्रपट काढतो.

पण मग ज्या गरिबांबद्दल तुम्ही बोलता, ज्या सामान्यांवर तुम्ही चित्रपट काढता, ते सामान्य तुमचा चित्रपट बघायला येत नाहीत, ही तुम्ही आणि तुमच्या प्रेक्षकांमधली दरी नाही का ?

बोटांची अस्वस्थ चाळवाचाळव; परंतु त्यांचा अनुनय करण्यासाठी आम्ही बाजारू, मसालेदार चित्रपट काढणार नाही. वास्तवाची भलती–सलती मोड–तोड करून लोकांना आकृष्ट करणार नाही. आम्ही आमच्या मनातल्या निर्मितिमूल्यांशी प्रामाणिक असू.

इथे अगदी ठळक होणारी कम्युनिकेशन गॅप निव्वळ मनोरंजनासाठी, पैशासाठी काढलेल्या गल्लाभरू चित्रपटांना लोक जातात. खास लोकांसाठी, लोकांवर असलेल्या चित्रपटांना ते अव्हेरतात.

असं कसं होतं ? का होतं ?

कॅमेरा सोनियावर रोखला जातो. दुपारच्या वेळी, लगबगीनं सोनिया एकटीच चित्रपट पहायला निघाली आहे. मी चित्रपट नेहमी पहाते. मला खूप आवडतात चित्रपट. अमिताभ बच्चन मला फार आवडतो. त्याची संवादाची फेक, नाच–गाणी सर्वच काही मला आवडतं. तीन तास कसे निघून जातात कळत नाही. तेवढा विरंगुळा मिळतो.

## वास्तवतेचं व्यंगचित्र

सोनियाचं जीवन कष्टाचंही आहे आणि दुःखाचंही. ते दुःख ती पडद्यावर पहात असलेल्या दुःखासारखं झगझगीत, वलयांकित नाही. गरीब घर. शाळेत जायच्या वयात वडील गेले. त्यामुळे शाळेचं तोंडही नाही पहाता आलं. चौदाव्या वर्षी लग्न. लवकरच बाळंतपण; पण मुलगी झाली. सासरच्या माणसांनी घराबाहेर काढलं. आता आई-कडेच. बरं नाही वाटत, किती दिवस आई-कडे रहायचं ? पण इलाज नाही. चोवीस वर्षांची तारुण्यातली सोनिया. कष्ट करते. तिला मुलीला नीट वाढवायचंय. सिनेमातली छान घरं, माणसं, कपडे मला फार आवडतात. असं वाटतं की, तसे कपडे घातले की आपण पण सुंदर दिसू का ? सोनिया लाजून म्हणते. सिंदूर भरलेल्या माथ्यावरून पदर पुन्हा–पुन्हा ओढून घेते. गालाला परत–परत खळी पडते नाही. नाही. खूप पैसे झाले तरी मी नाही सारखा सिनेमा बघणार, कधी तरीच बघीन. माझी इच्छा ! सध्या तीन घरी धुणी–भांडी करते त्याचे पासष्ट रुपये मिळतात; पण मुलगी मोठी होतेय ना, जास्त काम केलं तर जास्त पैसे मिळतील. शंभर मिळतील. दीडशेसुद्धा मिळतील कदाचित !

कॅमेरा अमिताभ बच्चनवर. कोट्यवधी दिलाचे धडकन–बिडकन. चेहऱ्यावर अफाट गांभीर्याचा भाव. आवाज कमावलेला परिणामकारक, बुद्धिवान वगैरे. हिंदी चित्रपटांतून चांगल्या गोष्टी शिकवलेल्या असतात, म्हणून ते चालतात. 'मुकद्दर का सिकंदर' चालला. कारण त्यात जनतेला संदेश होता. कसला ? हाच की आपला क्राइम डजंट पे वगैरे.

नुकत्याच उघडकीला आणलेल्या स्मगलर चित्रपटवालेसंबंधाच्या पार्श्वभूमीवर हा संदेश भयंकर विनोदी वाटतोय. प्रेक्षक खो–खो हसतात.

— आणखी चित्रपट सांगतो की कष्ट करा हसतमुखानं. उदाहरणार्थ आम्ही — मी— अमिताभ बच्चन किती कष्ट करतो.

कॅमेरा सेटवर रोखलेला, मांडलेला सेट, धूम्रपान, मद्यपान करीत बसलेले तारे–तारका. त्यांच्याभोवती फिरून बोलणारे काम करणारे मेकपमन, सेटवाले. हे यांचे कष्ट.

कॅमेरा आता एका शेतावर. आधीच्या शॉटमध्ये सिनेमाला जायला निघालेला हा शेतकरी आता आपल्या शेतात नांगर चालवतोय. पाणी काढतोय. चिखल तुडवतोय. चिखलात माखलेल्या त्याच्या काळ्या रापलेल्या पावलांवर कॅमेरा परत परत स्थिरावतो आणि त्याच्या खांद्याच्या वर आलेल्या हाडांवर छातीच्या फासळ्यांवर. कष्ट कसे करावे हे याला अमिताभ बच्चन शिकवणार आहे.

कॅमेरा रेखावर स्थिर. तुम्ही तुमचं काम प्रामाणिकपणे करत नाही. किंवा एकूण नटनट्या दिलेल्या वेळा पाळत नाहीत. हे खरं का ? हा बेजबाबदारपणा नव्हे का ?

मागच्या–पुढच्या आरशात पडणाऱ्या आपल्या प्रतिबिंबांच्या गराड्यात बसलेली रेखा. ओह, इररिस्पान्सिबिलिटी? नाही, मी चित्रसृष्टीत आले तेव्हा लहान होते ना ? तुम्ही कशी जबाबदारीची अपेक्षा करणार माझ्याकडून ?

पण आता ?

आता ? आता ?? उत्तरादाखल मोहक इत्यादी स्मित. पुन्हा पुन्हा सावरलेले केस, ओठांना मुरड. चित्रपटातला प्रसंग असल्यासारखी दिलेली थातुर–मातुर मुलाखत. चुकीच्या आघातांचं स्टाइलिश इंग्रजी आणि फिल्मी ढंगानं मधे घातलेली हिंदी वाक्ये. नाही. मी माझ्या सदसद्विवेकबुद्धीला पटेल तसंच वागते.

त्यापाठोपाठ येणारा तिचा चित्रपटातला नाचकथानकाला अनावश्यक नाच. नाचाला अनावश्यक असं अनावृत देहप्रदर्शन व अंगविक्षेप. हो, सदसद्विवेकबुद्धीला धरून.

बालकृष्ण अडवाणींना प्रश्न–सिनेमा हे काळा पैसा पांढरा करायचं मोठं साधन आहे ना ?— नाही हो. तो काय आपल्या एकूणच अर्थव्यवस्थेचा भाग आहे. आणखी एक निर्मात्याला हाच प्रश्न. तो बराच वेळ आ वासून बघत राहतो.— अशा सरळ प्रश्नानं त्याचं भांबावणं विनोदी आहे. ब्लॅक ? मनी? ब्लॅक मनी ? वेल, येस. नो. पैसा ? काळा कसा असेल ? कसा काय असतो ? नाही मला वाटतं ठरवलं तरी मला नाही मिळवता येणार हा तुमचा काळा पैसा ! प्रकाश मेहरांचा चेहरा थोर सात्त्विक. अहो, काळा पैसा इथे कुठून येईल ? फार तर इथला एक

टक्का काळा पैसा असेल. आम्ही नाही हो त्यातले !

राजकारणाचा आणि चित्रपटाचा संबंध नाही हे ठासून सांगणारे राजकारणी आणि चित्रपटवाले. त्यापाठोपाठ प्रकाश मेहरांच्या घरच्या पार्टीतलं एक दृश्य. शत्रुघ्न सिन्हानं घेतलेल्या सुब्रमण्यम स्वामींच्या फिरक्या. मेहरासाब कुणावर तरी खेकसताहेत–त्याची पार्टी मेंबर व्हायची लायकी नाही. त्याला पार्टी प्रेसिडेंट कुणी केला ? समोरचा माणूस गदागदा मान हलवून चूक कबूल करतोय.

माणसं उपाशीसुद्धा रहातात, पण सिनेमा पहातात. रोजगार बुडवतात. कुठे कुठे खेड्यातून चालत सिनेमा बघायला शहरात यायचं म्हणजे पूर्ण दिवस जातो. एक रुपयापासून सात–आठ रुपयांपर्यंतची तिकिटं. ऐनवेळी मिळणारी पुढच्या दोन रांगांची तिकिटं त्यासाठी उडणारी झुंबड. या सर्वांना तिकिटं मिळणार नाहीत. महिन्याला सात–आठशे रुपयाला कमावणारा काळा बाजारवाला, खरे याचे हात थिएटरमालकाकरवी वरपर्यंत आहेत; पण सापडला तर पोलिसात हा एकटाच मार खाईल. या दरिद्री जनतेच्या निढळच्या घामाच्या पै–पैनं कुठे तरी मुंबईत जुहूला कुठल्या थंड हवेच्या ठिकाणी सोन्याची कौलं चढताहेत. अगोदर साठलेल्या पैशाच्या थप्प्यांत. दागिन्यांच्या राशीत भर पडतेय.

अशोक देसाई. वितरक – प्रश्न तुमची श्रीमंती आणि कोट्यावधी जनतेची अफाट गरीबी– काय संबंध आहे असं तुम्हाला यात वाटतं ?

शेठजी अवाक – आय बेग युवर पार्डन ! माझी श्रीमंती, त्यांची गरीबी ? संबंध ? कसला संबंध ? प्रश्नच कुठे येतो ? छे भलतंच.

प्रकाश मेहरा याहूनही थोर. अहो कसली गरिबी आणि कसली श्रीमंती ? आम्ही कसले. हो श्रीमंत ? आणि प्रेक्षक कसले आलेत गरीब ? तुम्ही केलाहेत का सर्वे ? सर्वांचा? ज्यांना एक रुपया तिकिट परवडतं, ते काय गरीब ? काय कोण गरीब नाही की श्रीमंत नाही.

गुलशन राय यांच्या चेहऱ्यावर शुद्ध डालडा तुपातले सात्त्विक भाव–बाबा, गरिबी अमीरी भगवान की देन है. परमेश्वर आहे तो घेईल काळजी–आपण तोवर त्यांना लूटणं ठेवावं की चालू.

चित्रपट पहाताना वाटत होतं. वास्तवता, सच्चेपणा या गोष्टींचं एक व्यंगचित्र आपण पहातो आहे. सिनेमा त्यातले भडक रंग. नाच–गाण्याची आतषबाजी त्यात निर्माण केलेले जगावेगळे प्रसंग, त्यांची अवास्तव उत्तरं. हे जग मायावी खोटं. निर्मात्या दिग्दर्शकांचा सात्त्विक भाव तकलादू. अमिताभचं तत्वज्ञान तकलादू. रेखाचे नखरे तकलादू. त्यापासून सोनियासारख्यांना मिळणारं समाधानही तकलादू पण त्यासाठी त्यांनी पोटाला काढलेले चिमटे खरे. निढळच्या घामात भिजलेले त्यांचे कळकट पैसे शुभ्र पांढरे. यांच्या जीवावर बांडगुळासारखी पोसणारी, त्यांच्या भावनिक दौर्बल्याचा फायदा उठवणारी अशी ही चित्रपटसृष्टी.

भारतीय संदर्भातलं परकीयांनी केलेलं कसलंही चित्रण झगझगीत तकलादू होण्यापलीकडेही गेलंय, असं क्वचित दिसतं. त्या क्वचितमध्ये या चित्रपटाचा समावेश व्हावा.

– ललिता बर्वे



# ह्या ना त्या निमित्ताने

## फक्त प्रतिमा – प्रतिभा नाहीच

फिरोझ रानडे

'**आ**ज काय कार्यक्रम आहे दूदवर ?' श्यामने परवाचे रविवारी सकाळी सकाळी आपल्या थोरल्या मुलग्याला विचारले.

आता रविवारी सकाळी-सकाळी बाबा ज्या अर्थी दूदवरच्या कार्यक्रमाची चौकशी करताहेत त्या अर्थी त्यांना प्रतिमा आणि प्रतिभावर काय कार्यक्रम आहे हे विचारावयाचे आहे हे त्या मुलग्याने हेरले. आपण वाचत असलेल्या रविवारच्या खास पुरवणीतून डोकेसुद्धा वर न काढता तो अलिप्ततेने म्हणाला, 'आहे कोणा teacher चा interview !'

वर्तमानपत्रातून डोकेसुद्धा वर न करता उत्तर देण्याच्या मुलग्याच्या वृत्तीवर श्याम नेहमी चिडत असे. आज तो नुसताच चिडला नव्हता तर भडकला होता. तसे भडकण्याची कारणे दोन.

दर रविवारी दूदवर मोठ्या भक्तिभावाने व बोबड्या–बोबड्या आवाजात सांगितलेली 'साप्ताहिकी' आपण ऐकतो, तशीच राधाही ऐकते व मुलेही ऐकतात. मुलांचे बहुतेक कार्यक्रम लक्षात रहातात, राधाच्या फक्त शनिवार-रविवारचे चित्रपट लक्षात रहातात. आपल्या मात्र सोमवारी सगळे रटाळ कार्यक्रम असतात. ह्याशिवाय काही कसे लक्षात रहात नाही ? मग असे लोकांना विचारायला लागते ! भडकण्याचे हे पहिले कारण.

भडकण्याचे क्रमांक दोनचे कारण म्हणजे मुलग्याला बापाचे प्रश्नाला डोके वर करून उत्तर देण्याची इच्छा नाही किंवा त्यांना साधी चालरीत माहीत नसावी ना ?

काही दिवसांपूर्वी हा प्रसंग झाला असता तर श्यामने मोठे आकांड-तांडव केले असते. आज-कालच्या मुलांना काही पद्धत नाही, मोठ्यांचा मान कसा राखावा ते कळत नाही वगैरे वगैरे.

राधाही श्यामच्या ह्या नव्या पिढीबद्दलच्या मताबद्दल सहमत झाली असती. फक्त तिने शेवटी एकच सूत्र जोडले असते ते म्हणजे

मुलांच्या अशा वागण्याला वडीलच जबाबदार असतात. असो.

पण श्यामने आज कोणत्याही तऱ्हेचे आकांड-तांडव न करण्यामागे कारण होते. गेल्या आठवडयात त्याची मोठीच भंबेरी उडाली होती. दूदवर Insat–B बद्दल काही तरी माहितीपट दाखवला जात असतानाची गोष्ट.

पूर्वी मुंबईहून दिल्लीला जाणाऱ्या फक्त दोनच ठळक आगगाडया होत्या. मध्य रेल्वेवर पंजाब मेल व पश्चिम रेल्वेवर फ्रांटीयर मेल. या दोन्ही गाडयांची वेळापत्रकेही गेल्या २५–३० वर्षांत बदलली नसल्यामुळे त्यांच्या जाण्या-येण्याच्या वेळाही श्यामच्या लक्षात होत्या. त्यामुळे कोणी दिल्लीला जावयाचा विषय काढला की, तो नासिक-भुसावळमार्गे जाणारी पंजाब वा बडोदा–रतलाम मार्गे जाणारी फ्रांटियर सुचवत असे.

पण बघता बघता रेल्वेचा व्याप इतका वाढला. नुसत्या पश्चिम रेल्वेवरूनच दिवसाला चार गाडया धावू लागल्या. राजधानी काय, डिलक्स काय, पश्चिम एक्सप्रेस काय, विचारू नका. काही दररोज धावणार, काही दिवसाआड, काही शनिवार, बुधवार सोडून, तर काही फक्त शनिवार–बुधवारी. श्यामने मग त्यांचा नादच सोडला.

प्रथम-प्रथम श्याम ह्या आकाशात सोडल्या जाणाऱ्या उपग्रहाबद्दल माहिती अशीच उत्साहाने ठेवीत असे. प्रथम कुत्री पाठवली गेली. मग माणसे. प्रथम रशियाने, मग अमेरिकेने नाना तऱ्हेचे व नाना पद्धतीचे उपग्रह सोडायला सुरुवात केली. मग भारताने पण कधी आशियाच्या मदतीने तर कधी अमेरिकेच्या मदतीने उपग्रह सोडायला सुरुवात केल्यावर मात्र श्याम पुरता भांबावला.

आता भारताने कोणताही उपग्रह सोडला व तो ठीक चालतो आहे हे कळले की श्याम निश्वास सोडत असे !

Insat-B बद्दलची त्याची माहिती अगदी तुटपुंजी होती म्हणजे जवळजवळ नव्हतीच. फक्त तो अमेरिकेच्या मदतीने सोडला आहे एवढेच त्याला वाचून माहीत होते.

त्या Insat-B बद्दल दूदवर चाललेल्या माहितीपटाच्या वेळची गोष्ट. तो चालू असता राधाने श्यामला त्यासंबंधी काही प्रश्न विचारला. वर म्हटल्याप्रमाणे श्यामला त्यातली काहीही माहिती नव्हती; पण बायकोच्या सर्व शंका–कुशंकांचे समाधान करण्याची जबाबदारी नवऱ्याची अशी भावना बहुतेक सर्व नवरेलोकांप्रमाणे श्यामची पण होती. त्याने राधाच्या प्रश्नाला काही तरी थातुर–मातुर उत्तर दिले.

जवळ हा थोरला मुलगा बसला होता– 'बाबा, काही तरी काय सांगता ?' असा श्यामला प्रश्न विचारून राधेच्या प्रश्नाचे सविस्तर उत्तर तो देता झाला. उत्तर कसले? त्याने राधा–श्यामचा Insat-B वर चांगला पंचेचाळीस मिनिटांचा धडाच घेतला. मुलग्याचे हे ज्ञान पाहून श्याम चांगलाच चक्रावला. मुलांना आपण चालरीत नाही वगैरे म्हणतो; पण ह्यांना हल्लीच्या जगात चाललेल्या गोष्टींची किती माहिती असते नाही? आता त्याने वाचताना डोके वर करून बघितले नाही ह्याचा अर्थ तो काही तरी महत्त्वाचे वाचत असणार अशी त्याने स्वतःची समजूत करून घेतली.

तेवढयात राधा तेथे आली. 'काय कार्यक्रम आहे ग प्रतिमा आणि प्रतिभाचा आज?' श्यामने विचारले.

'काही तरी खेर की खरे कोणी तरी शिक्षणतज्ज्ञ आहेत त्यांची मुलाखत आहे म्हणे !' असे म्हणून राधा चहाच्या कपबशा घेऊन गेली.

मुलग्याच्या कोणी teacher चा interview आहे व राधाच्या कोणा शिक्षण–तज्ज्ञाची मुलाखत आहे ह्या उत्तरांनी श्यामच्या डोक्यात प्रकाश पडला.

भारत सरकारने शिक्षकांना योग्य तो आदर दाखवण्याकरता पाच सप्टेंबर हा शिक्षक-दिन म्हणून साजरा करायला सुरुवात करून आता चांगली पंधरा-वीस वर्षं होत आली आहेत. राष्ट्रपती राधाकृष्णन ह्यांच्या वाढ-दिवसाचाच दिवस त्याकरता निवडला गेला. दूदवाल्यांनी त्यानिमित्त कोणा शिक्षण-तज्ज्ञांना मुलाखतीकरता बोलावून फार औचित्य दाखवल्याबद्दल श्यामला खूप आनंद झाला.

श्यामने आंघोळ वगैरे करून दूर–दर्शक सुरू करेपर्यंत कार्यक्रम सुरू झाला होता. पुण्याच्या डॉ. श्री. खेरांची मुलाखत चालली होती.

गेल्या पिढीतल्या महाराष्ट्रात होऊन गेलेल्या कार्य-तपस्वी लोकांत डॉ. खेरांची गणना करायला लागेल. अनाथ विद्यार्थी गृहाच्या प्रगतीत त्यांचा फार मोठा हात होता. त्यांनी म्हटल्याप्रमाणे ते खरेच लोकमान्य टिळक, केळकर, महात्मा गांधींच्या त्याग व सेवेच्या मार्गाने गेले व दुर्लक्षिल्या गेलेल्या शेकडो विद्यार्थ्यांचे आयुष्य मार्गी लावले.

वयाची त्यांची ८५–८६ वर्षं होऊनसुद्धा त्यांची शरीरयष्टी तरतरीत, शब्द–उच्चार स्वच्छ व स्पष्ट होते. ते पाहून श्याम भारावून गेला.

दूदच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे डॉ.खेरांच्या दोन्ही बाजूंना बसून मुलाखत घेणारे प्रश्नांचा मारा करत होते. ते दोघे प्रश्न विचारणारे विषयातले तज्ज्ञ होते. एक काही ६०–६५ वर्षांचे व दुसरे असेच ५०–५५ वर्षांचे वाटत होते. डॉ. खेर त्यांच्या प्रश्नांना चुटचुटीतपणे उत्तरे देत होते.

त्यांचे सगळे प्रश्न भूतकाळाबाबतचे होते. म्हणजे अनाथ विद्यार्थी गृहाची परिस्थिती काय होती, डॉक्टरांनी त्यात सुधारणा कशी केली, त्यांनी कोणती पुस्तके लिहिली वगैरेबाबतचे होते. तसे असणे अगदी साहजिकच होते. त्याशिवाय नव्या पिढीला त्यांचे कार्य कळणार कसे होते ? त्याची महती जाणवणार कशी ?

पण वेळ जाऊ लागला तरी मुलाखत-गाडी भूतकाळातून वर्तमानात यायला तयार होईना.

'अरे, आजच्या विद्यार्थ्यांपुढे केवढे प्रश्न उभे आहेत ! त्यांच्यात बेदिली वाढते आहे, त्याला राजकीय, सामाजिक, आर्थिक कारणे आहेत. ह्या तरुण पिढीपुढे नैराश्य आहे. ह्या सगळ्याबद्दल ह्या ज्ञानवृद्धाला काही प्रश्न का विचारले जाऊ नयेत ? आजच्या शिक्षण–पद्धतीबद्दल ह्या प्रश्न विचारणाऱ्यांना काही विचारावयाचे नाही ?'

श्याम मोठ्या बुचकळयात पडला. म्हणून तर त्याचा कॉलेजमध्ये जाणारा तरुण मुलगा मान वरसुद्धा न करता मोठ्या अलिप्ततेने म्हणाला नव्हता ना, की कोणा teacher चा interview आहे म्हणून ?

□

# पुरुषोत्तम करंडक स्पर्धा : १९८३

## उत्साही सुरुवात, वादग्रस्त शेवट !

केवळ आंतरमहाविद्यालयीन क्षेत्रातच नव्हे तर पुण्यातल्या एकंदर नाट्यजीवनात मानाची समजली जाणारी पुरुषोत्तम करंडक-स्पर्धा नुकतीच मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत २६ महाविद्यालयांनी भाग घेऊन एकूण ३२ प्रयोग सादर केले.

या सर्व प्रयोगांची वर्गवारी गुणवत्तेनुसार करावयाची झाल्यास (माझ्या मते) खालील-प्रमाणे होऊ शकेल. चूक-भूल देणे-घेणे.)

**१. उत्कृष्ट प्रयोग :**

१) अॅन अॅब्सर्ड शो २) पावसाचे गाणे ३) चेस ४) जादूचा खेळ ५) अभ्यास

**२. चांगले प्रयोग :**

१) घोटभर पाणी २) चिमणीचे मत ३) माझी गोष्ट ४) अंधारवाडा ५) काँप्रमाईज ६) कदाचित ७) वन वॉज मिसिंग ८) काळा ग्रंथ ९) देवाजीच्या नावानं १०) त्यांचं ते तसं तर आमचं हे असं.

**३. बऱ्यापैकी प्रयोग :**

१) विकणे आहे २) दुहेरी ३) रुद्र इदम् ४) सूर्यविलाप ५) ओ विंड कम अगेन ६) पातक ७) वेताळाची गोष्ट ८) ज्योत केव्हाच ९) पाट्या १०) देव-नवरी.

**४. निकृष्ट प्रयोग :**

१) स्टेशन २) दोन ऑक्टोबर ३) आक्टोपस.

**५. अतिनिकृष्ट प्रयोग :**

१) आय् अॅम दि विनर २) घोटभर पाणी (पूना कॉलेज) ३) सापडवून देणारास इनाम (नेस वाडिया) (वाणिज्यविभाग.)

याचा अर्थ सुमारे १५% प्रयोग दर्जेदार होते, २०% प्रयोग निकृष्ट होते तर बाकीचे ३०% चांगले आणि ३५% बरे होते; परंतु निर्विवादपणे पुरुषोत्तम करंडकाच्या योग्यतेचा म्हणता येईल असा एकही प्रयोग झाला नाही !

**(१) अॅन् अब्सर्ड शो-दि बेस्ट शो ! :** बृहन् महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजने राज काझी-लिखित पोलिटिकल सटायर सादर केली. सत्तेवर कोणीही आलं तरी जनहित होत नाही. होतो तो जनहिताचा देखावा ! हे प्रभावीपणे सादर करण्यात दिग्दर्शक अतुल टेंवे कमालीचे यशस्वी झाले आहेत. सुमारे ४५ कलाकार स्टेजवर वावरत असूनही प्रत्येकाचा वैयक्तिक आणि सांघिक अभिनय, वेषभूषा, पार्श्वसंगीत, संवादफेकी, पात्रांची निवड या सर्वांच्या संगतीने एक साचेबंद-चोख व उत्कृष्ट समूहनाट्य पाहण्यास मिळाले. यातील मेधा आठवले, राजू वडके व राम भडकमकर आदि सर्वच कलाकारांच्या भूमिका उत्कृष्ट झाल्या.

**(२) 'पावसाचे गाणे' सुरेल वाटले ! :** जळगावच्या मूळजी जेठा कॉलेजने हे समूह-नाट्य सादर केले. समाजोद्धारासाठी कुणी तरी पुढे येईल आणि सुखाच्या पावसाची बरसात होईल या आशेने पावसाचे गाणे म्हटले पाहिजे हे सांगणारे हे पावसाचे गाणे राम देशपांडे (सूत्रधार-गायक) यांच्या सुरेल गायनाने फारच बहारदार झाले. सर्वांचा कायिक-वाचिक अभिनय आणि दिग्दर्शन उत्कृष्ट होते. साहजिकच या मुलांनी सांघिक दुसरा नंबर पटकावला.

**(३) 'चेस्' एक बंदिस्त, जबरदस्त प्रयोग ! :** मूलतः हुशार आणि सरळमार्गी असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कोमल मनावर हॉस्टेलमधल्या रूम-पार्टनरकडून होणाऱ्या अमानुष रॅगिंगमुळे भयंकर आघात होतात. त्याच्या घुसमटलेल्या मनात सूडाची सुप्त भावना जागृत असते. स्वतःवर झालेल्या अत्याचाराचा बदला लहान विद्यार्थ्यांची अमानुष छळणूक करून घेतला जातो. अशा या विकृत, सूडाने पेटलेल्या प्राध्यापकाचे व्यक्तिचित्रण अतुल पेठे यांनी 'चेस्' या स्व-लिखित, दिग्दर्शित नाटिकेद्वारे घडविले. त्यांना मुकुंद राणे (विद्यार्थी), श्रीकांत छत्रे (अमोल) आणि ललिता मनोहर (अनिता) या सर्वांनी उत्कृष्ट साथ दिली. संपूर्ण स्टेजचा सुयोग्य वापर, उत्कृष्ट कायिक-वाचिक अभिनय, सुयोग्य नेपथ्य आणि पार्श्वसंगीत, उत्तम लेखन आणि दिग्दर्शन या सर्व उल्लेखनीय बाबींमुळे पेठे यांना उत्कृष्ट दिग्दर्शनाचे आणि लेखनाचे पारितोषिक मिळाले. ही एट्रो मोहिते महाविद्यालयाची होती.

**(४) 'जादूचा खेळ' खूपच रंगला :** सामान्य माणसाच्या सामान्य आशा-आकांक्षा-सुद्धा फलद्रूप होत नाहीत त्यामुळे त्याला त्याचेच जीवन ओझे होते आणि एक दिवस त्या ओझ्याखालीच तो अस्तंगत होतो. हा आशय टिळक आयुर्वेदने 'जादूचा खेळ' या प्रयोगात मोठ्या प्रभावीपणे सादर केला आहे. आकर्षक आणि कल्पक सुरुवात आणि हृद्य शेवट हे या प्रयोगाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. यातील जादूगार (श्रीपाद पाठक), जमूरा (प्रशांत सुरू), साहेब (युनुस पठाण), या सर्वांनी कमाल केली तर सामान्य माणूस (एकनाथ कुलकर्णी) आणि ढोलकीवाला (आठवले) यांनी कमाल केली. एकंदरीत हा जादूचा खेळ खूपच रंगला.

**(५) अभ्यसनीय अभ्यास ! :** स. प. कॉलेजने (मूळ लेखक आयनेस्को, रूपांतर श्री. ना. नवरे) अभ्यास ही सादर करण्यास अत्यंत अवघड असलेली एकांकिका मोठ्या ताकदीने उभी केली. अभ्यास म्हणजे पुन्हा-पुन्हा तेच. त्याच त्याच गोष्टीचा निदिध्यास म्हणजे अभ्यास. कोणत्याही विषयाच्या अभ्यासाच्या निदिध्यासाने पछाडलेल्या-भारावलेल्या-विकृत झालेल्या, त्यापायी क्षणी वास्तवाचेसुद्धा भान विसरणाऱ्या वृद्ध विकलांग प्राध्यापकाची (त्याच्या वैशिष्ट्य-पूर्ण हालचाली आणि लकबींसहित) भूमिका राहूल सोलापूरकर यांनी मोठ्या कौशल्याने आणि ताकदीने उभी केली. त्याचा कायिक-वाचिक अभिनय लाजबाब होता. त्यांना सुषमा साने (विद्यार्थिनी) आणि सुवर्णा आपटे (मोलकरीण) यांनीही

चांगली साथ केली; परंतु सर्वसामान्य रसिकांना लक्षणीय वाटलेला हा प्रयोग पहिल्या नवातसुद्धा येऊ नये हे रसिकांचे दुर्दैव ! आणखी काय ? असो.

(६) घोटभर पाणी : मेडिकल कॉलेजने, आपल्या नेत्यांचे दलितप्रेम किती बेगडी आहे, त्याचबरोबर दलितोद्धाराची गर्जना करणारे दलित नेतेसुद्धा किती सत्तापिपासू आणि आपमतलबी आहेत हा सामाजिक आशय व्यक्त करणारी एकांकिका प्रभावीपणे सादर केली. यातील फणसाळकर (दादासाहेब) व दिनेश पाटील (प्रधानजी) यांच्या भूमिका उत्कृष्ट झाल्या. या प्रयोगाला सांघिक तिसरा क्रमांक मिळाला; परंतु अन्य पात्रांची निवड अधिक योग्य असती आणि शेवट अधिक परिणामकारक असता तर प्रयोग फारच बहारदार झाला असता.

(७) 'चिमणीचं मत' वाया गेले ! नासिकच्या भि. य. ल. ममहाविद्यालयाने मत–मत आणि मत या विषयावर उत्कृष्ट प्रयोग सादर केला. मताच्या हक्कासाठी झगडणाऱ्या चिमणीला अखेर मताचा हक्क प्राप्त होतो; परंतु तोवर तिचं घरटं मात्र पार विस्कटून जातं. मतस्वातंत्र्याच्या गळचेपीचे हृद्य चित्रण दिग्दर्शक व सूत्रधार (सुनिल देशपांडे) यांनी मोठ्या कलात्मकतेने घडविले. त्यांना नटी (विद्या दांडेकर) व चिमणी (कीर्ती मोडक) यांनी सुरेख साथ केली. उचित वेषभूषा, समर्पक संगीत, उत्तम अभिनय आणि दिग्दर्शन व चांगली संहिता या सकल गुणांनी मंडित झालेला हा प्रयोग पहिल्या नवात येऊ नये याचेच आश्चर्य वाटले !

(८) 'माझी गोष्ट', खूपच रंगली : स्वत्वाचा शोध घेणाऱ्या तरुणाची गोष्ट जगदीश पाटणकर (विजय) यांनी मोठ्या कुशलतेने सादर केली. त्यांचा भोळा–भाबडा काहीसा बावळट आणि थोडासा चालू विजय प्रेक्षकांची दाद घेऊन गेला. अल्लड–भावुक तरुणीच्या भूमिकेत सुचरिता इनामदार (सुभद्रा) चांगल्या शोभल्या, तर तापट–चिडखोर फादरच्या भूमिकेत विश्वास महाजन फिट्ट बसले. संगीत कलात्मक आणि प्रसंगोचित होते. सफाईदार दिग्दर्शनाचा अभाव आणि अॅडजेस्ट न झालेले लाइट-इफेक्टस् यांचा अपवाद वगळल्यास प्रयोग चांगला झाला.

(९) 'अंधारवाडा' अंधारतच राहिला ! टिळक आयुर्वेदने रत्नाकर मतकरीलिखित रहस्य आणि गूढगुंजनपर एकांकिका मोठ्या ताकदीने सादर केली. याचे नेपथ्य, प्रकाशयोजना, पार्श्वसंगीत व दिग्दर्शन आदि उपांगे चोख होती; परंतु नाट्याचा मुख्य आत्मा जो अभिनय, तोच या प्रयोगात फार तोकडा पडला. साहजिकच अंधारवाडा प्रकाशात येऊ शकला नाही.

(१०) 'कॉम्प्रमाईज' एक सचेबंद प्रयोग– तडजोड हा जीवनाचा स्थायीभाव आहे, हा विचार या प्रयोगाद्वारे गरवारे कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी समर्थपणे मांडण्यात यश मिळविले. चांगले आकृतिबंध, उत्तम सांघिक अभिनय, योग्य संगीत व प्रकाशयोजना या सर्वांमुळे हा प्रयोग फारच बहारदार झाला; परंतु अंतिम फेरीत विद्यार्थ्यांनी आरडाओरडा करून कलाकारांचा विरस केला.

(११) 'कदाचित' चा अवचित नंबर आला– मूळ लेखक राकेश आनंद, अनुवाद पु. ल. देशपांडे. जीवन जगण्यातले स्वारस्य हरवलेल्या अपत्यहीन दांपत्याची करुण कहाणी. टिळक शिक्षण महाविद्यालयाच्या सौ. सीमा शेंडे (स्त्री) यांनी मोठ्या ताकदीने उभी केली; परंतु त्यांना साथ देण्यात भरत केळकर (पुरुष) फारच अपुरे पडले. त्यामुळे हा दोन खांबी तंबू कोसळला !

(१२) 'वन् वॉज मिसिंग' चेस अ क्रूकेड शॅडोची भ्रष्ट नक्कल– 'चेस् अ क्रुकेड शॅडो' या गाजलेल्या इंग्लिश चित्रपटाची सावली या नाटिकेवर पडलेली दिसून येते. धनाच्या लालसेने प्रत्यक्ष सख्ख्या भावाचा खून करणाऱ्या तरुणीची आणि ते रहस्य उलगडणाऱ्या एका हुशार गुप्त पोलिसाची ही कथा. या मूळ संहितेची नक्कल अस्सल इंग्लिश कथेबरोबर घेतली असती तरी हा प्रयोग खूप चांगला वठला असता; परंतु एका चांगल्या कथेची मोडतोड करून आपले अनाहूत कल्पनाचातुर्य (!) वापरून लेखक आणि दिग्दर्शक उमेश भालेराव यांनी या संहितेचा पार पचका केला असे म्हणावे लागते. या प्रयोगाच्या लेखन आणि दिग्दर्शनात अनेक गंभीर त्रुटी होत्या. उदा. प्रत्यक्ष सख्ख्या भावाचा योजनापूर्वक खून करणारी पाताळयंत्री बहीण, तोतया भावाच्या (इन्स्पेक्टरच्या) हातातील रक्ताने माखलेला सुरा आपल्या हातात घेण्याइतकी मूर्ख आणि बावळट नसावी खचित; परंतु लेखकमहाशयांनी तसे प्रत्यक्ष रंगमंचावर दाखवले आहे ! असो.

(१३) 'काळा ग्रंथ' सामान्य प्रयोग– आपली भारतीय संस्कृती सत्यमेव जयतेचा सतत उद्घोष करते; परंतु अंतिम विजय हा नेहमी असत्याचाच होत असतो हे सांगण्यासाठी इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांनी सुमारे ३२ अभिनेते खर्ची घातले. यातील प्रमुख अभिनेत्यांचा अभिनय अत्यंत सुमार होता, संगीत कर्कश्य होते आणि दिग्दर्शन सामान्य होते.

(१४) देवाजीच्या नावानं चांगभलं– अष्टांग आयुर्वेदाचा हा प्रयोग लक्षणीय होता; परंतु स्टेजवर काय दाखवावे आणि काय दाखवू नये याचे भान दिग्दर्शकाला राहिले नाही. त्यामुळे एका चांगल्या चाललेल्या प्रयोगाचे मातेरे झाले.

(१५) 'विकणे आहे' एक आगळावेगळा प्रयोग– नेहमीच्या व्यवहारात आपल्याला हवे ते मुखवटे पांघरून वावरता येत नाही. तसं वावरायला मिळावे असे आपल्याला अंतर्यामी वाटत असते. त्या स्वप्नरंजनाच्या पूर्तीसाठी आपण नाटक–सिनेमे पाहतो. तिथे आपल्याला हवे ते चेहरे, हवे ते मुखवटे भेटतात आणि आपले स्वप्नरंजन पुरे होते. हा विषय मांडण्यासाठी दिग्दर्शकाने (विकास निकम) सुमारे २५–३० कलावंतांना फ्लोरोसंट ट्यूबचे प्रकाशात ( म्हणजे जवळजवळ अंधारातच) संपूर्ण प्रयोग होईतो फिरण्याचा एक आगळा–वेगळा आणि धाडसी व अभिनव प्रयोग केला; परंतु हा नवा प्रयोग स्तुत्य आहे किंवा नाही कुणास ठाऊक ! प्रयोगाचे शेवटी संभाजी आदी कॅरेक्टर्स उभ्या करण्यात अभिनेते फारच अपुरे पडले. तसेच मुखवटे पांघरलेल्या अभिनेत्यांचा कोणता अभिनय परीक्षकांनी पाहिला हा प्रश्नच आहे ! नाटिकेचे एडिटिंग बरोबर झालेले नव्हते. केवळ नवीन प्रकारे सादर केली या एकाच निकषावर ही नाटिका पहिल्या नवात आली असावी एवढेच!

(१६) मॉडर्न कॉलेजने भणगेलिखित 'दुहेरी' ही मनाविश्लेषणात्मक रहस्यमय

पृष्ठ ३० वर

# अखिल भारतीय नेतृत्वाची गरज कोण पूर्ण करणार ?

अभय गोखले

इंदिरा गांधींना पर्यायी ठरू शकतील असे किती नेते आज भारतात आहेत ? इंदिरा गांधींची लोकप्रियता वादातीत आहे. खऱ्याखुऱ्या अर्थाने त्याच अखिल भारतीय पातळीवरील एकुलत्या एक नेत्या वाटतात. अगदी दक्षिणेतही त्यांचा पक्ष कमकुवत असला तरी त्यांच्या तेथील लोकप्रियतेबाबत शंका घेता येणार नाही. नेहरू घराण्याचे लोकप्रियतेचे वलय त्यांच्या भोवती आहेच; परंतु त्यांचे व्यक्तिमत्त्वही उत्तुंग आहेच. आज जरी एकंदर काँग्रेस संघटनेवर त्यांची पूर्वीसारखी पकड नसली तरी प्रत्येक राज्यातील नेत्यांना एकमेकांत झुंजवत ठेवल्यानेच तशी परिस्थिती निर्माण झाली आहे व त्याची जबाबदारी काँग्रेसच्या सर्वेसर्वा म्हणून इंदिरा गांधींना झटकून टाकता येणार नाही. कमलापती त्रिपाठी हे नामधारी अध्यक्ष आहेत व लहानसहान सर्व निर्णय इंदिराजीच घेतात ही गोष्ट उघडच आहे. अर्थात इंदिराजींचे काँग्रेस संघटनेवर कितपत नियंत्रण आहे हा काही या लेखाचा विषय नाही. इंदिराजींच्या स्थानावर दावा सांगणारे तथाकथित अखिल भारतीय नेते त्या पदाकरता कितपत लायक आहेत हे तपासून बघायला हवे.

१९७७ मध्ये जनतापक्ष सत्तेवर आला तो जनतेला इंदिराजी नको होत्या म्हणूनच. आणीबाणीतील अत्याचाराला वैतागून जनता इंदिराजींना धडा शिकवण्याकरिता निवडणुकांची आतुरतेने प्रतीक्षा करत होती. निरनिराळे विरोधीपक्ष एकत्र येऊन तयार झालेला जनता पक्ष हा संयुक्त विधायक दलांपेक्षा किंवा बड्या आघाडीपेक्षा वेगळा नाही हे लोकांना माहीत होते. त्याचप्रमाणे ही आवळ्या-भोपळ्याची मोट फार काळ टिकणार नाही हेही लोकांना माहीत होते; परंतु परिस्थितीच अशी निर्माण झाली की, इंदिराजींच्या पक्षाला हरवणे हा जीवनमरणाचा प्रश्न निर्माण झाला होता. मग लोकांना जनता पक्षाला निवडून आणल्याशिवाय दुसरा पर्यायच नव्हता. जनता पक्ष निवडून आल्यावर पंतप्रधानाच्या पदावर डोळा ठेवून असलेल्या मोरारजी देसाई, चरणसिंग, जगजीवनराम यांच्यात तीव्र स्पर्धा झाली व जयप्रकाशांमुळे मोरारजींच्या गळ्यात पंतप्रधानपदाची माला पडली. येथे असा प्रश्न निर्माण होतो की, जनता पक्षाला निवडून आणण्यात मोरारजींचा व त्यांच्या लोकप्रियतेचा किती वाटा होता ? तर याचे उत्तर फारसे उत्साहवर्धक नाही. कारण लोकांनी मोरारजींना नव्हे तर जनता पक्षाला मते दिली होती. हीच गोष्ट इंदिरा गांधींच्या बाबतीत सांगायची झाल्यास लोक हे काँग्रेसला किंवा त्या पक्षाच्या उमेदवारांना मते देत नाहीत तर इंदिराजींना मते देतात. इंदिराजी वजा काँग्रेस याचे उत्तर शून्य असे आहे. तेव्हा मोरारजी हे जरी पंतप्रधान झाले तरी ते अखिल भारतीय नेते बनू शकले नाहीत. अगदी त्यांच्या स्वतःच्या गुजराथेतही जनतालाटेत ते आपल्या प्रतिस्पर्ध्यांहून वीस हजारच मते जास्त मिळवू शकले. मोरारजी हे चांगले प्रशासक आहेत; पण म्हणून ते चांगले नेते आहेत असे म्हणता येणार नाही. त्यांचा हेकट स्वभाव, दारूबंदीसारख्या बाबतीतील त्यांची दुराग्रही मते व नेहमी आपले तेच खरे करण्याची त्यांची वृत्ती हे काही नेतृत्वगुण म्हणता येणार नाहीत. अशा मोरारजींच्या नेतृत्वाखाली जनता पक्ष दोन-अडीच वर्षे सत्तेवर राहिला तो जनसंघासारख्या घटक पक्षाने नेहमी सामंजस्य दाखवल्यानेच. तेव्हा मोरारजी हे इंदिराजींच्या पदावर बसले तरी लोकप्रियतेच्या बाबतीत व पक्षनियंत्रणाच्या बाबतीत ते इंदिराजींच्या जवळपासही पोचू शकले नाहीत. मग चरणसिंग हे काळजीवाहू सरकारचे पंतप्रधान बनले. जाटनेते म्हणून त्यांचा गौरवाने उल्लेख होत असला तरी त्यातच त्यांचे संकुचित व प्रादेशिक नेतृत्व दिसून येते. मात्र लोकप्रियतेच्या बाबतीत चरणसिंग मोरारजींच्यापेक्षा किती तरी सरस वाटतात. उत्तर प्रदेशात चरणसिंग स्वतःच्या एकट्याच्या बळावर लोकसभेच्या २९ जागा किंवा विधानसभेच्या शंभरवर जागा जिंकू शकतात अशी किमया फक्त ( भारतात ) इंदिराजीच करू शकतात; परंतु उत्तर प्रदेश, हरयाणा, राजस्थान, बिहार या राज्यांतील जाटांवरील व शेतकऱ्यांवरील त्यांचा प्रभाव सोडल्यास इतरत्र व विशेषतः दक्षिणेत चरणसिंगांना कोण विचारतोय ? तेव्हा चरणसिंग हे अखिल भारतीय नेते आहेत असा दावा स्वप्नातही करता येणार नाही. शिवाय त्यांचा पक्षही अखिल भारतीय पक्ष नाही. ते पंतप्रधान झाले ते केवळ संजीव रेड्डी, इंदिरा गांधी व यशवंतराव चव्हाण यांच्या कृपाप्रसादानेच. पक्षनियंत्रणाच्या बाबतीत इंदिराजींप्रमाणेच चरणसिंगही लोकदलाचे सर्वेसर्वा आहेत व महत्त्वाचे निर्णय घेतानाही इंदिराजींप्रमाणेच त्यांना आपल्या सहकाऱ्यांशी सल्लामसलत करण्याची गरज वाटत नाही. मोरारजींना जनता पक्षात आता फारसे महत्त्व उरलेले नाही; परंतु लोकदलाचे मात्र चरणसिंग हे एकमेव वादातीत नेते आहेत. नेतृत्वाचा प्रश्न निघाला तर जनता पक्षात मोरारजींना बरेच विरोधक आडवे येतील; पण चरणसिंगांच्या बाबतीत त्यांना पक्षात कोणीही विरोधक नाहीत. जे विरोधक होते ते पूर्वीच लोकदल सोडून निघून गेलेत. म्हणजेच चरणसिंगांचे लोकदलातील स्थान काँग्रेस पक्षातील इंदिराजींच्या स्थानाप्रमाणे अभेद्य आहे !

## जगजीवन–चरण–मोरारजी

आणीबाणी उठवल्यानंतर म्हणजेच निवडणुका जाहीर झाल्यावर संधिसाधू जगजीवनराम यांनी काँग्रेसचा राजीनामा दिला. त्यामध्ये लोकशाहीबद्दल काडीचेही प्रेम नव्हते तर संजय गांधींच्या मनातून ते उतरल्याने त्यांना १९७७च्या लोकसभा-निवडणुकीकरिता तिकीट

मिळणार नाही याबद्दल त्यांची खात्री झाल्यानेच जगजीवनराम यांनी काँग्रेस सोडली हे उघड सत्य आहे. जगजीवनराम यांनी त्यांच्या लायकीपेक्षा जास्त महत्त्वाची पदे भूषवली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना व त्यांच्या दलितांतील लोकप्रियतेला शह देण्याकरिता नेहरूंनी जगजीवनरामना काँग्रेसमध्ये महत्त्व दिले असे म्हणतात; परंतु बाबासहेबांच्या नखाचीही सर जगजीवनराम यांना नव्हती. दलितांमध्ये त्यांना विशेष पाठिंबा नव्हता. मात्र दलितांचा मोठा नेता अशी त्यांची इमेज निर्माण करून दलितांची मते लाटण्याचा पुढे नेहरूंप्रमाणे इंदिराजींनीही प्रयत्न केला; परंतु जगजीवनराम यांना माहीत नसले तरी, दलितांचे पुढारी म्हणून त्यांची प्रतिमा निर्माण करण्याचा आपला खटाटोप व्यर्थ आहे हे गुपित इंदिराजींना केव्हाच माहीत झाले होते, त्यामुळे जगजीवनराम यांच्या राजिनाम्यामुळे त्यांना फारसा धक्का बसला नाही; परंतु त्यांची तशी इमेज निर्माण करून जनत ापक्ष दलितांची मते लाटू शकेल या कर्माला त्या घाबरत होत्या. अर्थात जनता पक्ष तसे काही करू शकला नाही. शिवाय दलितांतील कित्येक नेत्यांना जगजीवनराम यांना दलितांबद्दल कितपत आस्था आहे हे चांगले माहीत असल्याने १९८० च्या निवडणुकीत जगजीवनराम एकट्याच्या बळावर दलितांची मते खेच शकले नाहीत व ते कागदी वाघ ठरले! दलितांची मते इंदिराजी घेऊन गेल्या. जगजीवनराम यांची पंतप्रधान होण्याची तीव्र इच्छा मात्र संजीव रेड्डींच्या अवकृपेने पुरी होऊ शकली नाही. जगजीवनराम हे कधीच अखिल भारतीय नेते नव्हते. ते सदैव कामराज, नेहरू, शास्त्री, इंदिराजी यांच्या छायेखाली वावरले. लोकप्रियतेच्या व प्रशासकीय गुणवत्तेच्या बाबतीत त्यांचा नंबर मोरारजी व चरणसिंग यांच्या बराच खाली लागेल. दलितांबद्दल त्यांना कधीच प्रेम नव्हते. त्यांना प्रेम होते सत्तेचे व खुर्चीचे! आपण दलितवर्गातील आहोत ही एक गुणवत्ता आहे असे समजून त्यांनी निरनिराळ्या सत्तापदांवर आपला हक्क सांगितला. आपल्या बळाची कल्पना त्यांना काँग्रेसमधून बाहेर पडल्यावरच आली. आज जगजीवनराम यांचा पक्ष हा धड प्रादेशिक पक्षही नाही. तेव्हा पंतप्रधानपदावरील त्यांचा दावा हा नुसता अनुचितच नव्हे तर हास्यास्पद आहे. पक्षनियंत्रणाच्या बाबतीतही आनंदच आहे. जगजीवनराम काँग्रेसचे अध्यक्ष असताना कार्यक्षमतेबद्दल त्यांचा कधीच लौकिक नव्हता. आज ते इंदिरा गांधींच्या पक्षात जाण्यासाठी आसुसले आहेत. एखादा लहानसा सत्तेचा तुकडा त्यांच्याकडे फेकला की ते एखादे तात्त्विक मुलामा फासलेले कारण सांगून इंदिरा काँग्रेसमध्ये जातील!

जगजीवनराम, चरणसिंग व मोरारजी या सान्या म्हातान्यांबद्दल विचार केल्यानंतर अखिल भारतीय नेतृत्वाबद्दल ज्यांचा पुकारा करण्यात येतो त्यामध्ये वाजपेयी, चंद्रशेखर, बहुगुणा, शरद पवार यांची नावे डोळ्यांसमोर येतात. इंदिराजींच्या खालोखाल संपूर्ण भारतात वाजपेयी लोकप्रिय मानले जातात. दक्षिण भारतात वाजपेयी लोकप्रियतेच्या बाबतीत इंदिराजींशी बरोबरी करू शकणार नाहीत; परंतु भारतात इंदिरा काँग्रेसखालोखाल वाजपेयींचा भारतीय जनता पक्षच अखिल भारतीय पातळीवरील पक्ष वाटतो. वाजपेयींची भाजपतील लोकप्रियता वादातीत आहे. इंदिराजींप्रमाणे ते मोठ्या सभा खेचू शकतात; परंतु त्यांच्या राशीला आर. एस. एस. नावाचा शनी आहे त्याचे काय? वाजपेयींची लोकप्रियता न आवडणारा मोठा वर्ग आर. एस्. एस्. मध्ये आहे. तेव्हा वाजपेयींना नेहमीच त्यांच्याशी सामना करावा लागतो. आर. एस. एस. चे भाजपवर नियंत्रण असल्याने वाजपेयींना त्यांच्याकडे दुर्लक्षही करता येणार नाही. म्हणजेच वाजपेयींची भाजपमधील लोकप्रियता इंदिराजींप्रमाणे वादातीत नाही. वाजपेयी चांगले प्रशासक आहेत, सहकाऱ्यांना सांभाळून घेण्याची वृत्ती (गुण) त्यांच्यात आहे. ते उत्तम वक्ते आहेत. मोरारजी, चरणसिंग, जगजीवनराम यांच्यापेक्षा ते लोकप्रिय आहेत; परंतु ते एका तथाकथित जातीयवादी, हिंदुत्ववादी, प्रतिगामी पक्षाचे नेते आहेत, त्यांच्या पक्षाला इतर विरोधी पक्ष साधारणतः अस्पृश्य मानतात, या गोष्टी वाजपेयींच्या जमेच्या बाजू म्हणता येणार नाहीत. शिवाय वाजपेयींचा पक्ष हा एकट्याच्या बळावर केंद्रित सत्ता काबीज करू शकणार नाही. मग आघाडीचा किंवा जनतापक्षासारखा प्रयोग करावा लागेल व तसा पक्ष किंवा आघाडी सत्तेवर आली तरी पंतप्रधानपदाचा प्रश्न निर्माण झाल्यावर वाजपेयी हे भाजपचे म्हणजेच रा. स्व. संघाचे असल्याने त्यांना विरोध


" मला शक्य असते तर मी या ग्रंथाच्या लाख प्रती काढून ग्रामीण भागातील मुलाबाळांच्या हाती पडतील अशी व्यवस्था केली असती. "

— कलकत्याहून श्री. बा. जोशी

'कार्व्हर' पहिल्या आवृत्तीचे असे उत्फूर्त व भरघोस स्वागत झाले.

मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, यांनी शाळांसाठी – शिक्षणसंस्थांसाठी या ग्रंथाची शिफारस केली.

दुसरी आवृत्ती

एक होता कार्व्हर सौ. वीणा गवाणकर

मूल्य : तीस रुपये । सवलत मूल्य : बावीस रुपये

नजीकच्या विक्रेत्यांकडे मागणी करा.

ठराविक प्रतींची विक्री होईपर्यंतच सवलत चालू.

राजहंस प्रकाशन १०२५ सदाशिव, पुणे ३०

करण्यासाठी इतर घटक आपले सर्व मतभेद बाजूला ठेवून एकत्र येतील. जनता पक्षात, भाजप (जनसंघ) सोडून इतर घटकांचे फक्त रा. स्व. संघाला विरोध करण्याच्या बाबतीत मतैक्य होत असे हा काही योगायोग नव्हे. मागे जनतापक्ष सत्तेवर आल्यावर चरणसिंग, मोरारजी, जगजीवनराम यांच्या स्पर्धेत वाजपेयी नव्हते असे नव्हे; पण ते जनसंघाचे म्हणजेच रा. स्व. संघाचे असल्याने आपण एकाकी पडू हे त्यांना माहीत असल्याने त्यांचे समर्थक वाजपेयींना उघडपणे पुढे सरकवत नव्हते. वाजपेयींनाही आपण पंतप्रधान व्हावे असे वाटते व त्यात गैर काही नाही; पण त्यांच्या पक्षाला जो जातीय-वादी, प्रतिगामी, हिंदुत्ववादी असा शाप आहे तोच त्यांना नेहमी भोवतो. लोकप्रियतेच्याबाबतीत व नेतृत्वाच्याबाबतीत इंदिराजींच्या खालोखाल वाजपेयींचा नंबर लागतो. ते जर कॉंग्रेसमध्ये असते तर लालबहादूर शास्त्रींनंतर पंतप्रधानही झाले असते! मात्र त्यांचे अमोघ वक्तृत्व सत्ताधारी पक्षात कायम राहिले असते का? ती तर त्यांची सर्वांत मोठी जमेची बाजू आहे. कॉंग्रेस पक्ष ज्याप्रमाणे इंदिराजींच्या नावावर मते खेचतो त्याप्रमाणे भाजपही थोड्या-फार प्रमाणात वाजपेयींचा तसाच उपयोग करतो. मात्र इंदिराजी, चरणसिंग यांच्याप्रमाणे वाजपेयी भाजपचे सर्वेसर्वा नाहीत. महत्त्वाचे निर्णय घेताना त्यांना सहकाऱ्यांशी चर्चा करावी लागते. सहकारी टीका करू शकतात. त्यांच्याशी असहमती दर्शवू शकतात (जे इंदिराजींच्या व चरणसिंगांच्या सहकाऱ्यांना जमत नाही) म्हणजेच भाजपमध्ये सामूहिक नेतृत्वाची परंपरा आहे. अडवाणी, बल्ल, शेखावत, हेगडे, जेठमलानी, विजयाराजे शिंदे यांच्यासारख्या नेत्यांना वाजपेयी सर्वांत जवळचे वाटतात व त्यांची बहुतेक मते त्यांना पटतात; परंतु वाज-पेयींचा उत्कर्ष व लोकप्रियता सहन न होणारा मोठा गट रा. स्व. संघात आहे. १९८० च्या निवडणुकांत वाजपेयी पराभूत होता होता वाचले याच्यापाठीमागे कोण लोक होते हे सर्वांना माहीत आहेच.

## चंद्रशेखर–बहुगुणा–पवार

भारतयात्रा पायी पूर्ण केल्यापासून चंद्रशेखर यांची भारतातील लोकप्रियता वाढली आहे. तसा जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आला आहे, नेतृत्वाच्या बाबतीत चंद्रशेखर यांचा चांगला लौकिक नाही. जनता पक्षाचे अध्यक्ष म्हणून त्यांची कामगिरी लक्षात ठेवण्यासारखी नाही व नव्हती. संघटक म्हणून त्यांची कामगिरी उत्साहवर्धक नाही. जनता पक्षाने त्यांना अजूनपर्यंत अध्यक्ष म्हणून कायम का ठेवले आहे याबद्दल स्वतः चंद्रशेखर यांनाही आश्चर्य वाटत असेल! अध्यक्ष कसा नसावा याचे उत्तम प्रतीक म्हणून चंद्रशेखर यांच्याकडे बोट दाख-विता येईल. अडीच वर्षांच्या जनता पक्षाच्या कारकीर्दीत ते पक्षाची नीट घडी बसवू शकले नाहीत. पक्षांतर्गत निवडणुका घेऊ शकले नाहीत. तेव्हा जनता पक्षासारखा खिचडीपक्ष चंद्रशेखर यांच्या-सारख्या अकार्यक्षम अध्यक्षाच्या नेतृत्वाखाली अडीच वर्षे अभेद्य राहिला हे आश्चर्यच म्हणावे लागेल आणि सध्याच्या जनता पक्षाचे नेते म्हणून तरी चंद्रशेखर यांनी काय दिवे लावले आहेत? मुख्य म्हणजे चंद्रशेखर यांचा पिंड नेतृत्वाचा नाही. कॉंग्रेसमध्ये ते पुढे आले ते बंडखोर यंगटर्क म्हणून! मोरारजी देसाई, निजलिंगप्पा, स. का. पाटील, कामराज यांच्यासारख्या सिंडिकेट नेत्यांविरुद्ध आरडा-ओरड करण्यासाठी व त्यांना शह देण्यासाठी इंदिराजींनी चंद्रशेखर व त्यांचे सहकारी मोहन धारिया, रामधन, कृष्णकांत यांचा चांगला उपयोग करून घेतला. चंद्रशेखर व त्यांच्या सहकाऱ्यांनी पक्षाची शिस्त धाब्यावर बसवून कॉंग्रेसमध्ये वेगळा गट स्थापन केला. बँकांचे राष्ट्रीयीकरण केल्यामुळे पुरोगामी वाटणाऱ्या इंदिराजी त्यांना एका रात्रीत हुकूमशहा वाटू लागल्या त्या इंदिराजींनी त्यांच्याकडे वक्रदृष्टी फिरवल्यावरच. सिंडिकेटवाल्यांना चोपण्याचे काम पूर्ण झाल्यावर त्यांना आता चंद्रशेखरप्रभृतींची गरज वाटत नव्हती. तेव्हा कॉंग्रेसमध्ये बंडखोर म्हणून मिरवणारे चंद्रशेखर जनता पक्षाचे अध्यक्ष हा एक विनोदच होता. आणीबाणीला विरोध करण्याबद्दल त्यांना हा योग्य मोबदला मिळाला होता; पण त्यांनी त्याचे चीज केले नाही.आज जनता पक्षाचे काही नेते भावी पंतप्रधान म्हणून चंद्रशेखर यांना प्रोजेक्ट करत असले तरी त्यांच्या स्वतःच्याच पक्षातील काहींचा त्यांनी अध्यक्ष म्हणून रहाण्यास विरोध आहे. मोरारजी व चंद्रशेखर यांचे कधीच पटले नाही. दक्षिणेतही चंद्रशेखर यांना म्हणावा तसा पाठिंबा नाही. उत्तरेत ते लोकप्रियतेच्याबाबतीत चरणसिंग व वाजपेयींच्या मागे आहेत, भारतपदयात्रेचा त्यांनी स्वतःचे महत्त्व वाढविण्यासाठी उपयोग केला अशी पक्षातीलच काहींनी टीका केली आहे.

पक्षबदलू, टोपी फिरवणारे, संधिसाधू म्हणून बहुगुणा प्रसिद्ध आहेत. प्रथम ते कॉंग्रेसमध्ये होते. नंतर १९७७ मध्ये कॉंग्रेसमधून जगजीवनराम यांच्याबरोबर बाहेर पडले तेही संजय गांधींशी न पटल्याने. मग जनता मंत्रिमंडळात त्यांनी सत्ता उपभोगली. चरण-सिंगांनी जनतापक्ष फोडल्यावर ते चरणसिंगांच्या बरोबर राहिले व पुन्हा सत्तेचे भागीदार झाले. नंतर १९८० च्या निवडणुकांनंतर इंदिरा कॉंग्रेसमध्ये गेले; परंतु तेथे आपल्याला कोणी किंमत देत नाही हे पाहून त्यांनी लोकशाही समाजवादी पक्ष काढला. बहुगुणांचे सहकारी त्यांचा कितीही उदोउदो करत असले तरी ते अखिल भारत-तीय नेते नाहीत. मौलाना बहुगुणा म्हणून काही जण त्यांना संबोध-तात. उत्तरप्रदेशातील मुस्लिमात ते बरेच लोकप्रिय आहेत. मात्र त्यांच्या गढवाल मतदारसंघाबाहेर ते फारसे परिचित नाहीत व पंतप्रधानपदाकरिता ते मुळीच लायक नाहीत! त्यांच्या पक्षबदलू वृत्तीने त्यांचा विरोधी पक्षांना भरवसा वाटत नाही. त्यांचा पक्ष स्वतःला अखिल भारतीय पक्ष म्हणवून घेत असला तरी तो प्रादेशिक पक्षाच्याच योग्यतेचा नाही.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री शरद पवार हे उत्तम संघटक, नेते आहेत. त्यांच्या एकटघाच्या रूपाने महाराष्ट्रात इंदिरा कॉंग्रेसला जबरदस्त आव्हान उभे राहिले आहे. शरद पवार हे उत्साही आहेत, उत्तम वक्ते आहेत व चांगले कार्यकर्तेही आहेत. जनता पक्षातील सर्व घटकांना एकत्र संभाळून मुख्यमंत्री म्हणून त्यांनी चांगली कामगिरी केली होती. मात्र त्यांचा पक्ष हा आता प्रादेशिक पक्ष बनला आहे. शिवाय शरद पवार हे अखिल भारतीय नेते म्हणून स्वतःची इमेज तयार करू शकले नाहीत. मात्र त्यांच्यातील नेतृत्वगुण वादातीत आहेत.

□

# मती गुंग करणारी स्वप्नं – त्यांचं विश्लेषण

प्रा. व. वि. अकोलकर

स्वप्नामध्ये माणसाला पुरातन कालापासून स्वारस्य वाटत आलेले आहे व स्वप्नांचे अर्थ लावण्याचे प्रयत्नही करण्यात आलेले आहेत. प्रत्येकाला स्वप्ने पडत असतात. हलकी झोप असते त्या वेळी पडत असतात व त्या वेळी बुबुळांच्या जलद हालचाली होत असतात. ही गोष्ट मेमोनाईडस् मेडिकल सेंटर, ब्रुकलिन येथील स्वप्नप्रयोगशाळेत– 'ड्रीमलॅबोरेटरीत–' करण्यात आलेल्या संशोधनाने सिद्ध झाली आहे. आपण जागे झालो की, चटकन स्वप्नावर पडदा पडतो व ते बरेच वेळा आठवत नाही इतकेच. प्रत्येक व्यक्तीस स्वप्ने पडतात इतकेच नव्हे तर मानसिक स्वास्थ्य टिकविण्यासाठी थोडी-फार स्वप्ने पडणे आवश्यक असते असेही काही मानसशास्त्रज्ञांचे मत आहे.

'व्यक्तीचे स्वप्न हे तिच्या मनाच्या अबोध-प्रांताप्रत नेणारा राजमार्ग होय', असे सिग्मंड फ्रॉइड ह्या मनोविश्लेषणपद्धतीच्या प्रणेत्यांनी म्हटलेले आहे. त्यांचे हे विधान आणखी एका अर्थानेही खरे आहे. माणसाच्या अंतरंगात काय दडलेले असते ते कळण्यास त्याच्या स्वप्नांची उकल उपयोगी पडते हे तर खरेच; परंतु हेही तितकेच खरे की, इंद्रियांच्या कक्षेपलीकडे असणाऱ्या वस्तूंचे, प्रसंगांचे वा घटनांचे ज्ञान कधीकधी मनाच्या अबोध पातळीवर होते व स्वप्नांचे रूप घेते. ह्या दृष्टीने पहाता, आपली स्वप्ने आपल्या ठिकाणी असलेल्या अतींद्रियज्ञानक्षमतेचा प्रत्यय आणून देणारी व म्हणूनच माणसाचे स्वरूप ( Nature of man ) समजून घेण्यास सहाय्यभूत ठरत असतात.

मानसशास्त्रीय परिभाषेनुसार, स्वप्नांची गणना अवस्तुभ्रमांच्या, अवभासांच्या ( हॅल्यूसिनेशन्स ) सदरात होते. कारण स्वप्नानुभव हा वस्तुबोधात्मक अथवा प्रत्यक्ष संवेदनात्मक नसतो. बाहेरील वस्तूंमुळे किंवा शरीरांतर्गत अवस्थांमुळे– उदा. गार पाण्याचा स्पर्श, वाऱ्याची थंड झुळुक, फुलांचा सुगंध, घड्याळाचा गजर किंवा वाद्याचा ध्वनी, तहान-भुकेची अवस्था, अपचन इत्यादींमुळे स्वप्ने पडतात हे कधीकधी खरे असले तरी खुद्द स्वप्न मात्र काही निराळेच पडते आणि स्वप्नात दिसणाऱ्या दृश्यांना आणखी काही अर्थही असू शकतो.

## फ्रॉइड यांची स्वप्नमीमांसा

आपल्या पुष्कळशा स्वप्नांचा अर्थ 'मनी असे ते स्वप्नी दिसे' ह्या सूत्रवजा म्हणीनुसार लागू शकतो. लहान मुलांना पडलेल्या स्वप्नांची कारणे शोधून काढणे तितकेसे कठीण नसते. प्रौढांच्या बाबतीत मात्र, त्यांच्या अंतरंगात काय असते हे इतरांनाच काय पण बहुधा त्यांचे त्यांनाच ठाऊक नसते. कारण, बालपणापासून कुटुंबियांच्यामुळे तसेच शिक्षणाद्वारे झालेले नैतिक संस्कार, त्यांतून अस्तित्वात आलेल्या सदसद्विवेक बुद्धीचे दडपण, जनाची तसेच स्वतःच्या मनाची लाज इत्यादींमुळे अप्रशस्त व लज्जास्पद वाटणारे विचार, भावनांचे आवेग व वासना यांचे इतके जोरदार दमन झालेले असते की, त्यांची जाणिवेतून हद्दपारी झालेली असते. अंतरंगात दवा धरून राहिलेल्या ह्या अप्रशस्त वासना व भावभावना झोपेमध्ये प्रतीकात्मक प्रसंग व त्यांची जणू कथानकासारखी गुंफण निर्माण करतात व माणसाची निद्रा भंग पावू न देता स्वतःची तृप्ती अप्रत्यक्षरीत्या आडमार्गाने करून घेत असतात. त्यामुळे, पुष्कळशा स्वप्नांचा अर्थ, माणसाला संमोहित अवस्थेत बोलायला लावून किंवा जागेपणी स्वप्नातील प्रसंग आठवावयास व एकेका प्रसंगाबरोबर मनात स्वैरपणे येणारे विचार बोलून टाकावयास लावून लावावा लागतो. बायकोच्या भावाचे दफन चालू आहे व त्याच्या तरुण व सुंदर पत्नीच्या शेजारी आपण उभे आहोत ह्या एका गृहस्थास पडलेल्या स्वप्नाचे मूळ. त्या स्त्रीविषयी असलेल्या पण व्यक्त करता येत नसलेल्या आकर्षणात होते असा फ्रॉइड यांनी अर्थ लावला होता व तो खरा ठरला. माझ्या एका सहकाऱ्यास स्वप्नात आणखी एक बायको दिसत असे. अहमदाबादच्या माझ्या विद्यार्थ्यास आपण आपल्याच वयाच्या सावत्र आईच्या पोटावर गरम सळईने टिचक्या मारीत असल्याचे स्वप्न पडत असे.

स्वप्नात दिसलेल्या अमुक अमुक वस्तू– उदा. पेन, पेन्सिल, छत्री, सर्प, वृक्ष, पेटी, दारे, खिडक्या, सज्जे वगैरे– म्हणजे अमुक शरीरावयवांची प्रतीके व स्वप्नात दिसलेल्या अमुक अमुक क्रिया– उदा. तरंगणे, जिना चढणे, घोड्यावर बसणे, घरात प्रवेश करणे इ. म्हणजे अमुक इच्छांच्या तृप्तीची प्रतीके असतात असे फ्रॉइडने प्रतिपादन केले. स्वाप्निक प्रतिमांचे (dream images चे) फ्रॉइडने बसवलेले अर्थ सार्वत्रिकपणे खरे असतीलच असे नाही. भिन्न भिन्न संस्कृतींमध्ये त्यांचे अर्थ भिन्नभिन्न असू शकतात.

## युंग यांची स्वप्नमीमांसा

सर्वच स्वप्ने अंतस्थ वासनांच्या आडमार्गी तृप्तीच्या स्वरूपाची असतात असे नव्हे तर आपल्या ठिकाणी असलेल्या परंतु अव्यक्त राहिलेल्या क्षमतांची आपल्याला जाणीव करून देत असतात व जीवनसाफल्याचा मार्ग सुचवीत असतात, असे डॉ. कार्ल गुस्ताव युंग यांनी प्रतिपादन केले आहे. माणसाच्या जाणिवेच्या पलीकडे असलेल्या अबोध प्रांतात, पुरातन मानवांनी केलेल्या अर्थात अतिप्राचीन अशा कल्पनाही (archetypes) उदा. जन्म–मृत्यूविषयीच्या राक्षस, डाकीण, वृद्ध, सुज्ञ इत्यादि कल्पना साठविलेल्या असतात व त्याही स्वप्नांमधून डोकावत असतात असेही युंग यांनी म्हटले आहे,

स्वप्नातील काही काही प्रतिमांचे व प्रसंगांचे युंगनी लावलेले अर्थही फ्रॉइड यांनी बसवलेल्या अर्थाहून निराळे आहेत, उदा. जिना चढून जात असल्याचे स्वप्न हे जीवन यशस्वी करण्याच्या आकांक्षेचे प्रतीक होय व स्वप्नातील बालक-जन्म म्हणजे जीवनाला नवा प्रारंभ होत असल्याचे प्रतीक होय असे युंग यांनी म्हटले आहे.

मानसशास्त्रज्ञ प्रोफेसर विल्यम मॅकडूगल युद्धकालीन सैन्यात होते त्या वेळी त्यांच्या स्वप्नात त्यांना तंबूच्या दारांमधून छोटी छोटी बालके डोकावत असल्याचे दृश्य दिसले. मॅकडूगल यांना त्यांच्या ठिकाणी असलेल्या परंतु वाव न मिळालेल्या सर्जनशील कला-प्रवृत्तींची जाणीव करून देणारे ते स्वप्न होते असा युंग यांनी त्या स्वप्नाचा अर्थ लावला होता व मॅकडूगल यांना तो अर्थच योग्य वाटला.

१९३७ साली मला पडलेले व आजही तसेच्या तसेच स्पष्टपणे स्मरणात असलेले स्वप्नही याच सदरातले असावे. नुकताच मी एम. ए. झालो होतो. महात्मा गांधींना मला भेटवून स्वतःच्या कार्याकडे मला आकर्षित करावे ह्या हेतूने काकासाहेब कालेलकरांनी वर्ध्यास बोलावल्यावरून मी तेथे जाऊन आलेलो होतो. कोणता मार्ग स्वीकारावा हा प्रश्न मनात येत होता, अशा परिस्थितीत पडलेले ते स्वप्न. मी वडिलांचे समोर बसलेलो आहे व विचारतो आहे की, माझे जीवन सार्थकी कशाने लागेल ? वडील म्हणाले, 'न ध्यानेन.' मी पुनः विचारले. ते म्हणाले, 'न सेवया.' तिसऱ्यांदा प्रश्न केला तेव्हा ते म्हणाले, 'ज्ञानेन'. मला आजही वाटते की, स्वप्नात वडिलांच्या रूपाने माझेच अंतरंग माझ्या जीवनमार्गाचे सूचन करीत होते.

## विचारार्ह स्वप्ने

काही स्वप्ने मात्र अशी असतात की, ज्यांची गणना 'परासामान्य' पॅरानॉर्मल-म्हणून करावीशी वाटते. डॉ. वाल्टर फ्रँकलिन प्रिन्स यांनी स्वप्नांच्या परासामान्यत्वाची दोन लक्षणे सांगितलेली आहेत. एक म्हणजे, ही स्वप्ने जेव्हा जेव्हा आठवतात त्या त्या वेळी तीव्र भावना अनुभवास येते व प्रत्यक्ष अनुभवामुळे निर्माण होणाऱ्या भावनांइतकीच ती तीव्र असते (Emotionality). दुसरे लक्षण म्हणजे त्या स्वप्नातील प्रतिमा-इमेजरी-इतकी सुस्पष्ट असते की, कित्येक महिने लोटले तरीदेखील त्या प्रतिमा तितक्याच स्पष्टपणे अनुभवास येतात, स्वप्नात अनुभवलेले तेच दृश्य, तोच स्पर्श, ध्वनि वगैरे अगदी तसेच्या तसेच आठवतात.

अशी स्वप्ने माणसाच्या ठिकाणी अतींद्रियसंवेदनक्षमता (ESP) असल्याची, परासंवित्‌शक्ती (PSI) असल्याची साक्ष देतात. अर्थातच माणसाचे स्वरूपाविषयीचे (Nature of Man) ज्ञान करून घेण्याच्या दृष्टीने अशी स्वप्ने विचारात घ्यावी लागतात.

१२ जुलै १९६१ रोजी श्री. ए. के. गोगटे हे नागपूरच्या आकाशवाणी-कार्यालयात श्रीमती आशाताई कुलकर्णी वगैरे सहकाऱ्यांशी बोलत बसले असताना दुपारी दोनच्या सुमारास त्यांना पाण्याचा मोठा आवाज, तसेच त्या वेळी पुण्यास असलेला मुलगा स्वानंद व पुतणी रत्ना यांचे आवाज ऐकू आले आणि बरोबर त्याच वेळी पानशेत धरण फुटून पुणे जलमय झाले होते व ही दोन मुले बुडण्याच्या बेतात होती हा श्री. गोगटे यांचा अनुभव जागृतावस्थेतील अतींद्रिय प्रत्यक्षाचे उदाहरण होय. चर्चमध्ये प्रवचन ऐकत असलेल्या तरुणीस कोपऱ्यातील भिंतीवर एका मोठ्या विमानातून ज्वाळा येत असल्याचे दृश्य दिसू लागले व बरोबर त्याच दिवशी व वेळी (१९४४ मध्ये) फ्रँकफुर्टवर हल्ला करून परतणारे विमान पाडण्यात आले होते व त्यात असलेला त्या तरुणीचा मित्र युद्धकैदी म्हणून पकडला गेला होता हेही याच सदरातले विश्वासार्ह म्हणून पारखून घेतले गेलेले असे उदाहरण होय.

स्वप्नांमध्ये ते ते दृश्य दिसल्याची ही उदाहरणे आहेत.

श्री. त्र्यं. वा ऊर्फ आप्पासाहेब तळवलकर यांनी लिहून दिलेला स्वप्नानुभव या सदरात पडणारा आहे. 'मी अमेरिकेत होतो (१९२२-२७). तेव्हा एक दिवस, स्वप्नात धाकट्या काकींचे शव खाली आणीत असल्याचे दिसले डायरीत लिहून ठेवले. बरोबर २१ दिवसांनी वडिलांचे पत्राने कळले-काकी त्याच वेळी वारल्या होत्या!

नातू तापाने फणफणलेला आहे व त्याचे आपण चुंबन घेत आहोत, तसेच शेजारी मुलगा उभा असून त्याच्या कपाळातून भळभळ रक्त वाहते आहे असे स्वप्न पडत होते त्याच वेळी मुलीच्या घरी नातवास ताप चढलेला होता आणि बेल टेलिफोन कंपनीत काम करणाऱ्या मुलाच्या कपाळास खोक पडली होती हे श्रीमती डॉ. लॉराडेल यांनी अभ्यासलेले उदाहरणही उल्लेखनीय होय.

परामानसशास्त्रीयदृष्ट्या महत्त्वाचा असा स्वप्नांचा दुसरा वर्ग म्हणजे अनागताचे ज्ञान म्हणजेच भावी घटनांचे पूर्वज्ञान करून देणारी स्वप्ने (प्री-कॉग्निटिव). जागृत अवस्थेत भावी घटनांचे आगाऊ ज्ञान झाल्याची उदाहरणे आहेत. तंद्रावस्थेत तसेच संमोहित अवस्थेत-हिप्नॉसिस-मध्ये झाल्याची उदाहरणे आहेत. त्याप्रमाणेच प्रतीकात्मक प्रतिमांच्या किंवा वास्तवप्राय प्रतिमांच्या रूपाने स्वप्नांमध्ये पूर्वज्ञान झाल्याची कित्येक उदाहरणे आहेत. स्वप्नात पाहिलेली घटना कालांतराने प्रत्यक्षात घडली, स्वप्नात केलेली कृती पुढे खरोखरच करण्याचा प्रसंग आला; स्वप्न पडले म्हणून त्यानुसार जी गोष्ट केली, जो निर्णय घेतला तो पुढे योग्यच ठरला, असे स्वानुभाव अनेक वाचकांच्या संग्रही असतील. जागृतावस्थेत म्हणा अथवा स्वप्नरूपाने म्हणा, अजून जे घडलेच नाही त्याचे ज्ञान कसे होऊ शकेल हा प्रश्न सध्याच्या विज्ञानाला तसेच तत्त्वचिंतकांना बुचकळ्यात टाकणारा खरा. तथापि पूर्वज्ञान झाल्याची उदाहरणे आहेत हेही तितकेच खरे.

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांना त्यांची हत्या होण्यापूर्वी काही दिवस अगोदर स्वप्न पडले होते की, व्हाइट हाउसमध्ये रडण्याचे आवाज ऐकू येत आहेत. स्वतःच्या खोलीत जाऊन पहातो तो तेथे पलंगावर शुभ्र वस्त्रात गुंडाळलेले प्रेत आहे व भोवती सैनिक उभे आहेत. त्यापैकी एकास विचारता तो सांगतो आहे की, 'राष्ट्राध्यक्षांचा खून झाला!'

पूर्वज्ञानात्मक स्वप्नाचे एक विश्वसनीय उदाहरण काही दिवसांपूर्वी प्रसिद्ध झाले आहे ते असे :- अमेरिकेतील श्री. ी. बी. या गृहस्थास १९७९ च्या मे महिन्यात लागोपाठ दहा रात्री स्वप्न पडले की, अमेरिकन एअरलाइन्सचे एक विमान कोसळत आहे. २२ मे ७९ रोजी त्यांनी ही गोष्ट त्या कंपनीच्या अधिकाऱ्यांना तसेच सिनसिनाटी येथील अधिकाऱ्यांनाही कळवली होती. (हे त्या अधिकाऱ्यां-

नीही निवेदन केलेले आहे. ) २५ मे १९७९ रोजी अमेरिकन एअर लाइन्सचे Dc–10 हे विमान शिकागोच्या विमान शिकागोच्या तळावर खरोखरच कोसळले व जळाले.

## टेलेपथी

परामानसशास्त्रीयदृष्ट्या महत्त्वाची अशी काही स्वप्ने मनोमन संपर्कमूलक स्वप्ने (टेलेपॅथिक) या सदरात पडतात. 'टेलेपथी' ही संज्ञा फ्रेडरिक मायर्स यांनी प्रथम वापरली. एका व्यक्तीचे मनोगत–तिचे विचार, तिच्या मनातील ईप्सित वगैरे तिने कोणत्याही प्रकारे व्यक्त न करताच दुसऱ्याला जाणवणे म्हणजे टेलेपथी. टेलेपथीच्या बहुतांश उदाहरणांमध्ये त्या दोन व्यक्ती एकमेकींच्या दृष्टीसमोर नसतात. असा अनुभव जागेपणी आल्याची विविध उदाहरणे आढळतात. श्रीमती डॉ. लुइसा ऱ्हाइन इस्त्री करीत असताना आपण बरेच दिवसात श्रीमती मॅकडूगलकडे गेलो नाही हा विचार आला व नेमक्या त्याच वेळी त्यांच्या अडीच वर्षांच्या मुलीने म्हटले, 'मम्मी, आज आपण 'डूगल'बाईकडे जाऊ या का?' इकडे न्यूजर्सीच्या रस्त्यावर मोटर चालवता चालवता वडिलांच्या छातीत जोराची कळ आली आणि त्याच वेळी त्यांचा मुलगा मोटरअपघातात छातीवरून चाक गेल्याने मृत्यू पावला असा थोड्या वेळात फोन आला. गीतेतील एका श्लोकाचा अडलेला अर्थ विचारण्यासाठी म्हणून कै. पंडित सातवळेकर एका आश्रमनिवासी सत्पुरुषांकडे गेले व काही बोलणार त्यापूर्वीच या सत्पुरुषांनी म्हटले. 'काय,... हा श्लोक अडला आहे ना?' जागेपणी झालेल्या मनोमन संपर्काची ही उदाहरणे होत.

संमोहनकर्ता व संमोहित व्यक्ती यांच्यात टेलेपथी घडून आल्याची बिनप्रायोगिक तसेच प्रयोगसिद्ध उदाहरणे देखील अनेक आहेत. डॉ. अझम, प्यार झ्याने, इलिअटसन ह्या मनोवैद्यांनी त्यांचे स्वानुभव प्रसिद्ध केलेले आहेत. सिग्मंड फ्रॉइड यांनी 'टेलेपथीच्या शक्यतेविषयी अधिक सहृदयतेने (काइंडली) विचार करावा' असे १९३३ मध्ये सुचवले. तेव्हापासून येन एन्हेनवाल्ड, बी. श्वार्टझ, यूल आयझेनबुड, मॉंटेग्यू उल्लमन इत्यादी मनोविश्लेषकांनी ते आणि मनोरुग्ण यांच्यात घडलेल्या टेलेपथीसूचक घटना प्रसिद्ध केल्या आहेत.

रशियात प्रो. व्हॅसिलिअेव (लेनिनग्राड विद्यापीठ) व इतर वैज्ञानिकांचे दूर अंतरावरून व्यक्तीला संमोहित करण्याचे प्रयोग ख्याती पावले आहेत.

आता, मनोमन संपर्कामुळे एकाचे मनोगत दुसऱ्याला जाणवते तेव्हा, म्हणजेच टेलेपथी घडून येते त्या वेळी, हा संपर्क साक्षात मनामनांचा असतो की, कोणत्या तरी अन्य ऊर्जेच्या माध्यमातून होत असतो? परामानसशास्त्रीय संशोधनक्षेत्रात हा चर्चेचा विषय बनून राहिलेला आहे. दुसराही एक प्रश्न उपस्थित झालेला आहे. स्वप्नांच्या संदर्भात तो महत्त्वाचा आहे. टेलेपथीमध्ये संपर्क साधते ते मन कोणाचे? ज्याचे मनोगत (इच्छा, भावना वगैरे) दुसऱ्यास जाणवते त्याचे की ज्याला दुसऱ्याचे मनोगत जाणवते त्याचे? कोणाचे मन पुढाकार घेत असते? हा तो प्रश्न होय. गेल्या शतकापासून गृहीत धरण्यात आलेली एक कल्पना अशी की, जिचे मनोगत दुसऱ्याला जाणवते ती व्यक्ती 'प्रेषक' (सेंडर वा एजंट) असते व मनोगत जाणवणारी व्यक्ती ग्रहणकर्ती (रिसीवर वा पर्सिपिअंट) असते. फ्रेडरिक मायर्स, एडमंड गर्ने, पॉडमोर टिरेल यांनी ही कल्पना बाळगली होती व तिला अनुसरून त्यांनी असे सुचवले की, एखाद्या हयात परंतु प्रत्यक्षात त्या वेळी दुसऱ्या ठिकाणी असलेली व्यक्ती आत्ता इथे येऊन, भेटून, बोलून गेली अशा स्वरूपाचे–म्हणजेच; एकपरी, जिवंत व्यक्तींच्या भुतांचे (Fantasms of the living) जे अनुभव येतात त्यांना तिच्या मनाकडून झालेले प्रेषण किंवा विचार-संक्रमण हे मूलतः कारणीभूत असते व ग्रहणकर्त्याच्या ठिकाणी अवभास वा अवस्तुभास (हॅल्यूसिनेशन्स) उत्पन्न होत असतात. टेलेपथीच्या स्वरूपाविषयीच्या ह्याच कल्पनेस अनुसरून, मृत व्यक्तींच्या भुतांचा प्रत्यय म्हणजे मृताने साधलेल्या संपर्कामुळे निर्माण झालेला आभास असतो असे स्पष्टीकरण देण्यात येत असे. माध्यमांच्या तोंडून वा हातून येणाऱ्या 'संदेशांची' कारणमीमांसादेखील ह्याच कल्पनेस धरून करण्यात येत असे.

श्रीमती डॉ. लुइसा ऱ्हाइन यांनी मात्र टेलेपथीच्या स्वरूपाबाबत निराळी कल्पना प्रस्तुत केली आहे. ती अशी : वस्तूचे किंवा प्रसंगाचे अतींद्रिय प्रत्यक्ष (क्लेअरव्हॉयन्स) तसेच पूर्वज्ञान (प्रीकॉग्निशन) या दोन प्रकारात ज्याप्रमाणे व्यक्तीची स्वतःचीच परासंवित्‌शक्ती (psi) कार्यशील असते व 'लक्ष्या'शी (target) संपर्क साधीत असते तसाच प्रकार टेलेपथीतही होत असावा. दुसऱ्याचे मनोगत जाणवणाऱ्या व्यक्तीची परासंवित्‌शक्ती परिसरातील मनांची टेहळणी (स्कॅनिंग) करीत असेल व एखाद्या व्यक्तीचे मन तिचे 'लक्ष्य' बनत असेल. श्रीमती ऱ्हाइन यांनी त्यांच्या 'ड्यूक' संग्रहातून तसेच इतरांच्या संग्रहातून अशी अनेक उदाहरणे उद्धृत केली आहेत की, ज्या व्यक्तीचा स्पष्टपणे भास झाला तिला भास होणाऱ्याला भेटण्याची इच्छा झालेली नव्हती, इतकेच काय पण त्या दोन व्यक्तींचा परिचय भावनात्मक नमून केवळ प्रासंगिक (कॅज्युअल) स्वरूपाचा होता. (Jour Parapsy, मार्च व डिसेंबर १९५६).

तथापि, याउलट अशीही उदाहरणे आढळतात की, 'अ' ला 'ब' चा भास झाला त्या वेळी 'ब' हा 'अ'विषयी विचार उत्कटतेने करीत होता, 'अ'ला भेटण्याची, काही तरी सांगण्याची उत्कट इच्छा 'ब'च्या मनात होती, इतकेच नव्हे तर 'अ'ला झालेला भास आणि त्या वेळी असलेली 'ब'ची स्थिती व परिस्थिती यामध्ये जवळजवळ तंतोतंत साम्य होते. अशी उदाहरणे नमूद असल्याचे श्रीमती ऱ्हाइन यांनीही म्हटले आहे आणि अशा उदाहरणांकडे प्रो. हॉर्नेल हार्ट, प्रो. डॉ. आयान स्टीवन्सन वगैरेंनी विशेष लक्ष वेधले आहे व एका व्यक्तीच्या मनाकडून झालेले प्रेषण किंवा विचार–संक्रमण हे टेलेपथीच्या मुळाशी असू शकते हे पूर्वीचे मत उचलून धरले आहे. (Jour Parapsy, June 1970).

आता, टेलेपथी हा प्रकार व त्याचे स्वरूप लक्षात घेतले की काही स्वप्ने टेलेपथीमूलक असतात ही गोष्ट ध्यानात येते. गंभीर अपघातात सापडलेल्या व्यक्तीची हाक दुसऱ्या व्यक्तीला स्वप्नात ऐकू आली, मृत्यूच्या उंबरठ्यावर असलेली व्यक्ती स्वप्नात दिसली व बोलली, स्वप्नात एकाने दुसऱ्याचा अखेरचा निरोप घेतला; दोन जणांना एकाच वेळी तंतोतंत सारखे स्वप्न पडले इत्यादि प्रकारची स्वप्ने टेलेपथिक–मनोमनसंपर्कमूलक होत. त्यांपैकी काही स्वप्नांच्या मुळाशी स्वप्न पडणाऱ्याच्या मनाने साधलेला संपर्क असू शकेल, तर

काही स्वप्नांना स्वप्नात आलेल्या व्यक्तीचे मन कारणीभूत असू शकेल. उदा.– गुरुवर्य डॉ. रा. द. रानडे यांचे प्राणोत्क्रमण झाले त्या सुमारास त्यांचे प्रियशिष्य डॉ. आर. व्ही. गोकाक यांना रानडे हे आपला अखेरचा निरोप घेत आहेत असे स्वप्न पडले होते. (त्यांचा तो अनुभव अनेक वर्षे माझ्या संग्रही होता.) चीनमध्ये असलेल्या स्त्रीला स्वप्नात तिच्या आईने मारलेल्या हाकेने जाग आली व नेमक्या त्याच वेळी अमेरिकेत मृत्युशय्येवर असलेली तिची आई मुलीला बोलवा म्हणून म्हणत होती हे उदाहरण डॉ. जे. बी. ऱ्हाइन यांच्या संग्रही होते. एका व्यक्तीचा आदेश स्वप्नात मिळाला किंवा कोणा सत्पुरुषाने स्वप्नामध्ये औषधोपचार सांगितला अशीही उदाहरणे ऐकिवात आहेत.

## मरणोत्तर अस्तित्वसूचक स्वप्ने

टॅलेपथी हा प्रकार मान्य केला की आणि उत्स्फूर्त अशा अनुभवामुळे तसेच प्रयोगसिद्ध पुराव्यामुळे तो मान्य करावाच लागतो. तसेच, 'अ' ला जागेपणी म्हणा अथवा स्वप्नरूपाने म्हणा झालेल्या 'ब' च्या भासाच्या मुळाशी 'ब' च्या इच्छा, भावनात्मक अवस्था, हेतू वगैरे असू शकतात ही गोष्ट मान्य केली की, स्वप्नाचा आणखी एक वर्ग पडू शकतो. दिवंगत झालेली व्यक्ती स्वप्नात दिसली व तिने असे ठिकाण दाखवले किंवा स्वत:विषयी वा अन्य काही अशी गोष्ट सांगितली किंवा असा काहीएक आदेश दिला की त्याचा संबंध त्या मृत व्यक्तीच्याच हेतूशी असला पाहिजे, त्या 'मृताच्या मनाने' आपण होऊन स्वप्न पडणाऱ्याच्या मनाशी संपर्क साधला असला पाहिजे असे म्हणावे लागते, अशा स्वप्नांचा तो वर्ग होय. मरणोत्तर अस्तित्वाच्या प्रश्नाच्या संदर्भात दुरावा म्हणून, निर्णायक नसला तरी सूचक पुरावा म्हणून,– ज्या विविध प्रकारच्या घटना विचारार्ह ठरतात त्यामध्ये या वर्गातील स्वप्नांचा अंतर्भाव होतो.

(कै.) नानासाहेब सप्तर्षी (अहमदनगर) यांनी कथन केलेली एक घटना श्रीमती सुशीलाबाई ऊर्फ माई सप्तर्षींनी मला कळवली ती या संदर्भात उल्लेखनीय आहे. नानासाहेबांच्या शब्दात ती अशी :–

'...मी नवीनच वकील झालो होतो. कोपरगावला सुरुवात केली होती... जवळच्याच एकुरक्याचे शेतकरी थोराजी पाटील यांचे शेताच्या हद्दीवरून चाललेले भाऊबंदकीचे भांडण कोर्टापुढे होते. त्यांचा परिचय झाला होता. त्यांची बायको राहीबाई व ६।७ वर्षांचा मुलगा सुकदेवही कधीकधी घरी येत. हे भांडण वाटप होऊन एकदाचे मिटले. काही महिन्यांनी एक दिवस राहीबाई सुकदेवला घेऊन रडत आली. थोराजी पाटलाचा चार दिवस पत्ताच लागत नव्हता. मी पोलिसांना कळवले. थोराजीच्या फोटोसह जाहिरात दिली...पण शोध लागेना. वर्षे निघून गेली. सुकदेव १६।१७ वर्षांचा तरुण झाला व बापाचे सर्व शेतकारभार बघू लागला. एक दिवस सुकदेव जागा झाला तोच आईला त्याला रात्री पडलेले स्वप्न सांगू लागला. त्या स्वप्नात त्याला त्याचे वडील त्यांच्या शेतात उभे दिसले. त्यांनी त्याला जवळ बोलावून घेतले. ते पाठमोरे झाले व त्यांच्या चुलतभावाने घाईने येऊन त्यांच्या मानेवर कुऱ्हाड मारली, मस्तक तुटून खाली पडले; त्या चुलतभावाने समोरच्याच चिंचेखाली खूप खोल खड्डा केला. त्यात ते प्रेत, मुंडासे व कुऱ्हाड पण टाकली. माती टाकून खड्डा बुजवून, वर पालापाचोळा पसरून तो निघून गेला. हे सारे सुकदेवला स्वप्नातच दिसले.

'...मायलेक माझ्याकडे हे स्वप्न सांगायला आली... स्वप्नच चमत्कारिक वाटले. तरी पण याचा शोध घेऊन पडताळा बघावा अशी आम्हा काही तरुणांना इच्छा झाली ..त्या गावी जाऊन तेथील पोलीसपाटलाला घेऊन शोध घ्यायचे ठरवले...आम्ही दोन-चार जण एक मजूर व सुकदेव याला घेऊन थोराजी पाटलांच्या शेतात सकाळीच गेलो. सुकदेवने ती चिंचेखालची जागा दाखवली. खूप खणले. बारा वाजले. सगळे म्हणाले 'स्वप्न ते स्वप्नच!' पण सुकदेवला राहवेना. त्याने कुदळ घेऊन आणखी खोल खणायला सुरुवात केली नी काय आश्चर्य !

थोराजीचे चिंध्या झालेले लाल मुंडासे बाहेर दिसले. माती उपसल्यावर हाडांचा सांगाडा, कवटी व गंजलेली कुऱ्हाड पण सापडली. पुढे रीतसर केस चालून गुन्हेगारास शिक्षा झाली !

कोणी म्हणतील की त्या भूतकालीन घटनेचे ज्ञान सुकदेवला अतींद्रियरीत्या झाले असावे व त्यातून स्वप्ननिर्मिती झाली असावी; परंतु वडील बेपत्ता असण्याचे व त्यांच्या मृत्यूचे रहस्य मुलास कळावे हे त्या स्वप्नाचे प्रयोजन लक्षात घेता, स्वप्नाला दिवंगत थोराजीचा हेतूच कारणीभूत होता असे समजणेही सयुक्तिक का म्हणू नये ?

## स्वप्नातला रॉबर्ट मॅकेन्झी

लंडनच्या 'सोसायटी फॉर सायकिकल रीसर्च' च्या संग्रही असलेले पुढील स्वप्नही महत्त्वाचे आहे. ग्लासगो येथे व्यवसाय करणाऱ्या एका गृहस्थाकडे रॉबर्ट मॅकेन्झी हा पोरगा नोकरीस होता. तीनचार वर्षांनंतर त्याने नोकरी सोडली. काही काळानंतर त्या गृहस्थांना तो भुकेने वखवखलेल्या अवस्थेत मॅकेन्झी रस्त्यावर आढळल्यामुळे त्याची कणव येऊन त्यांनी त्याला पुन: कामावर लावून घेतले. ते गृहस्थ पुढे लंडनला स्थायिक झाले. त्यांच्या ग्लासगो येथील कामावर असलेला मॅकेन्झी त्यांच्या स्मरणातूनही गेला.

एके मंगळवारच्या सकाळी त्या गृहस्थांना अगदी स्पष्ट व सुसंगत असे स्वप्न पडले. त्यांच्याच शब्दात ते असे–

'मी टेबलापाशी बसून कोणाशी कामाचे बोलतो आहे. तेवढ्यात समोरून मॅकेन्झी जवळ आला. मी रागावलो म्हणून जरा मागे


**सांगत्ये ऐका**

हंसा वाडकर

आवृत्ती चौथी

किंमत : चौदा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

सरला; पण पुन: जवळ आला. मी त्याला रीतभात नसल्याबद्दल आणखीच टोचून बोललो. तो परका माणूस निघून गेला आणि मॅकेन्झी पुन: जवळ आला. मी त्याला म्हटले, 'अरे, हा काय प्रकार आहे? मी कामात आहे हे दिसत नाही?' तो म्हणाला, 'होय साहेब, पण तुमच्याशी मला ताबडतोब बोललेच पाहिजे ... मी जी गोष्ट केलेली नाही ती केल्याचा माझ्यावर आरोप केला गेला आहे हे तुम्हाला ठाऊक व्हावे आणि मी निर्दोष असल्याने तुम्ही तरी मला त्या आरोपाबद्दल क्षमा करावी हे मला तुम्हाला सांगायचे आहे!' 'अरे पण कशाचा आरोप?' असे मी दोनदा विचारले. त्यावर 'तुम्हाला लवकरच कळेल' असे तो तीनदा म्हणाला... स्वप्नात मला मॅकेन्झीचा चेहरा निळसर व फिकट दिसला व त्याच्या कपाळावर घामाचे थेंब दिसले.'

हे गृहस्थ जागे होऊन त्या स्वप्नाविषयी विचार करताहेत तोच पत्नी लगबगीने आली व ग्लासगोच्या व्यवस्थापकाने पाठवलेले पत्र तिने त्यांच्या हातात दिले. शनिवारी मॅकेन्झीने आत्महत्या केली असे त्यात लिहिलेले होते; पण ह्या गृहस्थांनी पत्नीला अगदी शांतपणे आणि ठामपणे म्हटले, 'छे! त्याने आत्महत्या केलेली नाही. मला तसे सांगायला तो आत्ताच येऊन गेला!'

'दुसऱ्या दिवशीच्या टपालाने ग्लासगोहून व्यवस्थापकाचे चुकीची दुरुस्ती म्हणून दुसरे पत्र आले. त्याने कळवले की, 'पक्ष्यांच्या पिंजऱ्यांना रोगण म्हणून जे अतिविषारी द्रावण मॅकेन्झी वापरीत असे ते तो शनिवारी रात्री व्हिस्की म्हणून चुकून एका घोटात प्यायला होता व तडफडून मेला! ... 'तुम्हाला लवकरच कळेल' ह्या स्वप्नातील मॅकेन्झीच्या वाक्याचा अर्थ ह्या दुसऱ्या पत्राने मला कळला व मला असे वाटले की, त्याच्याविषयीचे माझे मत चांगलेच राहावे ह्या हेतूने मॅकेन्झी माझ्या स्वप्नात आला होता.'

मॅकेन्झी तडफडत होता त्याच क्षणी ह्या गृहस्थांना जागेपणी किंवा स्वप्नात जर तो दिसला असता तर आणि काही तरी प्यायला असल्याचे जर दिसले असते तर कदाचित असे म्हणता आले असते की, ह्या गृहस्थांच्या अवभासाचे वा अवस्तुभ्रमाचे मूळ त्या वेळी जिवत असलेल्या मॅकेन्झीच्या मनाशी झालेल्या संपर्कामध्ये तसेच अतींद्रियसंवेदनेमध्ये होते; परंतु हे स्वप्न तर त्याच्या मृत्यूनंतर पडले होते ही गोष्ट महत्त्वाची आणि 'तुम्हाला लवकरच कळेल' हे वाक्यही तितकेच महत्त्वाचे होय.

## चॅफिन यांचे मृत्युपत्र

सबळ कागदोपत्रांचा आधार असलेले हे उदाहरण अतिशय प्रसिद्ध आहे. श्री. चॅफिन यांनी एक मृत्युपत्र योग्य त्या प्रकारे साक्षी घालून घेऊन केले होते. त्यात त्यांनी कुटुंबाची सर्व मालमत्ता आपल्या चार मुलांपैकी फक्त एकासच दिलेली होती. त्या मृत्युपत्रान्वये त्यांच्या मृत्यूनंतर ती त्या मुलास देण्यात आलीही. पुढे चार वर्षांनंतर दुसऱ्या मुलाच्या स्वप्नात वडील आले व त्यांच्या जुन्या ओव्हरकोटाकडे बोट दाखवून त्या कोटाच्या खिशात पहा म्हणून ते म्हणाले. तिसऱ्या भावाच्या घरात तो कोट सापडला. त्याच्या खिशात एक कागदाची सुरळी टाचून ठेवलेली आढळली व त्या कागदावर कुटुंबाच्या नित्यपाठातील बायबलच्या एका पानाचा उल्लेख होता.

त्या पानावर ते बायबल उघडून पहाता, त्या पानाच्या घडीमध्ये जी. चॅफिन यांनी पहिल्या मृत्युपत्रानंतर केलेले दुसरे मृत्युपत्र सापडले. त्यात मालमत्तेची चारही भावांना समान वाटणी करून ठेवण्यात आलेली होती डेव्ही काउंटी (नॉर्थ कॅरोलायना, अमेरिका) कोर्टाने ते श्री. चॅफिननीच स्वत:च्या हस्तक्षरात लिहिलेले मृत्युपत्र असल्याची खात्री करून घेतली व त्या मृत्युनुसार मालमत्तेची अविरोध वाटणी झाली. (Proceedings S. P. R. १९२७ नोव्हेंबर)


## स्वप्नात मिळालेला आदेश

मी कर्नाटक कॉलेजात (धारवाड) असताना के. ई. वोर्डच्या कॉलेजचे प्राचार्य श्री. नारायणराव कुलकर्णी यांनी त्यांच्या स्वत:च्या बाबतीत घडलेली घटना मला निवेदन केली ती अशी: प्राचार्य होण्यापूर्वी ते राणीबेन्नूर येथे वकिली करीत होते त्या वेळची ही घटना. एके दिवशी, परगावचे एक गृहस्थ 'नारायणराव कुलकर्णी कुठे राहातात' असे विचारीत विचारीत त्यांच्या घरी आले. 'कोण, कोठून', वगैरे प्रश्न करता ते म्हणाले, 'मी इंदूरहून आलो आहे. माझ्या स्वप्नात एक सत्पुरुष आले व त्यांचा आदेश झाला की, 'कर्नाटकात राणीबेन्नूर येथे जा व तेथे नारायणराव कुलकर्णी नावाच्या गृहस्थांना हा पूजाविधी सांग', त्या आदेशानुसार मी तपास करीत आलो.'

हे स्वप्नात दिसलेले सत्पुरुष त्या वेळी हयात असलेले शेवटचे कोणी होते काय हे समजण्यास मार्ग नव्हता. जर ते कोणी दिवंगत सत्पुरुष असतील तर मात्र हे स्वप्न मरणोत्तर अस्तित्वाच्या प्रश्नाच्या संदर्भात महत्त्वाचे म्हणावे लागेल. □




# कुंपण आणि आकाश



मंगला गोडबोले

'गृहिणीला घरकामाचा मोबदला मिळावा का ?'–हा प्रश्न टिंगल करून सोडून देण्यासारखा नाही. हा प्रश्न विचारला जाण्यामागे कौटुंबिक-पतिपत्नी-संबंधाकडे डोळसपणानं बघायचा दृष्टिकोन हवा. केवळ भावनिक दबावाखाली काही नात्यांचं उदात्तीकरण करायचं की फेरतपासणीही आवश्यक आहे ?

गृहिणींना घरकामाचा मोबदला मिळावा काय ? या विषयावर 'सुंदर माझे घर' मध्ये चर्चा झाली तेव्हा योगायोगानं माझ्या घरी साताठ बायका जमलेल्या होत्या. वयाच्या, सांसारिक स्थितीच्या, शिक्षणाच्या वेगवेगळ्या स्तरांमधल्या त्या बायका होत्या. नाही म्हणायला आर्थिक गटांचं फारसं वैविध्य त्यात नव्हतं; पण असल्या चर्चा(च) जिथे मोठ्या चवीनं रंगविल्या जातात त्या सुशिक्षित मध्यमवर्गीयांचं पुरेसं प्रतिनिधित्व या गटातूनही होत होतं. त्यामुळं या बायकांच्या प्रतिक्रिया समजून घ्यायला मी उत्सुक होते.

–'शी: उगाचच काही तरी काल्पनिक विषय घ्यायचे आणि काथ्याकूट करत बसायचं' टी. व्ही.चं बटण् बंद करताच एकीन नाक मुरडलं. तिनं विषयालाच रद्द करून टाकलं होतं जणू काही.

–'नाही तर काय......असे घरातल्या कामाचे हिशोब कसे बाई करायचे ? आणि दर वेळी पैसे तरी कसले घ्यायचे ?'

–'आणि समजा दर ठरवून, घासाघीस करून पैसे घेतलेच तर आपल्यात आणि मोलकरणींमध्ये फरक काय ?' तिसरीनं तिच्या मते तार्किक मुद्दा मांडला; पण तिला परस्परच उत्तर मिळालं, 'मग आज आपल्यात आणि मोलकरणींमध्ये फरक आहेच कुठं ?वुई आर ग्लोरिफाईड सर्व्हंटस्' एक बॉबकट त्वेषानं हलला. वातावरण थोडंसं गढूळ झालं.

'अगदी असंच नाही म्हणता येणार; पण शेवटी 'मोले घातले रडाया' असे संसार चालतात का ?' आणखी एकीनं थेट भावनेलाच हात घातला आणि साहजिकच विषय खुंटला. विषयाला हात घालणं टाळायचं असलं की, भावनेला हात घात घालणं हा शॉर्टकट आपल्याकडे भलेभलेही वापरतात. त्यात हा विषय तर पत्नीपण, गृहिणीपण, आईपण यासारख्या महान त्यागमय नात्यांशी जोडलेला; त्यामुळं विषयाच्या डोळ्याला डोळा भिडवून बघण्याचं सामर्थ्य असतं किती जणींमध्ये ?शिवाय नेमून दिलेले मुद्दे अर्ध्या तासाच्या कार्यक्रमात हिरीरीनं मांडणं वेगळं आणि व्यवहारात वेगवेगळ्या परिस्थितीमध्ये, वेगवेगळ्या नात्यांनी वेगवेगळ्या व्यक्तींना सामोरं जाणं वेगळं. या सगळ्यामुळं एकूणच हा विषय दिसतो त्यापेक्षा फार गहन आणि गुंतागुंतीचा आहे, एवढंच त्या दिवशी माझ्या लक्षात आलं आणि हेही लक्षात आलं की, टी. व्ही.वरच्या कार्यक्रमाच्या वेळी हसून, मान हलवून दाद देणाऱ्या एक वयस्कर बाई प्रत्यक्ष चर्चेत अजिबात सहभागी झालेल्या नव्हत्या. वयामुळं असतील की वैफल्यामुळं ? न्यूनगंडामुळं की असल्या चर्चांमधलं वैय्यर्थ जाणवल्यामुळं ?

बोलून दाखवोत अगर न दाखवोत, बहुसंख्य गृहिणींनी, घरकामाची कदर केली न जाण्याची खंत कधी ना कधी केलेली असते. लवकर किंवा उशीरा जाणवणं हे त्या त्या स्त्रीच्या संवेदनाक्षमतेवर अवलंबून असतं इतकंच; पण जाणवणं अटळ असतं. लग्नानंतरच्या सुरुवातीच्या काळात, नवऱ्याला अधिकाधिक खूष ठेवण्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीमुळं घरकामाचा जाच पुष्कळांना फारसा वाटत नाही. तसंच मुलं लहान असताना, जगण्याच्या प्रत्येक क्षणी ती आपल्यावर अवलंबून आहेत यातल्या भाबड्या आत्मगौरवामुळं बालसंगोपनाची जबाबदारीही सुसह्य होऊन जाते. सुसह्य असो की, असह्य असो, सुटका कशातूनच नाही हे जसजसं जाणवायला लागतं तसतसं हे सुरुवातीचे भ्रम, भास वितळायला लागतात. थोडा–फार तोच–तोचपणा कोणत्याही कामात असतोच; पण घरकामात तो फारच तीव्रपणे जाणवतो. कारण ज्याप्रमाणे या कामाचं स्वरूप वर्षानुवर्षं बदलत नाही त्याचप्रमाणे ते काम करण्याची जागा, परिसर, संबंधित माणसं यापैकी कशातही दीर्घकाळ बदल होत नाही. साहजिकच त्याची कंटाळवाणी चाकोरी तर तयार होतेच; पण त्याचबरोबर त्याविषयी स्वत:ची व कुटुंबाची संवेदनशीलताही कमी कमी होत जाते. अमुक व्यक्ती घर चांगलं ठेवते हे किती वेळा सांगायचं ? उत्तम पुरणपोळीचं सर्टिफिकेट एकाच गृहिणीला किती वेळा द्यायचं ? आणि पुन्हापुन्हा तीच प्रशस्ती घेण्यात त्या बापडीला तरी किती आनंद वाटणार ? यामुळं नवतीचे चार दिवस सरले की, पुष्कळदा ज्या एका पुरुषासाठी हा सगळा सायास करायचा तोच या कशाविषयीही काहीच बोलेनासा होतो. मुळात आपल्या संस्कृतीत जवळच्या नात्यांमध्ये उघड उघड कौतुकाचे किंवा स्तुतिपर चार शब्द बोलण्याची फारशी पद्धत नाही. त्यामानानं नाराजी पटकन बाहेर पडते; पण यामुळंच घरकामाच्या मोबदल्यासारखा कडवट प्रश्न कोठे तरी डोकं वर काढतो. अखेर वर्षानुवर्षं, बिनतक्रार हा गाडा ओढण्याबद्दन मला काय मिळणार आहे ? हा विचार एकदाही आला तरी गृहिणी अस्वस्थ होऊन उठते.

मागच्या पिढीपर्यंत कोणी असली अगोचर मागणी केली नव्हती असंही काहीजण म्हणतात. मागणी केली नसली तरी असंतोष वाटला नसेलच अशी खात्री मला तरी वाटत नाही. खाजगी प्रश्न सामाजिक संदर्भातसुद्धा मोकळेपणानं बोलण्याची कदाचित् त्यांना मुभा नसेल. तेवढी माफक सवलत आजच्या स्त्रियांना आहे आणि पगारी कामाच्या

वेगवेगळ्या शक्यता व स्वरूपं त्यांना दिसत आहेत. त्यामुळं हा खदखदता असंतोष आता बोलका झाला तर आश्चर्य नाही. पगारी कामाला ठरीव वेळा असतात, साप्ताहिक–मासिक–वार्षिक रजा असतात, कामात विशेष नैपुण्य दाखवल्यास त्याचं तोंडी श्रेय आणि आर्थिक मोल मिळण्याची सोय असते, विशिष्ट परिस्थितीत ते काम केव्हाही सोडता येतं आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे कामाव्यतिरिक्तच्या वेळावर आपली संपूर्ण सत्ता असते अशा अनेक बाबतींमध्ये घरकामापेक्षा पगारी काम वरचढ ठरतं. अर्थात पगारी कामाचं स्थळकाळाचं बंधन घरकामापेक्षा जास्त जाचक असतं; पण घरकामातल्या इतर ताणांपुढं हा ताण पुष्कळ गृहिणींना कमीच वाटतो कारण गृहिणींच्या कामाला ना वेळ ना वखत. मोठमोठी हॉटेलंसुद्धा दिवसाच्या ठराविक वेळातच फक्त जेवण देतात; पण घरामध्ये मात्र केव्हाही द्रौपदीची थाळी तयार पाहिजे! कामाचे तास कमालीचे अनिश्चित आणि घरातल्या प्रत्येक घटकाची मागणी सारखीच तोलामोलाची! मुलं आपलीच, नवरा घरमालक, सासूसासऱ्यांची सेवा हा धर्म आणि पाहुण्यांचं स्वागत हा गृहस्थधर्म! उलटपक्षी या सर्व घटकांची गृहिणीशी म्हणून काही बांधिलकी असेल हा किरकोळ दुवा तेवढा कुठे तरी गहाळ होतो म्हणूनच प्रश्नाचं स्वरूप तीव्र होतं. क्वचित कधी गृहिणी आजारी पडली, अपरिहार्य कारणामुळं परगावी गेली किंवा घरात राहूनही काम करेनाशी झाली म्हणजे तिच्या कामाचं मोल घराला कळतं. सुरळीत चालणाऱ्या सगळ्या यंत्रणा थंडावतात. घर निराधार होतं. मुलंच नव्हे तर मोठीही केविलवाणी दिसू लागतात. हे असं कधी तरी जाणवण्यापेक्षा सुरुवातीपासूनच घरकामाचा योग्य तो आदर घरांनी केला तर?

पण हे सांगणं सोपं आहे तेवढं आचरणात आणणं सोपं नाही. पैशासारखी खणखणीत मोजून देता–घेता येण्याजोगी दाद दुसरी कुठली नसते. म्हणून मग कधी तरी वैतागानं, त्राग्यानं बायका मोबदल्याची मागणी करतात आणि हा प्रश्न उभा ठाकतो.

आपल्या कुटुंबसंस्थेबद्दल पुष्कळच सुधारणेला, दुरुस्तीला वाव असला तरी आपल्या सांस्कृतिक, सामाजिक संदर्भात कुटुंबसंस्थेला पर्याय नाही व तिचा पाया भावनिक असण्यालाही पर्याय नाही. या परिस्थितीत गृहिणीचं अनास्थेचं दुःख कमी करण्यासाठी सगळ्या घरादारालाच प्रयत्न करावे लागतील. एक तर घरांनी फार किरकोळ कामांसाठी गृहिणीवर अवलंबून राहूच नये. परावलंबनाला परिस्थितीपेक्षा सवय जास्त कारणीभूत असते. ती सुरुवातीपासूनच टाळली तर बरं! दुसरं म्हणजे अमुक काम गृहिणीचंच, इतरांनी ते करूच नये अशी वाटणीही फार गांभीर्यानं करू नये. अडवणुकीपेक्षा परस्पर सोय हे धोरण ठेवलं तर कामांचे कप्पे पडणार नाहीत. गृहिणीला घरांनी सर्व काळ सर्वांसाठी गृहीत धरण्याची पद्धत तर सर्वप्रथम रद्दबातल व्हावी. दिवसाचा काही वेळ तिचा तिच्यासाठी राहावा, त्यावर कोणीही कधीही अतिक्रमण करू नये, एवढी माफक पथ्यं पाळली तर बहुतांश गृहिणींची दुःखं कमी होतील. मग कदाचित त्या मोबदला मागणारही नाहीत!

त्या दिवशी टी. व्ही.च्या कार्यक्रमानंतर गप्प राहिलेल्या बाई परवा अचानक भेटल्या तेव्हा मी त्यांच्यापुढं हेच मुद्दे मांडले, त्यांचं मत अजमावण्यासाठी. माझ्या विध्वंसक विधानांनंतर त्या एकदम उसळून म्हणाल्या,

'तीस वर्षांपूर्वीसुद्धा असल्याच चर्चा ऐकल्या होत्या; पण मला सांग, तुम्ही एवढ्या तरुण, शिकलेल्या बायका, भीक कसली ग मागता? अमक्यानं अमकं द्यावं आणि तमक्यानं कौतुक करावं म्हणून? पैसे मागायचे नोकरानं मालकापाशी! नवऱ्यापाशी कसली घासाघीस करता? बायांनो, तुमचा अर्धा वाटा आहेच मुळी! माझंच बघ. ह्यांच्या रिटायरमेंटनंतर ह्यांच्या फंडाचे पैसे आले आणि मी सरळ परदेशवारी मागितली. मेल्यांनो, जन्मभर राबून एवढाही हक्क नाही का आमचा?'

वा! मी मनोमन दाद दिली. असा आत्मविश्वास पाहिजे! या वयस्कर, अडाणी वाटलेल्या बाईनं दाखवलेली आत्मप्रतिष्ठा पाहिजे. नाही तर वाट्याला येईल ते स्वीकारण्याची सहनशक्ती तरी! अधल्यामधल्यांनी नुसत्या चर्चाच कराव्यात आमच्यासारख्या!

□



# टॉन्सिलचा होता त्रास
# ऑन-टॉन्सिलचा उपाय खास




आंतरराष्ट्रीय कीर्तिचे डॉक्टर्स म्हणतात...
"टॉन्सिल्स काढू नका...शरिराला त्याची गरज आहे."
टॉन्सीलच्या सर्व विकारांवर तसेच सर्दी-खोकला होणे, घसा दुखणे, खवखवणे, या सर्वांवर उत्तम व सोपा उपाय

**ऑन-टॉन्सिल**
होमीओ चे एक दर्जेदार उत्पादन

होमिओ लॅबोरेटरीज़
राममोहन हायस्कूलनजळ,
गिरगांव, मुंबई-४०० ००४.



# आपली मुलं

मूल झालं की आपण पालक होतो अशी बऱ्याच आई-वडलांची चुकीची समजूत असते. पालकत्व हा काही एका दिवसातला चमत्कार नाही. हळुहळू धडे घेत, चुकतमाकत शिकत जाण्याचा तो अभ्यासक्रम आहे. आणि हे शिकणं मुलांबरोबरच चालू असतं—त्यांचं बोट धरूनसुद्धा !

## 'मुलं आपल्याला घडवतात'

शोभा भागवत

एक आजीबाई एकदा स्वेटर विणत बसल्या होत्या. जवळच त्यांची छोटी नात खेळत होती. ती सारखी लोकरीच्या गुंड्याजवळ यायची आणि लोकरीचा गुंता करायची. शेवटी वैतागून आजीबाईंनी नातीला कुठे तरी अडकवून टाकायचं ठरवलं. चारी बाजूला कठडे असलेली एक छोटी कॉट नातीसाठी केली होती. त्यात तिला ठेवलं आणि शांतपणे आजीबाई विणू लागल्या. नातीला हा अपमान खपला नाही. तिनं रडून—ओरडून घर डोक्यावर घेतलं. आजीबाईंचं लक्ष लागेना. शेवटी आजीबाईंनी तिला उचललं, खाली काढलं आणि आपण त्या कठडे असलेल्या कॉटमध्ये जाऊन बसल्या.

आता नात खूष होती. तिला घरभर हिंडायला मिळत होतं. कठड्यांमधून डोकावून आजीपण बघता येत होती. नातीचं खेळणं झालं, आजीबाईंचं विणणं झालं !

कुठेशी वाचलेली ही गोष्ट मला फार आवडली. आपल्या प्रश्नांना उत्तरं अनेक असतात; पण आपण स्वतःभोवती एक चौकट आखून घेतलेली असते. त्या चौकटीतच प्रश्न सोडवायची आपली धडपड असते आणि ते सुटत नाहीत. उत्तरं त्या चौकटीबाहेर असतात.

गोष्टीतल्या आजीबाईंनी चौकट मोडली. नातीसाठी केलेल्या कठड्यांच्या कॉटमध्ये आजींनी बसायचं नसतं, ही चौकट होती नातीच्या अन् आपल्या भल्यासाठी. त्यांनी ती चौकट मोडली !

मुलं होण्यापूर्वी आपल्याही स्वभावात, विचारात अशा अनेक चौकटी तयार असतात. मुलांच्या वागण्याकडे, मागण्यांकडे, प्रतिक्रियांकडे डोळसपणं पाहिलं तर आपल्याला जाणवतं आपण बदलायला हवं. त्यात कमीपणा वाटून न घेता आपण ह्या जाणिवेला प्रतिसाद दिला तर जाणवतं की, मुलं आपल्याला घडवतात. आपल्या चौकटी मोडून टाकतात.

अगदी छोट्या छोट्या गोष्टी असतात. आपल्या अडीच तीन वर्षांच्या मुलानं काही हट्ट केला म्हणून वडलांनी त्याला पायावर जोरदार फटके दिले. थोड्या वेळानं डोळे पुसत हुदके आवरत मुलगा वडलांजवळ आला. पायावरचे वळ दाखवत म्हणाला, 'पुन्हा नाही मी हट्ट करणार. मला मारू नको !' वडलांच्या डोळ्यात पाणी आलं. त्या रात्री त्यांना झोप येईना. आपण मुलाला मारलं हे चुकलं. त्या कोवळ्या पायावरचे वळ सारखे डोळ्यांसमोर यायला लागले. त्यांनी पक्कं ठरवून टाकलं की पुन्हा मुलाला कधीही मारायचं नाही आणि हा निश्चय कायमचा पाळला ! ह्या वडलांना मी फार जवळून ओळखते. ते माझ्याच मुलांचे वडील आहेत !

सगळेच आईबाप पोरांना प्रथम मारतात तेव्हा त्यांना ते कुठे तरी टोचत असतं, वाईट वाटत असतं. ह्या वाईट वाटण्याला प्रतिसाद दिला नाही की सवय होऊन जाते.

खरं तर राग ही काही भावना नव्हे, ती प्रतिक्रिया असते. पावडरचा डबा सांडल्याबद्दल पोरगं आईचा मार खातं; पण तोच डबा वडलांनी सांडला तर आई मुकाट्यानं पावडर भरून ठेवते, तेव्हा तिचा राग कुठे जातो ? राग आवरता येतो; पण ते चूक करणाऱ्या माणसावर अवलंबून असतं. रागामागची भावना ओळखायला शिकलं पाहिजे.

मुलं त्यांच्या गोडव्यातून, निरागसपणातून आपल्याला राग आवरायला शिकवत असतात.

अर्थात राग आवरण्याचीही काही मर्यादा असते. शेवटी आपणसुद्धा माणसंच असतो. कधीकधी मुलं आपली सहनशक्ती ताणून पहात असतात. एकापाठोपाठ एक खोड्या करतात, किरकिर करत राहतात. अशा वेळी मुलावर रागवायला हवंच; पण रागवायचं कसं ? एकदम खेकसून ? अंगावर ओरडून ?

मुलाचं वागणं आपल्याला त्रास देत आहे हे प्रथम शांतपणे सांगायला हवं, समजावून द्यायला हवं. तरीही नाही ऐकलं तर रागावून सांगणं ही दुसरी पायरी. तरीही ऐकलं नाही तर एखादा फटका मिळेल ही सूचना आणि नंतर मुलाकडे संपूर्ण दुर्लक्ष करणं. दुर्लक्ष करणं ही मारापेक्षा भयंकर शिक्षा असते. कारण मारात स्पर्शाचं तरी समाधान मिळत असतं. दुर्लक्ष केलं तर तेही मिळत नाही.

ह्या कुठल्याही पर्यायांचा विचार न करता संतापून थेट पोरांना बडवून काढण्याची पद्धत असते. माराला मुलं सरावतात. त्याचा पुढे उपयोग होईनासा होतो आणि मुलं मोठी झाली की, उलट मारू शकतात. शिवाय मारानं मुलं कोडगी बनली की ती कशाचा विचारही करत नाहीत आणि माराची भीतीही बाळगत नाहीत. त्यांना स्वतःच्या चुकांतून शिकण्याची संधीच आपण



नाकारतो. कित्येकदा तर आपलं काही चुकलं हे कळण्याच्या आतच पोराच्या पाठीत धपाटा बसलेला असतो ! अशा वेळी मुलं फार दुखावतात. हा राग मनात ठेवतात. एकूण मारानं काहीही साध्य होत नाही. मारानंच मुलं ताब्यात राहतात ही अगदी चुकीची समजूत आहे.

एखादं वागणं चुकीचं कसं आहे हे आधी समजावून सांगितलेलं असलं तरच आई–वडलांना मुलांना रागवायचा हक्क आहे; पण केवळ लहान मूल आपल्याला उलट मारू शकत नाही म्हणून त्याच्या आकाराचा फायदा घेऊन त्याला बडवणं हा अधिकार आईबापांना आणि कुणाही मोठ्या माणसांना नाही !

केवळ मुलांशी बरं वागून ही चौकट मोडत नाही. घरातल्या नोकर–चाकरांशी वागतानाही हे तत्त्व पाळावं लागतं. मुलांशी गोड वागणारे पालक जर नोकरांवर खेकसत असतील तर मुलं ते वागणंही चटकन् उचलतात. बरं, केव्हा रागवायचं केव्हा नाही हे तारतम्य मुलांना कळत नसतं. तेव्हा समोरचा माणूस कुणी का असेना माणुसकी सोडून कधी वागायचं नाही, दुसऱ्याचा कचरा करून त्याला बोलायचं नाही हे सगळ्या पालकांना आपल्या मुलांसाठी शिकावंच लागतं !

पूर्वी एका जोडप्याला जेव्हा दहा–बारा मुलं असायची तेव्हाचे अनुभव भावंडं सांगतात. सर्वांत मोठ्या मुलाच्या किंवा मुलीच्या वेळी आईवडील फार कडक असायचे. अनेक बंधनं लादली जायची. शिस्त कडक अन् शिक्षाही कडक; पण हळूहळू आईवडील निवळायचे. शेवटच्या मुलाला त्या मानानं अधिक प्रेम, अधिक सवलती, अधिक मोकळीक मिळायची.

कदाचित शेवटच्या मुलाला रागावण्याइतकी शक्तीच आईवडिलांच्यात उरत नसेल किंवा विचार करून कडक शिस्तीचे तोटेही कळत असतील. आज जेव्हा दोनच मुलं घरात असतात तेव्हा ते शहाणपण आपलं आपल्यालाच शिकावं लागतं. ते काळावर नि मधल्या दहा मुलांवर नाही सोपवता येत. शिस्तीची मर्यादा ओळखावी लागते तशी लाडाची मर्यादाही ओळखावी लागते !

मुलांच्या लाडाला मुलांसाठी कामं करण्यालाही काही मर्यादा असतात हे मुलंच आपल्याला शिकवतात.

स्वत:च्या पोटाला चिमटा घेऊन, स्वत:च्या कपड्यांकडे दुर्लक्ष करून मुलांना छान छान कपडे घेणारे पालक असतात. मुलांचे हट्ट ते पुरवत असतात आणि पालकत्वाचं कर्तव्य पुरं केल्याचं समाधान मिळवत असतात; पण हळूहळू ह्या मुलांच्या मागण्या वाढतात, आईवडलांची पर्वा न करता तो स्वत: ऐटीत रहातो अशा वेळी लाड फार झाले हे समजायला हवं. वेळीच त्याला ती समज द्यायला हवी.

आपण मुलं जन्माला घालतो ती काही स्वतचं सगळं जीवन त्यांच्यासाठी उधळून टाकायला नाही. मुलं वाढवणं हा आपल्या जीवनातला एक भाग असतो. महत्त्वाचा भाग असतो; पण मूल झालं की स्वत:चे सगळ छंद, सगळ्या आवडीनिवडी, सगळी करमणूक विसरून मूल एके मूल करायची जरूर नसते. आपण आपलं जीवन असं गोठवून टाकणं योग्य नसतं. मुलंसुद्धा मोठी झाली की आपल्याला त्याबद्दल दोष देतात. साधारणपणे बाळाच्या आईवडलांना विशेषत: आईला असं म्हणायची पद्धत असते ' आता कसली तू सिनेमा पहातेस वर्षभर ? आता सगळं विसरा ! ' हे फार दुष्टपणाचं विधान आहे. ते बाळाच्या आईवडिलांनी कधीही मान्य करू नये. मूल तान्हं असल्यापासून दिवसाकाठी एखादा तास तरी आईला मोकळा मिळायला हवा. सारखी तीच तीच कामं करून कंटाळा येतो. तो कंटाळा घालवायची संधी हवीच.

मी पण माणूस आहे. मलाही इतर गोष्टी कराव्याशा वाटतात. त्यासाठी काही वेळ हवा असतो हे साऱ्या घराला आईनं पटवायला हवं. म्हणजे घरानं पटवून घ्यायला हवं. नाही तर वर्षानुवर्ष मुलांसाठी खस्ता खाणारी आई आजारी पडली, तर मुलं ढुंकूनही पहात नाहीत. कारण आई फक्त आपलं करण्यासाठी असते. तिच्या काही गरजा असतात हे तिने कधी सांगितलेलेच नसते. त्यामुळे ती आजारी पडली की

आपली होणारी गैरसोय फक्त मुलांना दिसते कित्येकदा वडीलही या भावनेशी सहमत असतात.

आपल्या 'करण्याचं' हे 'फळ' असेल तर प्रत्येक आईनं वेळेवर विचार करायला हवा.

मुलांना घेण्याची जशी सवय लावायची तशी देण्याचीही सवय लावायला हवी. ज्या मुलाला लहानपणी आईनं कधी डोकं चेपायला सांगितलं नाही, पाय चेपायला सांगितलं नाही त्याला मोठेपणी बायको आजारी पडली की, तिच्यासाठी काही करावं लागतं हे सुचणारच नाही.

मुलांना आणि मुलींना वेगवेगळी वागणूक देण्याच्या आपल्या पद्धतीचे अफाट तोटे घराघरातून दिसत असतात. मुलींनी केर काढला पाहिजे, मुलींना स्वैपाक आला पाहिजे, कलाकौशल्याची कामं आली पाहिजेत, आदरातिथ्य करता आलं पाहिजे, याबद्दल आईवडील फार जागृत असतात; पण हे सगळं मुलांनाही यायला हवं, असा आग्रह धरणारे फार कमी असतात. लहानपणच्या या अपुऱ्या शिक्षणाचे तोटे पुढे पुढल्या पिढीच्या संसारातही नुकसान करत राहतात. ज्या घरात वडील काहीही घरकाम करत नाहीत, त्या घरातल्या मुलाला हे शिक्षण देणं कठीण जातं. त्यासाठी तरुण पालकांनी आवर्जून ह्या गोष्टी कराव्या लागतात. वडील कितीही 'बिझी' असले तरी त्यांनी अंघोळीचं पाणी स्वतःचं स्वतः काढून घेणं, सुटीच्या दिवशी तरी स्वतः बटणं वगैरे शिवणं, एखाद्या वेळी निदान चहा करणं, सरबत करणं, ही न जमणारी कामं असतात का ? ही आणि अशी घरकामं यायला हवीतच. रोज ती सगळी केली पाहिजेत असं नाही; पण पुरुष ही कामं करत नाहीत असं मुलांच्या मनावर कधीही ठसू देऊ नये.

रोजच्या दिनक्रमात एखाद्या तरी कामाची जबाबदारी अशी वडलांनी घेतलेली असली की, मुलांवर त्याचा कायमचा परिणाम होतो. आमच्याकडे मुलांना पहाटे अभ्यासाला उठवायचं, त्यांना कॉफी करून द्यायची, अभ्यासासाठी बसायला तयारी करून द्यायची हे काम वडील करायचे. अजूनही मला त्या कामातली त्यांची हौस, तळमळ आठवते. माझे भाऊ वडलांच्या पुढे जाऊन मुलांना




अंघोळी घालणं, भरवणं, झोपवणं हेही सगळं करतात. तेव्हा वडलांनी पेरलेलं बी उगवताना मला दिसतं.

अनेक तरुण पुरुष पालक आपल्या मुलांमध्ये असा रस दाखवू लागले आहेत. आपल्या चौकटी मोडत आहेत हे पाहून बरं वाटतं. त्यांना हसून किंवा कुत्सितपणे काही बोलून, उपहास करून हा गुण मारण्याचं पुण्यकर्म मात्र आसपासच्या माणसांनी करू नये.

मुलांचं सगळ्या गोष्टींकडे फार बारकाईनं लक्ष असतं. प्रत्येक गोष्टीचे संदर्भ ती आपल्या चिमुकल्या अनुभवविश्वाशी, भावविश्वाशी जोडत असतात. आपण त्यांना जे शिकवलेलं असतं ते तपासून पहात असतात.

एकदा कुणाकडे तरी जेवायला गेले असताना घरातल्या तरुण मुलीनं चायनीज सूप केलं होतं. ते काही फार बरं झालं नव्हतं; पण तिनं विचारल्यावर आम्ही छान झालंय म्हटलं. घरी आल्याबरोबर मुलांकडून प्रश्न आला– 'ते इतकं बेकार सूप होतं त्याला तुम्ही छान छान काय म्हणत होता ?' मग समजावून सांगणं आलं– तुम्ही म्हणता ते अगदी बरोबर आहे. सूप खरंच बरं नव्हतं झालं; पण त्या मुलीनं ते

प्रथमच केलं होतं. तिला वाईट वाटलं असतं म्हणून हे छान झालंय असं सांगितलं. हे खोटं बोलणं आहे; पण इथे खऱ्या-खोटयापेक्षा त्या मुलीला प्रोत्साहन देण्याची जास्त गरज होती असं आम्हाला वाटलं. इथे खोटं बोलणं माफ आहे असं आम्ही ठरवलं.

खोटं बोलू नये असं मुलांना शिकवलं की, काम भागत नाही. त्यातल्या असंख्य छटा अशा वेळोवेळी समजावून द्याव्या लागतात हे लक्षात आलं. मुलांच्या देखत कुणाशीही वागायचं, बोलायचं झालं की, ह्या दुर्बिणी आपल्यावर रोखलेल्या असतात याची जाणीव ठेवायला हवी हा धडा मिळाला.

एरवी मुलांकडे साफ दुर्लक्ष करून वागत राहण्याची आपली पद्धत असते. रस्त्यात भेटलेली माझी एक मैत्रीण लवंगी फटाक्यांची लांबलचक माळ लावावी तसं फटफट फटफट बोलत होती. थांबायचं नावच नाही! कडेवरची माझी दोन वर्षांची मुलगीही कंटाळली होती. मलाही निघायला हवं होतं; पण ते तिला कळेना. शेवटी मुलीनं चक्क तिच्या तोंडावर आपला हात धरला आणि 'चला आता घरी जाऊ या!' असं म्हणाली. मुलांचं अस्तित्व आपण त्यांना सिद्ध करायला भाग पाडतो आणि वर "ही म्हणजे ना कुणाशी एक मिनिट बोलू देत नाही!" म्हणतो.

हे जसं एक उदाहरण झालं तसं दुसऱ्या टोकाचंही एक उदाहरण देते. आईवडलांची मित्रमंडळी आली असताना मुलांकडे दुर्लक्ष होतं हे मुलांना जाणवतं. मग ती सारखी मधेमधे काही तरी विचारून नको करतात. लक्ष वेधून घेण्यासाठी कधी ओरडतात, रडतात, भांडतात. अशा वेळी जसं आपल्या बोलण्याला आवर घातला पाहिजे तसंच मुलालाही हे समजावून द्यायला हवं की, 'तुझे मित्र आले की तू आमच्याशी बोलतोस का? ह्या पाहुण्यांशी मला कामाचं बोलायचं आहे. तू १० मिनिटं इतर काही कर; मग मी तुझ्याशी बोलेन!' ही शिस्त मुलांना लागणं जरुरीचं असतं. इतरांच्या गरजांचा विचार करायला मुलं त्यातून शिकतात.

याबरोबरच घरातल्या मुलांना दरवेळी चॉकलेट, खाऊ घेऊन येणाऱ्या पण नंतर त्यांच्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करणाऱ्या आपल्या मित्रमंडळींना पण सांगितलं पाहिजे– आता मुलं मोठी झालीत. त्यांना तुम्ही अभ्यासाबद्दल, त्यांच्या खेळांबद्दल काही विचारा. गप्पा मारा. विनोद सांगा. कोडी घाला. त्यांच्याकडे दुर्लक्ष करू नका.

आमचे एक डॉक्टर मित्र मुलांना औषधांच्या जाहिरातीतली प्राण्यांची रंगीत चित्रं कापून आणून देतात. मुलांना ती फार आवडतात. गोळ्या-चॉकलेटांपेक्षा ही भेट मलाही आवडते.

सगळ्या भेटीची किंमत पैशात मोजण्याच्या वृत्तीपासून मुलं अलिप्त असतात हे किती छान आहे! आपण हे मुलांपासून शिकायला हवं.

आमच्या नात्यातल्या दोन जावांची गंमत आहे. भाऊबिजेला ह्या घरून त्या घरी भाऊबिजेच्या भेटवस्तूंची देवाणघेवाण होते. जावेनं आपल्या मुलीला किती रुपयांचं काय दिलं याचा अंदाज घेऊन तिच्या मुलीला भाऊबीज पाठवली जाते. दर दिवाळीतल्या या चर्चा ऐकून एकीची मुलगी तिला म्हणाली. 'आई, यापेक्षा काकू आणि तू एकमेकींना नुसते पैशाचे आकडे का कळवत नाही?'

यावर 'काय आगाऊपणे बोलतेस ग! मार खाशील पुन्हा असं काही बोललीस तर!' हा दम मुलीला मिळाला आणि आईनं स्वतःला घडवायची संधी घालवली.

असे अनेक प्रसंग आपल्या घरात घडत असतात. मुलं नावाचे परीक्षक आपल्या वागण्याचं मूल्यमापन करत असतात. मुलं नावाचे शिक्षक आपल्याला अनेक धडे शिकवू पहात असतात. मुलं नावाचे पालक कित्येकदा आपल्याला सांभाळतही असतात. आपण या सगळ्याकडे उघड्या डोळ्यांनी पहात नाही.

कधीकधी असं स्वतःला घडवणं गैरसोयीचं असतं. स्वार्थाला आळा घालावा लागतो. स्वच्छंदीपणे वागता येत नाही. दुटप्पीपणा उघडा पडतो. खरं तर शिकण्याची इच्छा असली तर काही गोष्टी सोडण्याचीपण तयारी ठेवावी लागते. नाही तरी कुटुंबात प्रत्येकाला हवं ते मिळायला हवं असेल तर प्रत्येकानं हवं ते थोडं सोडायचीही तयारी ठेवावी लागते. नाही तर ज्याला जबरदस्तीनं कायम त्यागच करावा लागतो तो आणि त्याग करायला लावणारा दुसरा दोघंही अपूर्णच राहतात. पालक आणि मुलं या नात्यात ही जबरदस्ती असू नये. नवराबायकोंच्या नात्यातही असू नये. मुलांसाठी बळी जाण्याची भूमिकाही पालकांनी घेऊ नये.

जिथं मुलांचं मूलपणच बळी जात असतं अशा समाजाशी ओळख झाली की आपण कशा कशाचे किती किती प्रकारचे बाऊ करत जगत असतो ते जाणवतं आणि आपली आपल्यालाच लाज वाटते. आपल्या पालकपणाला निराळीच जाग येते. त्याबद्दल बोलू या पुढच्या लेखात... □



## ही पण आपलीच मुले

'तुमच्या घराला दार आहे का हो बाई?'
'बाई तुमची साडी किती मऊ आहे!'
'बाई आम्ही तुमच्याकडे आलो तर ओळख दाखवाल?'
'बाई तुम्ही कशानी केस धुता?'
'बाई तुमच्या पोरीला ही माळ घेऊन जा की. ती मला बहिणीसारखीच आहे.'
झोपडपट्टीतल्या मुलांचा हा एकेक प्रश्न. एकेक वाक्य आठवलं की डोक्यात घाव पडायला लागतात. ही मुलंही आपली कुणीतरी आहेत असं मानून जर आपण काही करत नसलो तर आपल्या पालकत्वाला, आपल्या आईबाप होण्याला काही किंमत नाही असं वाटायला लागतं. याबद्दल पुढील लेखात...

एका बातमीच्या निमित्तानं

# ‘ ती मनोरुग्ण होती ’

तरुण, विवाहित स्त्रियांच्या अनैसर्गिक मृत्यूचे प्रमाण सतत वाढत आहे. त्या संबंधीची आकडेवारी वर्तमानपत्रात प्रसिद्ध होत असते. ह्या पार्श्वभूमीवर, आत्महत्येच्या दोन बातम्यांनी जुलैच्या तिसऱ्या आठवड्यात माझे लक्ष वेधून घेतले. आत्महत्येच्या बातम्या वर्तमानपत्रात नेहमी येतात; पण ह्या दोन बातम्या इतर बातम्यांपेक्षा वेगळ्या होत्या. दोन्हीही बातम्या स्त्रियांसंबंधी होत्या व त्यात दोन बाबतीत साम्य होते. पहिले, दोघी प्रतिष्ठित घरातील होत्या आणि दुसरे वय, मुले, आत्महत्या कशी केली इत्यादी तपशील देऊन झाल्यावर एक वाक्य होते ‘ त्या मनोरुग्ण होत्या !

एखाद्या व्यक्तीला कर्करोग झाला तर आपण त्याबद्दल गुप्तता पाळत नाही. मनोरुग्णाबाबत अशी पाळण्याचे कारण आहे किंवा नाही हा स्वतंत्र मुद्दा; परंतु आपल्याकडे अशी गुप्तता पाळली जाते, निदान पाळण्याचा प्रयत्न होतो हे निर्विवाद. असे असताना ही प्रतिष्ठित मंडळी ह्या बाबीचा आवर्जून उल्लेख का करीत आहेत ?

एखादी व्यक्ती मरण पावते तेव्हा मृत्यूची कारणे ‘ हृदयविकाराने ’ अथवा अन्य शारीरिक रोगामुळे अशी दिली जातात. प्रत्येकाच्या शरीराला केव्हा तरी काही अपाय होऊन त्याचा मृत्यू होणे ही नैसर्गिक गोष्ट आहे; परंतु मनाला काही तरी अपाय झाल्यामुळे मृत्यू ही अनैसर्गिक गोष्ट आहे. हृदयविकाराचा तीव्र झटका आणि मृत्यू यांचा जवळचा संबंध आहे; पण मनोविकार आणि आत्महत्या यांचा संबंध तितकाच जवळचा आहे काय ?

आत्महत्येच्या बहुतेक बातम्या पहा : ‘ बेकारीमुळे ’, ‘ आजारीपणाला कंटाळून ’ ‘ घरातील भांडणांना कंटाळून ’ अशा प्रकारचे कारण दिलेले असते. सामान्य घरातील स्त्री असेल तर ‘ नवऱ्याच्या मारहाणीमुळे ’, ‘ सासुरवासाला कंटाळून ’ असेही कारण दिलेले असते. म्हणजे त्या व्यक्तीच्या आत्यंतिक निराशेचे काही तरी कारण देण्याचा हा प्रयत्न असतो. आत्महत्या ही बरेच वेळा आत्यंतिक निराशेतून उद्‌भवलेली असते. आता प्रश्न असा की ‘ मनोरुग्ण असणे ’ हे आत्यंतिक निराशेचे कारण असू शकते काय? की स्वतःच्या सोयीनुसार त्यातील फक्त अर्धाच भाग उघड करून सांगितला आहे ?

आत्महत्या केलेल्या व्यक्तीसंबंधीची ही माहिती वर्तमानपत्राकडे येण्याचे तीन मार्ग आहेत. १) त्या व्यक्तीच्या जवळच्या नातेवाइकांकडून ही माहिती पुरवली गेली असेल किंवा २) बातमीदाराने ‘ कुठून तरी ’ मिळवली असेल किंवा ३) ज्या मनोविकारतज्ज्ञाने तिच्यावर उपचार केले त्याने ही माहिती दिली असेल.

प्रथम पहिली शक्यता विचारात घेऊ. ही माहिती जवळच्या नातेवाइकांनी पुरवली असे समजू. यात पुन्हा त्या स्त्रीच्या जवळची मंडळी दोन प्रकारची असू शकतात. पारंपारिक विचारांची किंवा नवीन विचारांची. ही मंडळी पारंपारिक विचारांची आहेत असे क्षणभर गृहीत धरू. मनोविकारतज्ज्ञाकडे जाणे इथे वाईट समजले जाते, पण ह्या परंपरेस अनेक संकेत आहेत. ‘ मेलेल्या माणसाबद्दल वाईट बोलू नये ’ हा तर महत्त्वाचा संकेत. असे असताना ‘ ती मनोरुग्ण होती ’ हे जाहीर करण्याचे कारण काय ? हे तिच्याबद्दलचे ‘ चांगले ’ बोलणे आहे असे इतरांनी समजायचे काय ? बरे जवळपासची मंडळी नवीन विचारांची आहेत असे गृहीत धरले तरी काही मुद्दे उपस्थित होतात. मनोविकारतज्ज्ञाकडे जाणे ही गोष्ट इथे गर्हणीय मानली जात नाही, त्या स्त्रीने व तिच्या कुटुंबियांनी अशा तज्ज्ञाकडे जाणे ही त्यांची खाजगी बाब आहे. शिवाय जोपर्यंत व्यक्ती जिवंत आहे तोपर्यंत उपचार करणे, त्या निमित्ताने आवश्यक तिथे माहिती उघड करणे ही गोष्ट वेगळी. मरण पावलेली व्यक्ती आता एकही शब्द बोलू शकणार नाही. स्वतःचा बचाव करण्याची कोणतीही संधी आता तिला नाही. अशा परिस्थितीत तिच्याबद्दलची माहिती नुसती उघड करून न थांबता ‘ जाहीर ’ करणे हे योग्य आहे काय ? व्यक्तीच्या खाजगीपणाचा ‘ right to privacy ’ यात भंग होत नाही काय ?

### तोंड दाबून.....

घरातील लोकांनी बातमी पुरवण्याची काही कारणे अशी असू शकतील. एक–त्या स्त्रीच्या मृत्यूमुळे निर्माण झालेली अपराधीपणाची भावना. ती अशामुळे : ‘ आपण तिच्याभोवती अशी परिस्थिती निर्माण केली की, आत्महत्येवाचून तिला अन्य मार्ग उरला नाही ’ अथवा दोन– शरमेची भावना. कारण आता लोक बोटे दाखवून नावे ठेवतील आणि तीन– अेवीतेवी ती गेलीच आहे तर तिच्या जबाबदारीतून पूर्णपणे मुक्त ’ होण्याची झालेली घाई !

सुरुवातीला सांगितल्यापैकी दुसरी शक्यता आता विचारात घेऊ. म्हणजे असेही असू शकेल की, ही माहिती घरच्यांनी दिलीच नाही. बातमीदाराने ‘ कुठून तरी ’ मिळवली. मग अशा बातमीची विश्वसनीयता किती ? शिवाय बातमीदाराने काहीही बातमी आणली तरी त्यातील काय छापायचे, काय नाही ह्याचा विचार कुणीही करीत नाही काय ?

बातम्या अशा प्रकारे छापण्यात मला अनेक प्रकारचे धोके दिसतात.

बातमी अशा स्वरूपात वाचल्यावर ‘ जाऊ दे, मनोरुग्णच होती ’ अशी बऱ्याच जणांची प्रतिक्रिया होऊ शकेल. मृत व्यक्तीवर ती अन्याय करणारी होईल, एवढेच नव्हे तर अनेक जिवंत व्यक्तींवरही त्यामुळे अन्याय होईल. तो असा–

मनोरुग्ण असण्याचे अनेक प्रकार आहेत; परंतु सर्वसामान्य माणसाला त्यासंबंधी जुजबी माहिती तरी असते का ? मनोविकारतज्ज्ञाकडे जाणारा तो मनोरुग्ण– म्हणजे वेडा– हा बहुतेकांचा समज. जसे प्रत्येक रोगाचे अनेक प्रकार आहेत आणि रोगाच्या अनेक अवस्थाही आहेत तसेच मनोविकाराचे नाही काय ? परंतु ‘ ती मनोरुग्ण होती ’ असे मोघम विधान आत्महत्येचं ‘ कारण ’ म्हणून दिल्यावर त्याचा विपरीत परिणाम

होऊ शकेल. इतर मनोरुग्ण स्त्रियांना असेही वाटेल की, ' आत्महत्या करणे ह्याच एक स्वाभाविक शेवट आहे. ' शिवाय कुठल्याही प्रकारच्या मनोरुग्ण स्त्रीच्या जवळच्या लोकांनाही वाटू लागेल, ' आत्महत्या करणार ही बहुतेक ! ' अशा रीतीने आत्महत्येची प्रवृत्ती अजाणपणे वाढेल. शिवाय काही कुटुंबे अशीही असतील की जी हृया स्त्रीच्या आत्महत्येची वाट पहात असतील. आता ही मंडळी तिला अपघातासाठी उद्युक्त करीत रहातील. हे कुठे आणि कसे संभवते ते पाहू.

काही कुटुंबातील हिंसाचार उघड दिसतो. ही मंडळी घरात आपल्या सुनेचा/पत्नीचा खून करून मोकळी होतात; परंतु बऱ्याच ठिकाणचा हिंसाचार हा छुपा असतो. ही मंडळी आपापसातही विध्वंसक वृत्तीनेच वागत असतात; परंतु त्या घरातील सर्वांत दुर्बल घटक ( Weakest link ) म्हणजे सून/पत्नी. हृया मंडळींना सून/पत्नी नको असते असेही नाही. त्यांना ती हवी असतेच; पण वेगळ्या कारणांसाठी. कधीकधी हृया घरातली सून/पत्नी पटकन आत्महत्या करून टाकते. (तिची जागा घाईने भरून काढण्यात येते. ) एखादी ह्या परिस्थितीतही जिवंत रहाते; पण जिवंत राहिली तरी कुटुंबाच्या विध्वंसक वृत्तीचा तिच्यावर सर्वांत वाईट परिणाम होतो. अशा कुटुंबात काही वर्षे काढावी लागली की ही स्त्री निराश होते, चिंताग्रस्त होते किंवा केवळ स्वप्नरंजन करण्यापलीकडे तिच्या हातात काही रहात नाही. म्हणजे यापैकी काहीही झाले तरी मनोरुग्ण होण्यापासून तिची सुटका नाही. आता मात्र ह्या स्त्रीला ' तोंड दाबून बुक्क्यांचा मार ! ' म्हणजे ती मनोरुग्ण होण्यापूर्वीही मानसिक छळ होताच, आता त्यात आणखी भर. ' तिला ना मानसोपचार चालू आहेत ' असे कुजबुजल्यासारखे करून उघड सांगायला मोकळीक. आता तर कुजबुजण्याचेही कारण नाही. हृया बाबीची तर आता ' बातमी करता येते !

आतापर्यंत समाजात एक रास्त पद्धत होती. ती म्हणजे घरातील विवाहित स्त्रीच्या आत्महत्येला त्या कुटुंबाला काही प्रमाणात जबाबदार धरण्याची; परंतु आता सुनेला—पत्नीला एकदा का मानसोपचारतज्ज्ञाकडे नेले की कुटुंबियांचे काम सोपे झाले. हृया स्त्रीने आत्महत्या केल्यास ' ती मनोरुग्ण होती ' हृया एका वाक्याने समाजाची भीती व जबाबदारी यातून कुटुंबियांची सुटका होऊ शकेल.

आता एक महत्त्वाचा मुद्दा, एखाद्या अनैसर्गिक, मृत्यूनंतर होणाऱ्या पोलीसतपासाचे काय ? ' मनोरुग्ण ' स्त्रीच्या मृत्यूनंतर तिच्या मृत्यूची कारणे तितक्याच कसोशीने शोधली जातील याची खात्री देता येईल काय ? ग्रामीण भागातील स्त्रिया असुरक्षित आहेतच. शहरात व आर्थिक सुबत्ता असणाऱ्या घरात थोडीफार सुरक्षितता आहे. निदान स्त्रीच्या अनैसर्गिक मृत्यूनंतर तरी जवळच्या मंडळींपैकी कुणाच्या तरी प्रयत्नाने किंवा समाजाच्या दडपणामुळे पोलीसतपास कसोशीने होऊ शकतो; परंतु अशा ठिकाणीही ' मनोरुग्ण ' स्त्रीच्या मृत्यूनंतर हे दडपण राहील काय ?

मनोविकारतज्ज्ञाकडे जाण्याची पद्धत आपल्याकडे तरी नवीनच आहे. त्यांच्याकडे जाणाऱ्या इतर रुग्णांचा विचार इथे अभिप्रेत नाही. फक्त विध्वसक वृत्तीच्या मंडळींच्या तावडीत सापडलेल्या स्त्रियांबद्दल विचार करू. अनेकदा अशा ठिकाणी तज्ज्ञाकडे जाण्याचे नुसते नाटक केले जाते. म्हणजे प्रत्यक्ष जातात; परंतु सल्ला मात्र पाळत नाहीत. ह्या स्त्रीवर ' सकृतदर्शनी ' उपचार चालू असतात. कित्येकदा तिच्या जवळच्या मंडळींना उपचार देण्याची खरी गरज असते; परंतु हे काम कोण करू शकणार ? ' तुमच्या सुनेला—पत्नीला माणसासारखे वागवा ! ' असे सांगणार कोण आणि सांगितले तर ऐकणार कोण ?

म्हणजे मनोविकारतज्ज्ञाकडे गेले तरी कुटुंबात स्वास्थ्य आणण्याचा विचारही ह्या (विध्वंसक वृत्तीच्या) लोकांना शिवत नाही. उलट मानसोपचारपद्धतीचा ही मंडळी दुरुपयोग करीत आहेत असे म्हणावे लागेल. तो असा— वर्ष—दोन वर्षे तज्ज्ञाकडे जायचे, स्वतःच्या वागणुकीत मात्र बदल करायचा नाही. शिवाय ' किती वर्षे उपचार केले तिच्यावर; पण काऽऽही उपयोग झाला नाही ! ' असे सांगायला मोकळीक आणि आत्महत्या असो वा तसा आभास असो, ' ती मनोरुग्ण होती ' ह्या वाक्याने नंतरच्या तपासात सूट !

सुरुवातीला सांगितलेल्यापैकी दोन शक्यता आतापर्यंत विचारात घेतल्या. आता शेवटची शक्यता विचारात घेऊ. त्या मनोविकारतज्ज्ञानेच ही माहिती पुरवली असेल. सरळपणे दिलेल्या माहितीचा दुरुपयोग केला जातो याची कल्पना तज्ज्ञांना नाही असे कोण म्हणेल ? पुन्हा ' तज्ज्ञ 'चे विधान हा पुराव्याचा मोठा आधार !

एका बाजूला कायद्यासारखा चिरेबंद विषय व दुसऱ्या बाजूला तुलनेने ठिसूळ मानसशास्त्र. अशा परिस्थितीत मनोविकारतज्ज्ञाची मदत त्या मनोरुग्ण स्त्रीला होण्याऐवजी विध्वंसक वृत्तीच्या मंडळींना तर होणार नाही ? मनोविकारतज्ज्ञाचा त्याच्याही नकळत दुरुपयोग तर करून घेतला जाणार नाही ?

त्या स्त्रीच्या मृत्यूनंतर इतरांचे काहीही होवो. तिची स्थिती मृत्यूनंतर अधिकच वाईट ! तिच्या वाट्याला नंतरही जाहीररीत्या कुचेष्टाच येणार आणि संभावितपणे आम्ही मात्र म्हणणार, ' मृतात्म्याला शांती लाभो ! '

—पद्मा पिंगळे


मांडणी, विचार व देखणेपणा या साऱ्यातच ' उत्तम ' असे म्हणता येईल असे हे पुस्तक आहे.

-प्र. बा. भोसले


संपादक, बळीराजा मासिक

# योद्धा शेतकरी

ले. विजय परुळकर

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

मूल्य : ३६ रुपये



# आजचे कवी

अविनाश सहस्रबुद्धे

'आजचे कवी' या लेखमालेतून आजच्या दहा कवींच्या अगदी अलीकडे प्रकाशित झालेल्या कवितासंग्रहांची ओळख आपण करून घेणार आहोत. द. भा. धामणस्करांचा अपवाद वगळल्यास १९७० च्या आगेमागे कवितालेखनाला प्रारंभ केलेले हे कवी आहेत. या लेखमालेत समीक्षाविषय झालेला त्या त्या कवीचा संग्रह हा त्या कवीचा पहिलाच संग्रह आहे. हे सर्व संग्रह १९८० नंतर म्हणजे गेल्या अडीच-तीन वर्षांच्या काळात प्रसिद्ध झालेले आहेत. तेव्हा या दहा कवींच्या पहिल्या–वहिल्या संग्रहातील कवितेतून आजच्या मराठी कवितेचे कोणते स्वरूप वाचकांसमोर उभे रहाते याचा आढावा घेण्याचा प्रयत्न या लेखमालेत केला आहे.

## मोकळ्या मनांची कविता

१९७० च्या आसपासची या नव्या कवींची कविता स्थिर होण्यापूर्वी मराठी कवितेचे स्वरूप काय होते याचा विचार या पहिल्या लेखांकात करायचा आहे. आजच्या या कवींच्या कवितेला समजून घेताना पार्श्वभूमी म्हणून तो उपकारक ठरणार आहे. प्रत्येक कवीच्या काव्यसंग्रहाची स्वतंत्रपणे ओळख करून घेतल्यावर शेवटच्या लेखांकात या कवितासंग्रहांमधून दिसणाऱ्या काव्यप्रवृत्तींचा विचार अभिप्रेत आहे.

१९७० च्या आधी मराठी कवितेचे कुठले चित्र दिसते ?

नवकवितेने रविकिरणमंडळाच्या काळातील स्वप्नाळूपणाला, कल्पनारम्यतेला मागे टाकून वास्तवाचा जो स्वीकार केला होता त्याला स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची देशातील राजकीय, सामाजिक परिस्थितीच कारणीभूत होती. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात राष्ट्रवाद, ध्येयवादाला वेगळा अर्थ होता. त्यामुळे त्या काळात मराठी वाङ्मयात सामाजिक सुधारणेचा उपदेश किंवा मानवतेचा उपदेश, थोडक्यात बोधवादाची भूमिका आढळून येते. स्वातंत्र्य मिळाल्यावर ध्येयनिष्ठेचे, प्रेषितपणाचे युग संपले आणि सत्तास्पर्धेचे, सत्तासंघर्षाचे युग सुरू झाले. तत्त्वप्रणालींवर आधारलेल्या संघटित चळवळींचा अभाव असल्यामुळे या सत्तास्पर्धेला व्यक्ति–व्यक्तीतील स्पर्धेचे रूप आले. ध्येयदृष्टी, नैतिक मूल्ये समाजपरिवर्तनाची तळमळ यापेक्षाही या जीवनकलहात 'व्यक्ती'ला, 'मी'ला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. जीवनातील सर्व विसंगतीचा उद्रेक होऊन भारतीय जीवनाचे चित्रच पालटले. मध्यमवर्गीय स्वप्ने धुळीला मिळाली. जीवनाच्या सर्व श्रद्धा, मूल्ये ढासळून पडल्यासारखे वाटू लागले. इतर सांस्कृतिक क्षेत्रांप्रमाणेच साहित्यावरही या सर्व गोष्टींचा परिणाम होत असताना कविताच तेवढी त्यापासून वेगळी कशी राहिली असती ? तिच्यातूनही या बदलत्या वास्तवाचे, नैराश्याचे, विसंगतीचे चित्र उमटू लागले. म्हणूनच स्वातंत्र्यलढ्याच्या काळातील उपदेशाच्या, बोधवादाच्या ऐवजी मर्ढेकरांच्या काळात व त्यानंतरच्या काळात एक तऱ्हेचे वैफल्य व मानवी जीवनाविषयीचा उद्वेग प्रकट होऊ लागला. मर्ढेकरांच्या कवितेत तो सर्वप्रथम दिसला. दुसऱ्या महायुद्धाने मानवी जीवनमूल्यांचा केलेला अमानुष संहार त्यांना उत्कटतेने जाणवला व त्यामुळेच 'प्रेमाचे लव्हाळे। सौंदर्य नव्हाळे। शोधू जाता' त्यांना 'आसपास मुड्द्यांची' रास दिसली. आजच्या मानवाचे किरटे, खुरटे, 'पिंपात मेलेल्या उंदरा'सारखे पिचले गेलेले जीवन त्यांच्या हळुवार मनाला दिसले. मर्ढेकरांनी त्यांच्या अवती–भवतीच्या वास्तवाची, विसंगतीची प्रतीती अनुभवली व तिला काव्यरूप दिले.

नवकवितेच्या या काळात मर्ढेकरांच्या 'व्याकुळ मानवतेतून आलेल्या विफलतावादाची' किंवा 'व्यक्तिवादाच्या शोकात्म भाना'ची परंपरा हीच या काळातली प्रमुख परंपरा ठरली असली तरी 'समष्टिनिष्ठ सूर्योदयी दर्शनाची' कविताही लिहिली गेली. या दुसऱ्या प्रवाहातले प्रमुख कवी म्हणजे कुसुमाग्रज, मुक्तिबोध व विंदा करंदीकर. सामाजिक आणि आर्थिक विषमतेमुळे उत्पन्न होणाऱ्या अन्यायाचे आणि दुःखाचे निराकरण 'देवाच्या दारी' धरणे धरल्याने होणार नाही किंवा नुसत्या व्याकुळ मानवतेतूनही हे प्रश्न सुटणार नाहीत याची खात्री असल्यामुळे कुसुमाग्रजांनी 'गर्जा जयजयकार', 'हा काठोकाठ कटाह भरा,' 'आगगाडी व जमीन,' 'बलिदान' इ. कवितांमधून क्रांतिमार्गाचा ओजस्वी पुरस्कार केला. मराठी साहित्यावर साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव प्रथम जरी तिसऱ्या दशकात पडला असला तरी त्याचे खरे रूप मुक्तिबोधांच्या कवितेतून प्रकर्षाने दिसते. या काळातील मर्ढेकरी वळणाच्या कवितेहून मुक्तिबोधांच्या

कवितेचे वेगळे वळण लगेच लक्षात येते ते यासाठीच. विंदा करंदीकरांच्या कवितेचे वळण नंतर बदलले असले तरी १९४५ ते १९५५ या दरम्यानच्या त्यांच्या कवितेवरील साम्यवादी संस्कार स्पष्टपणे न्याहाळता येतात. तेव्हा नवकवितेच्या या काळात मर्ढेकरी परंपरा ही जरी प्रमुख परंपरा असली तरी कवितेतील ही दुसरी धारही आपले वेगळेपण घेऊन प्रवाहित झालेली दिसते. या दोन्ही धारा मुक्तिबोध म्हणतात तशा अनुक्रमे 'मानवी मर्यादितपणाच्या जाणिवेचा शोकात्मक क्षण' व 'मानवी सामर्थ्याच्या जाणिवेचा सूर्योदयी क्षण' यांच्यातून उगम पावल्या होत्या व त्याच तिच्यामागच्या प्रेरणा होत्या.

## साहित्यातला 'नाही रे'

स्वातंत्र्योत्तर काळातील दुसऱ्या टप्प्याच्या अगदी प्रारंभी म्हणजे नवकविता व नवकथेचा बहर ओसरू लागला होता त्या वेळीही, मर्ढेकरांच्या कलावादी विचारांचा प्रभाव साहित्यावर दिसत असला तरी, या काळात मराठी वाङ्मय झपाट्याने जीवनाच्या सामाजिक आविष्कारापासून दूर होत गेले. मर्ढेकरांची व्याकुळ मानवतेतून आलेली प्रतीती नाहीशी झाली व व्यक्तीची क्षणवादी जाणीव हाच या काळातल्या वाङ्मयाचा प्रमुख विषय ठरला. दुर्बोधता हे या साहित्याचे व्यवच्छेदक लक्षण आहे असे सांगितले जाऊ लागले. भय, लैंगिकता, मृत्यू यांच्या प्रेरणेतून हे अबोधवादी वाङ्मय आकारास येऊ लागले. एकटेपणाच्या दारुण व्यथेचा अनुभव हा या वाङ्मयाचा प्रमुख विषय ठरला. त्यातून हे वाङ्मय लैंगिकतेकडे किंवा निराशावादाकडे, नियतिवादाकडे वळले. दृक्स्पर्श संवेदनांच्या सहाय्याने स्त्री–देहाचे आणि विशेषतः तिच्या कामोद्दीपक अवयवांचे सौंदर्य न्याहाळण्यात कविता सारे भान विसरली व रतिसुखाच्या अनुभवाला कुशलतेने रेखाटण्यात तिला सार्थकता वाटू लागली. शब्दशक्तीचा, गेयतेचा व लयीचा अत्यंत समर्थ आविष्कार पु. शि. रेग्यांच्या कवितेत दिसत असला तरी 'दोला' पासूनची स्त्रीकडे बघण्याची रेग्यांची दृष्टी भोगप्रधान, प्रतिगामी व स्त्रीत्वाला कमीपणा आणणारीच आहे. लैंगिकतेसारखाच, एकटेपणाची व्यथा व भासातून या लेखकांना ग्रासणारा विषय म्हणजे मृत्यूचा. मृत्यू हा जीवनाचा अंगभूत भाग होय. तो टाळायचा म्हटले तरी टाळता येत नाही. शिवाय टाळता न येणारी असंख्य अकाली मरणे इथल्या विषम समाजरचनेने माणसावर लादली असूनही त्यांचा चटका या कवींना बसत नाही. कारण त्यांची वृत्ती ही पलायनवादाकडे, नैराश्येकडे, नियतिवादाकडे झुकणारी आहे. 'बहिर्मुखतेचे औषध' न घेतल्यामुळे कलावंताच्या जीवनाला सर्वांगाने वेढून उरलेला समाजच या लेखकांनी दृष्टीआड केला व पुढचा अपरिहार्य भाग म्हणून स्वतःच्याच कोषात ते अडकून पडले. सामाजिक जीवनाचा व जाणिवेचा अशा रीतीने निषेध केल्यावर मग प्रकट मनाखालील अर्धसुप्त आणि अप्रगट मनाकडे म्हणजेच अंतःप्रेरणेकडे त्यांना धाव घ्यावी लागली व कलासृजनासाठी एवढ्यावरच त्यांना अवलंबून रहावे लागले.

मराठी कवितेच्या या पार्श्वभूमीवर १९६० च्या आसपास मराठी कवितेत दोन महत्त्वाच्या घटना घडल्या व या दोन्ही घटनांनी साचेबंद मराठी कवितेला मोकळी करून महत्त्वाचे स्थित्यंतर घडवून आणले. पहिली घटना अनियतकालिकांच्या चळवळीची व दुसरी घटना नारायण सुर्व्यांच्या कवितेच्या उदयाची. या घटनांनी त्या काळी स्थितिशील झालेल्या कवितेपेक्षा वेगळी व नवी कविता सामोरी आणली.

प्रस्थापित वाङ्मयीन नियतकालिकांच्या विरोधात १९६० च्या सुमारास अनियतकालिकांची चळवळ सुरू झाली. सुरुवातीला 'शब्द', 'असो', 'अथर्व' अशी काही अनियतकालिके प्रकाशित झाल्यावर या चळवळीने जोर धरला व अनेक अनियतकालिकांच्या प्रकाशनाची जणू लाटच आली. या अनियतकालिकांमधून खोटी, उथळ कविता जरी पुष्कळ प्रसिद्ध झाली असली तरी या चळवळीतील काही अनियतकालिकांनी अरुण कोलटकर, दिलीप चित्रे, मनोहर ओक, सतीश काळसेकर, अशोक शहाणे, रघू दंडवते, भालचंद्र नेमाडे, तुलसी परब यांच्या अनेक सशक्त कविता प्रकाशित करून मराठी कवितेला अनेक अर्थांनी समृद्धच केले नाही, तर त्या काळी प्रचलित आणि प्रतिष्ठित झालेल्या एकसुरी, साचेबंद कवितेपेक्षा वेगळ्या स्वरूपाची, नवी, समर्थ व समकालीनतेचे भान असलेली कविता देण्याचे कार्य या अनियतकालिकांनी केले.

१९६२ साली सुर्व्यांचा पहिला काव्यसंग्रह 'ऐसा गा मी ब्रह्म' प्रकाशित झाला. मराठी कवितेला नवे वळण देण्याचे व वाङ्मयातील परिवर्तनाची नांदी ठरविण्याचे काम नारायण सुर्व्यांच्या कवितेने केले. सुर्वे यांच्या कवितेने 'नाही रे'चे विश्व सर्वप्रथम काव्यात आणले. शोषणाखाली चिरडला गेलेला हा 'नाही रे' साहित्यात, विशेषतः कवितेत तसा उपेक्षितच राहिला होता. सुर्व्यांनी त्याला आपल्या कवितेचे केंद्र केले व मराठी कवितेचा चेहरामोहराच बदलून टाकला. जे जीवन वाट्याला आले ते स्वीकारून 'स्वीकारित जीवनाचा' नेमका अर्थ काव्यात्म करीत त्यांची कविता मराठी रसिकांसमोर आली. सुर्व्यांनी आपल्या कवितेतून स्वजीवनासोबतच समष्टिजीवनाचाही सुसंबद्ध आलेख काढण्याचा प्रयत्न केला. व्यक्तिवादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या त्या काळातील कवितेच्या प्रांतात ही नवीच घटना होती. १९६०च्या आसपासच्या कवितेवर संपूर्णपणे सुर्व्यांच्या कवितेचा प्रभाव आहे असे जरी म्हणता आले नाही तरी सुर्व्यांनी मराठी कवितेला नव्याने समाजसन्मुख केले असे निःसंशयपणे म्हणता येईल.

१९६० च्या आसपास लिहू लागलेल्या या कवींनी स्थितिशील, रूढ, कवितेचे सर्व बंध झुगारून मराठी कवितेला गतिशील केले. तिला आधुनिकतेचे, समकालीनतेचे परिमाण मिळवून दिले व म्हणूनच ती स्थित्यंतर घडविणारी कविता ठरली. तिने समकालीन जीवनप्रवाहाच्या सर्वच अंगांना स्पर्शून जाणाऱ्या नव्या अनुभूतीचा शोध घेण्यास जशी सुरुवात केली तशीच कवितेच्या आकृतिबंधाला, संरचना, लय, शब्दसंघटन इत्यादींनाही नवीन परिमाणे मिळवून दिली. कवितेच्या शिल्पाच्या संबंधातही तिने अनेक नवे प्रयोग केले.

## बांधिलकी, अभिनिवेश !

या कवितेला–मराठी कवितेला–नवे वळण देण्याचे, स्थित्यंतर घडवून आणण्याचे श्रेय द्यायचे ते यासाठीच की, तिने केशवसुत आणि

बा. सी. मर्ढेकरांनी निर्माण केलेली परंपरा मध्यंतरीच्या काळात जी खंडित झाली होती ती नव्याने गतिशील केली. १९६० च्या आसपासच्या या कवितेने आपल्या परंपरेची पाळेमुळे शोधून काढली आणि तिच्याशी आपले नाते प्रस्थापित केले. अनियतकालिकांच्या चळवळीतून पुढे आलेल्या कवींचे नाते प्रामुख्याने बा. सी मर्ढेकरांच्या कवितेशी जुळणारे होते तर सुर्वे व नंतरच्या दलित कवींचे नाते केशवसुतांनी सुरू केलेल्या पुरोगामी कवितेच्या परंपरेशी जुळणारे होते. या कवींनी केशवसुतांनी मराठी कवितेला दिलेले वेगळे वळण जे कुसुमाग्रज, मुक्तिबोधांच्या नंतर नष्टप्राय झालेले होते ते शोधून कवितेला नव्याने समाजसन्मुख केले. १९६० नंतर सत्तर–पंचाहत्तरपर्यंत, नव्याने लिहू लागलेल्या तरुण कवींवर याच दोन वाङमयीन प्रवृत्तींचा–अनियतकालिकांच्या चळवळीचा व सुर्व्यांनी रुजवलेल्या पुरोगामी परंपरेचा प्रभाव असलेला दिसतो. त्याचे जसे काही चांगले, उपकारक परिणाम झाले तसेच काही अनिष्ट, अपकारक परिणामही झाले. त्यातूनच मग शुद्ध कविता किंवा व्यक्तिवादी कविता व राजकीय–सामाजिक बांधिलकीची कविता असे दोन उघड उघड तट कवितेच्या क्षेत्रात पडले. असा कुठलाही झेंडा खांद्यावर घेणे ही अभिमानाची बाब समजली जाऊ लागली. त्यामुळे एकीकडे अतिवैयक्तिकतेतून निर्माण होणारी दुर्बोधता जशी आली तसाच कवितेत एकांगीपणा, एकारलेपणा आला, तर दुसरीकडे कविता ही बांधिलकीच्या अवास्तव आग्रहामुळे आक्रस्ताळी, भडक, कंठाळी होऊ लागली. नारायण सुर्वे यांची कविता जर सर्वसामान्य वाचकाच्या मनात आपले चित्र उमटवू शकते तर सामाजिक आशयाची आपली कविता वाचकांपर्यंत पोहोचू शकेल अशी एक सोपी समजूत तरुण दलित, पुरोगामी कवींनी करून घेतली. ही प्रवृत्तीच मुळात त्यांच्या काव्यविकासाला घातक ठरणारी होती. त्यातून कवितेत सामाजिकतेचा अभिनिवेश नुसता आला व कलात्मकतेकडे दुर्लक्ष होऊ लागले. कविता ही 'स्लोगन' आणि 'पोस्टर'च्या पातळीवर वावरायला लागली. आजची बरीचशी दलित कविता व सुर्व्यांच्या कवितेतील नेमका भेद सांगायचा झाला तर असे म्हणता येईल की, सुर्व्यांची कविता ही 'विद्रोहाची भाषा' आहे. याउलट आजची बरीचशी दलित कविता ही 'भाषेचा विद्रोह' आहे.

### लेबलांच्या पलीकडे

कवीने कोणत्याही पक्षाच्या, विचारसरणीच्या, तत्त्वप्रणालीच्या चौकटी, बंधने आपल्या कलाविष्कारावर घालून घेऊ नयेत हे जरी अगदी खरे असले तरी कवी हाही तुमच्या–आमच्यासारखाच माणूस असतो हेही विसरता येत नाही. सर्वसामान्य व्यक्तीसारखे जीवन त्याच्याही वाट्याला येत असते. समाजातले भले-बुरे अनुभव त्यालाही स्वीकारावे लागतात. पदोपदी होणारे सर्वसामान्य व्यक्तीचे राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक शोषण तोही उघडया डोळ्यांनी पहात असतो. या साऱ्याबद्दल चीड, संताप, उद्वेग, हताशपणा, आत्मशोध इ. प्रतिक्रिया त्याच्याही मनात जागृत होत असतात. तथापि एक तर या साऱ्यांकडे पाठ फिरवून स्वायत्ततेच्या नावाखाली स्वतःला समाजापासून तोडून 'हस्तिदंती मनोऱ्यात' खोट्या आत्ममश्गुल कोषात बंदिस्त करून घ्यावयाचे अथवा बंडाचा, विद्रोहाचा झेंडा खांद्यावर घेऊन, बांधिलकीच्या आरोळ्या ठोकत तोडा–मोडाच्या गर्जना करायच्या असे सोपे विभाजन या काळात कवितेच्या वर्तुळात पसरू लागले. त्यातही बांधिलकीच्या आग्रही भूमिकेला, अभिनिवेशाला समीक्षकांकडूनही मान्यता मिळू लागली व कवींची नवी पिढी तिच्या आवर्तात अडकू लागली.

या दहा कवींच्या कविता वाचताना एक गोष्ट निश्चितपणे जाणवते की, त्यांची कविता या विभाजनातील कुठल्याही एका बाजूची नाही. या संग्रहांमधल्या कवींच्या जाणिवा संमिश्र असूनही अतिवैयक्तिकतेतून येणारा एकांगीपणा जसा तिच्यात नाही तसा सामाजिकतेचा, बांधिलकीचा सोटा, उथळ अभिनिवेशही नाही व हेच या कवींचे वैशिष्टय आहे. आपल्या अनुभवाचा स्वाभाविक व प्रामाणिक उद्गार असेच त्यांच्या शैलीचं स्वरूप आहे, म्हणूनच ते त्यांच्या संवेदनविश्वाला भिडणाऱ्या समाजवास्तवाविषयी जितक्या उत्कटतेने लिहिताना दिसतात तितक्याच उत्कटतेने एखादी तरल भाववृत्तीही व्यक्त करताना दिसतात. याचा अर्थ या कवींची कविता ही सर्वार्थाने वेगळी आहे किंवा पूर्वकालीन कवितेशी कोणतेही तिचं नातं नाही असा होत नाही. पूर्वकालीन कवितेने इतकेच नव्हे तर काही वेळा समकालीन ज्येष्ठ कवींच्या कवितेनेही तिला प्रेरणा दिली आहे; परंतु तिचे वैशिष्टय हे की, ती कुणाच्याही अनुकरणात सापडलेली कविता नाही. ज्या काळात एखाद्या पंथात किंवा पीठात सामील होणे हे भूषण समजले जात होते अशा काळातली ही कविता असूनही तिने अशा पंथात किंवा पीठात सामील व्हायचे नाकारले आहे. कुठल्याही लेबलांच्या पलीकडे जाणारी निरोगी स्वीकारशीलता, जीवनाला सामोरे जाण्याचा मोकळेपणा तिच्यात आढळतो. व्यक्तिवाद किंवा पुरोगामित्व, अस्तित्ववाद किंवा सामाजिक बांधिलकी, आशावाद किंवा निराशावाद असे साचे या कवींनी निर्माण केलेले नाहीत व म्हणूनच अशा साच्यांमध्ये अडकून गुदमरणारी ही कविता नाही.

'आजचे कवी' मधले हे दहा कवी आहेत. द. भा. धामणस्कर ( प्राक्तनाचे संदर्भ ), हेमंत गोविंद जोगळेकर ( होडया ), वृंदा लिमये ( काळोखकमळ ), अनिल द्रविड ( दिशांची पाउले ), नारायण कुलकर्णी कवठेकर ( हे माझ्या गवताच्या पात्या ), उत्तम कोळगावकर ( जंगलझडी ), प्रमोद मनोहर कोपर्डे (पाखरांच्या आत्महत्येनंतर), ह. शि. खरात ( स्वप्नवास्तव ), अनुराधा पाटील( दिगंत) व वसंत मा. जाधव (समुद्र),

¤

## द. भा. धामणस्कर

द. भा. धामणस्कर यांनी १९४७ पासून जरी आपल्या काव्यलेखनाला प्रारंभ केलेला असला तरी त्यांचा 'प्राक्तनाचे संदर्भ' हा पहिलावहिला संग्रह अगदी अलीकडे म्हणजे गेल्याच वर्षी प्रकाशित झाला. सुरवातीची अनेक वर्षे धामणस्करांनी

आपल्या कविता नियतकालिकांकडे प्रसिद्धीसाठी पाठवल्याच नाहीत. तेव्हा त्यांचा संग्रह इतक्या उशीरा, कवितालेखनास सुरुवात केल्यावर तब्बल पस्तीस वर्षांनंतर प्रकाशित व्हावा यातून त्यांची प्रसिद्धीविषयीची अलिप्तताच दिसून येते. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर 'स्वतःचा सूर सापडेपर्यंत ते थांबले.' तो सापडल्यानंतर म्हणजे गेल्या आठ-दहा वर्षांतच त्यांच्या कविता प्रसिद्ध होऊ लागल्या. त्यामुळेच ही कविता १९४७ च्या सुमाराच्या कवितेशी मिळतीजुळती नाही तर आजच्या कवितेशी, आजच्या कवितेतील समकालीनतेशी मिळतीजुळती कविता आहे. 'प्राक्तनाचे संदर्भ' हा धामणस्करांचा पहिलाच संग्रह असल्यामुळे त्यातून कवीची काव्यदृष्टी व त्याचे अनुभवविश्व यांची ओळखही आपल्याला होऊ शकते.

कविता मग ती कुठल्याही भाषेतील असो. मानवी अनुभवांना नेहमीच अतिशय समर्थपणे व्यक्त करीत आली आहे. अभिव्यक्तीचे ती एक महत्त्वाचे माध्यम आहे धामणस्करांची कविताही त्यांच्या अनुभवांच्या अभिव्यक्तीचे माध्यम म्हणूनच सामोरी येते. त्यांच्या अनुभवाची जिवंत स्पंदने तिच्यातून उमटताना दिसतात व त्यातूनच ती उत्तरोत्तर फुलताना दिसते. मानवी जीवन हेच मुळात अत्यंत विशाल, व्यापक असे आहे. या जीवनाची चित्र-विचित्र अशी रूपे नेहमीच नवे नवे अर्थ घेऊन दृष्टिगत होत असतात. त्यात नित्य नवी भर पडत असते. धामणस्कर आपल्या कवितेतून या विशाल, व्यापक मानवी जीवनाला, त्यातील नव्या-जुन्या अनुभवांनाच प्रत्यक्ष भिडताना दिसतात. त्यामुळेच त्यांची कविता वेगवेगळ्या अनुभवांना व्यक्त करताना दिसते. मानवी जीवनाची विविध रूपे पकडण्याचा, त्यांची संगती लावण्याचा प्रयत्न करताना दिसते. या अनुभवामागील दृश्य-अदृश्य अर्थांना उलगडून दाखविण्याचा प्रयत्नही ती करते. हे सर्व करीत असताना कवी कधी निसर्गाचे भव्यदिव्य स्वरूप पाहून थक्क होतो, तर कधी मानवी जीवनातील व्यथा-वेदनांना, दुःखांना, शोषणाला पाहून व्यथित होतो. धामणस्करांच्या कविमनाचे एकमेकात मिसळलेले हे दोन तलम पदर आहेत. म्हणूनच हा कवि त्याच्या व्यक्तिगत जाणिवा, आकांक्षा, भाव-भावना तसेच निसर्गाच्या भव्य-दिव्य साक्षात्कारामुळे मानवी जीवनासंबंधीचे त्याला पडणारे प्रश्न या सर्वांना आपल्या कवितेतून व्यक्त करू इच्छितो, तर कधी आजूबाजूच्या सामाजिक वास्तवात व्यक्तीचे असलेले स्थान व तिची त्या वास्तवाशी असलेली बांधिलकी यांचा विचारही त्याला अपरिहार्यपणे करावासा वाटतो. इथूनच या कवीचा निव्वळ व्यक्तीकडून, त्याच्या वैयक्तिक अनुभवांकडून ते समाजवास्तवात रहाणाऱ्या, समाजाचा घटक असलेल्या मनुष्याकडे जाण्याचा प्रवास सुरू होतो.

हा प्रवासच खरे तर मुक्तीच्या क्षणाकडे, खऱ्या स्वातंत्र्याकडे घेऊन जाणारा असतो. धामणस्करांची कविता वाचताना मला सारखी प्रख्यात स्पॅनिश कवी लोर्काला अभिप्रेत असलेली मुक्तीची संकल्पना आठवत होती. लोर्काने आपल्या एका मुलाखतीत म्हटले होते की, 'पोएट्री इज लिबरेशन' इथे मुक्तीच्या संकल्पनेचे अतिशय उदात्त, व्यापक स्वरूप त्याच्या डोळ्यांसमोर होते. लोर्काला अभिप्रेत असलेली मुक्ती फक्त आर्थिक किंवा सामाजिक नाही, आर्थिक व सामाजिक शोषणातून मिळालेली मुक्ती इतका मर्यादित अर्थ तिच्यात नाही, तर आपल्यावर जातिव्यवस्थेमुळे, विषम समाजरचनेमुळे झालेले संस्कार, वर्षानुवर्षे चालत आलेल्या अनिष्ट परंपरा, रूढी, रीतीरिवाज, भेदभाव या सर्वांपासून मुक्ती इतका व्यापक अर्थ या मुक्ति-संकल्पनेत आहे. 'लिबरेशन' चा हाच व्यापक अर्थ वाढत वाढत कवितेचे भावविश्व, तिचा 'फॉर्म', तिचे रूढ स्वरूप, तिच्यातील संकेतवजा काल्पनिक अनुभव इत्यादिपर्यंत जाऊन पोहोचतो व म्हणूनच या सगळ्यात जेव्हा कधी क्रांतिकारी बदल होतो तेव्हा कवितेला तिचे खरे स्वातंत्र्य प्राप्त होते. कवी एकाच वेळी एका टोकाला सामाजिक तर दुसऱ्या टोकाला अतिशय व्यक्तिगत अनुभवांच्या पातळीवर जगणारा असतो. म्हणजेच तो सामाजिक वास्तवाशी, अंतर्विरोधांशी अगदी जवळून संबंध ठेवणारा त्याचबरोबर अवतीभवतीच्या या वास्तवाचे भान विसरून केवळ अंतर्मनात खोलवर उठणाऱ्या भावभावनांशी एकरूप होऊन जगणाराही असतो.

या दोन्ही टोकांचा सांधा त्याच्या कवितेतून मग आपोआपच, त्याच्याच नकळत जोडला जातो. धामणस्करांच्या कवितेतूनही हेच घडताना दिसते. म्हणूनच ती भौतिक विश्व व कवीचे अंतर्विश्व अशा दुहेरी पातळीवर वाचकाला सहजच घेऊन जाते. याचे उत्तम उदाहरण म्हणून त्यांच्या 'फार उदास वाटतंय' व 'लोकलमधील चणेवाला' या दोन कविता पहाण्यासारख्या आहेत. 'फार उदास वाटतंय' या कवितेत आत्मविश्लेषणानंतरची उदासीनता धामणस्करांनी फार उत्कटपणे व्यक्त केली आहे. एका संध्याकाळी कवीच्या डोळ्यांसमोर 'विझलेला चेहरा' तरळू लागतो आणि कवी म्हणतो,

> आता सायंतरूंच्या फांद्याफांद्यात
> पाखरे प्राणांतिक कलकलाट करतील
> सूर्य बुडतानाचा,
> विझलेला चेहरा मला सतावीत राहील,
> आणि हे नतद्रष्ट, दुबळे हात
> परिग्रहपरायण,
> ज्यांनी ईश्वरत्व नाकारले
> सराईतपणे...
>
> (पृ. २८)

आपल्या 'अवसानघातकी' 'परग्रहपरायण' हातांनी जणू ईश्वरालाच नाकारले आहे असे कवीला वाटू लागते व त्या विचाराने उदासीनता दाटू लागते. धामणस्करांच्या कवितेत ज्या ज्या वेळी उदासीनतेचे असे वलय उमटते तेव्हा तिच्यामागे आत्मचिंतनातून येणारा एखादा विशिष्ट संदर्भ असतो. अवतीभवतीच्या समाजवास्तवाचे, शोषणाचे भानही या आत्मनिष्ठ कवितेबरोबरच कसे असते हे 'लोकलमधील चणेवाला' सारख्या कवितेतून प्रकर्षाने जाणवते. या संदर्भात तरी सबंध कविताच इथे उद्धृत करण्याचा मोह होत आहे—

> पाय अनवाणी पोरके असले की
> दुधाचे दात पडण्यापूर्वीच डोळे
> उदास, सावध होतात...
> मानेवरून पट्टा घेऊन
> पुढे पोटावर टोपली अडकवता येते;
> लाल, जांभळे कागद ढकवून
> तिला सजवता येते,
> आपल्यालाच, आपल्यापुढे

विस्तवाचे मडके धरून
चणे विकत नेता येते


या ओळींमधून लोकलमधील चणेवाल्या मुलाचे शब्दचित्र रेखाटल्यावर पुढच्या ओळींमधून कवी आजच्या समाजवास्तवावर, इथल्या विषम समाजरचनेवर, तळागाळातील व्यक्तीच्या होणाऱ्या अमानुष शोषणावरच प्रहार करतो–

पायच अनवाणी पोरके असले की
आपल्या चड्डीच्या कडा
टांग्याच्या घोड्याच्या आयाळीसारख्या
कातरलेल्या असतात,
आणि आपला अतोनात मळलेला शर्ट
मोडक्या घराच्या छपरासारखा
खाली उतरलेला असतो.
शर्टावर एक चित्रही असते पुनरुक्त :
एक अलिशान घोडागाडी,
आत निवांत बसलेले कुणी,
चाबूक उगारलेला हात,
आणि जिवाच्या आकांताने
रानोमाळ पडणारे घोडे...

(पृ. १०२)

इथे धामणस्कर सामाजिक, सांस्कृतिक तपशिलाची संघटना बांधत नसले तरी सूचकतेने समकालाला भिडताना दिसतात. चणेवाल्या मुलाच्या शर्टावरील घोडागाडीचे चित्रच या देशातले समाजवास्तव उघडे पाडते. ते दर्शविण्यासाठी कवीला वेगळे कुठलेही भाष्य करण्याची गरजच पडत नाही. हेच धामणस्करांच्या कवितेचे प्रमुख वैशिष्टचही म्हणता येईल. आत्मनिष्ठापूर्वक बाह्य वास्तवाकडे पहाण्याच्या या प्रवृत्तीमुळेच बाह्य वास्तवातील, भौतिक जीवनातील ठसठसत्या स्पंदनाकडे त्यांचे नेमके लक्ष जाते व म्हणूनच मूलतः आत्मनिष्ठ असणारी ही कविता सामाजिक जीवनाविषयी अलिप्त भूमिका स्वीकारू शकत नाही. त्यांच्या 'कुंती' या कवितेतही समाजजीवनावरचेच भाष्य आहे. कुंतीच्या या पौराणिक संदर्भातून ते आजचे आधुनिक जीवन उभे करतात.

म्हणून तर हे असंख्य निरपराध
गर्भपात
दिशा लाल लाल करणारे
सकाळ संध्याकाळ



**दत्तात्रय भास्कर धामणस्कर**

अहमदाबाद येथे २६–१०–१९३० रोजी जन्म. अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र या विषयात एम. ए. सध्या रिझर्व बँकेत नोकरी. पहिली कविता १९४७ साली लिहिली; पण स्वतःचा सूर सापडायला खूप वर्षे जावी लागली. साधारणपणे ६७–६८ नंतरच, तेही मित्रांच्या (प्रभाकर अत्रे व परेन जांभळे) आग्रहामुळे कविता नियतकालिकांकडे पाठवायला सुरुवात केली. 'तारांगण' या डोंबिवली येथील काव्यरसिकमंडळाच्या सभासदांच्या कवितासंग्रहात तीन कवितांचा समावेश (१९७५). हंस, सत्यकथा, अनुष्टुभ, राजस, बहुश्रुत, महाराष्ट्र टाइम्स इत्यादी नियतकालिकांतून प्रसिद्धी. 'अक्षर दिवाळी १९८०'मध्ये तीन व 'अक्षर दिवाळी १९८१'मध्ये एका कवितेचा समावेश. 'प्राक्तनाचे संदर्भ' हा कवितासंग्रह मौज प्रकाशन गृहातर्फे १९८२ साली प्रकाशित झाला. रवींद्रनाथ टागोर हे अत्यंत आवडते कवी. त्यांच्या 'गीतांजली'पेक्षा FIREFLIES अधिक आवडते.

पत्ता : 'अकल्पित', गजबंधन हाउसिंग सोसायटी, सी. के. पी. हॉलसमोर, गडकरी पथ, डोंबिवली (पूर्व) ४२१२०१.

म्हणून तर ही वस्त्रहरणे दिवसाची...
उलट फासे नियतीचे परत परत...
वनवास विराट अज्ञाताघरचे...
फजीत करणारे मायावी इंद्रप्रस्थ...
मूल्यांची अणुभट्टीच असे युद्धाचे प्रसंग
आपल्याशीच...

या ओळींमधून आजच्या मानवी जीवनाचे चित्रच धामणस्करांनी रेखाटले आहे.

'हस्तांतर' या कवितेत आजच्या जीवनावरील परंपरेचा पगडा व रूढी, रीतिरिवाजाखाली वाकलेल्या व्यक्तीचे चित्रण धामणस्कर करतात. कवी गणपतीच्या मूर्तीच्या रूपाने आपल्या मुलाकडे जणू 'परंपरा'च सोपवीत आहे व म्हणूनच त्याला ती मूर्ती दोन्ही हातात चौरंगासह तोलून धरणारा मुलगा परंपरेच्या ओझ्याने वाकलेला दिसतो. कवीच्या या जीवन–जाणिवेमागे शांत, स्थिर बुद्धीने विचार करणारे मन आहे.

जाणिवेच्या अनेक पातळ्यांना स्पर्श करणारी धामणस्करांची कविता आहे याची साक्ष त्यांच्या 'त्यानंतर पाखरांनी', 'संध्याकाळ', 'अरण्य', 'वही मोकळी करताना', 'पोरवयात', 'माहीत आहे', 'ह्या फुलांचे काय करावे ?', 'थवे' इत्यादि कवितांमधून मिळते. त्यांची कवितेविषयीची भूमिका 'कवितेचे ठीक आहे' या कवितेतून स्पष्ट होते. धामणस्करांचे कविमन हे मूलतः चिंतनशील आहे. त्यामुळेच व्यक्तिव्यक्तीतील व व्यक्ति–समाजातील तुटलेपण त्यांच्या काही कवितांमधून दिसते. 'पोरवयात' या संग्रहातील पहिल्याच कवितेतून व्यक्तीची असहायता, आजच्या शोषणव्यवस्थेत पिचलेले त्याचे मन पोरवयातील मुलीच्या माध्यमातून ते व्यक्त करतात.

मर्ढेकरांच्या कवितामागे जसे एक वास्तवदर्शी, उदास, निराश, गंभीर व चिंतनशील व्यक्तित्व उभे होते त्याच्याशी मिळते–जुळते धामणस्करांचे व्यक्तिमत्त्व आहे. मर्ढेकरांसारखे 'निराश–मानवतावादी' मन धामणस्करांपाशी आहे म्हणून तर ते म्हणतात–

आपण असहाय निमूट सर्व टाळीत.
पुढे सरकत असलेले;
सारी हिंस्रताच आपल्यात पसरत
चाललेली
खोल खोल...

अवाढव्य वाढणाऱ्या महानगरीय संस्कृतीचे चित्र आपल्याला 'थवे' या कवितेत पहायला मिळते. मध्यमवर्गाच्या व शहरी संस्कृतीच्या आजच्या अगतिक अवस्थेतून

## हस्तांतर

विसर्जनासाठी गणपती नेताना
मला मूर्ती अवजड झाली, तेव्हा
उसळत्या तारुण्याचा
माझा मुलगाच मला म्हणाला :
द्या इकडे.
मी मूर्ती तत्काळ मुलाच्या
हातावर ठेवली
चौरंगासहित.
मुलानेही मूर्ती हातात घेतली नीट
सावरून, तर
मी एका दैवी आनंदात अकल्पित
परंपरा पुढे सरकल्याच्या...

मी पुन्हा तरुण ययातीसारखा,
माझा मुलगा जख्ख म्हातारा,
परंपरेच्या ओझ्याने वाकलेला...

¤

## अरण्य

झाडांनी अरण्य करायचे ठरविले
तेव्हा पाखरांना गुप्त संदेश गेले
बीजपेरणीसाठी,
जमिनी तोडून दिल्या श्वापदांना
जहागिरीप्रमाणे
आणि उभारल्या वसाहती तक्षकांच्या
जागोजाग
आगंतुकांच्या निर्दालनासाठी.
मग मात्र, निश्चित झाडे
अंतहीन आकाशासारखी
फांद्यात फांद्या अडकवून उभी राहिली.

—द. मा. धा.

सर्व स्वप्नांचा चुराडा झाल्याची जाणीवही धामणस्करांच्या काही कवितांमधून उमटली आहे.

निसर्ग हा धामणस्करांच्या अनुभवविश्वाचा अटळ असा भाग आहे. निसर्गाच्या रूपरसगंधांची शब्दचित्रे रेखाटणे व त्यातच रंगून जाणे ही धामणस्करांची काव्यवृत्ती नव्हे. तसेच केवळ सजावट म्हणून किंवा प्रतीकात्मक रचनेचं साधन म्हणूनही निसर्ग त्यांच्या कवितेत येत नाही तर तो त्यांच्या अनुभवविश्वाचाच एक भाग होऊन येतो. आपल्या अंतर्द्वंद्वातील सुक्ष्म आंदोलने टिपताना ते निसर्गाचा आधार घेताना दिसतात. उदाहरणार्थ खालील ओळी पहा—

असे कसे पक्षीदेखील घरट्यालाच
भ्यालेले दिसतात,
तेच तेच खिन्न वर्तुळ आकाशात
गिरवीत रहातात ?
नेहमीच कशी ही प्रचंड ओहोटी असते
आणि दुखावलेल्या मनासारखा
पाण्याचा आकांत ? (पृ. १०९)

'कुहू कुहू' या कवितेत निसर्ग व मानवातील एकरूपता आपल्याला पहायला मिळते. धामणस्करांचे कविमन निसर्गाशी किती एकरूप होते याचा प्रत्यय 'वाटते झाडांसारखेच' या कवितेत मिळतो. कवी म्हणतो

आता शब्दांचाही वीट येऊ
लागला आहे
वाटते, झाडांसारखेच व्हावे फक्त
निःशब्द
बहर येतानाही आतून,
परततानाही उत्सव सगळे
व्हावे झाडांसारखे मूक, अस्पृष्ट...
(पृ. ६६)

'ओळखतो मी', 'पाऊस', 'ऊन्ह', 'वर्षागम', 'शिशिरातली शेते', 'पावसळयात' इ. कवितांमधूनही धामणस्करांनी निसर्गाची विविध रूपे रेखाटली आहेत. 'हृदयात पावसाची अखंड टपटप'सारख्या फार भावपूर्ण ओळी या कवितांमधून आपल्याला भेटतात. 'झाड' व 'पक्षी' या धामणस्करांच्या आवडत्या निसर्गप्रतिमा आहेत. म्हणूनच या दोन प्रतिमा आपल्या असंख्य रूपांसह त्यांच्या कवितेत जागोजागी आढळतात. अनेक वेळा कविमनातील आंदोलने या निसर्गप्रतिमांशी समरस होऊनच अवतरतात.

थोडक्यात धामणस्करांची कविता ही त्यांच्या अनुभवातून निर्माण झालेली व अभिव्यक्तीशी अत्यंत प्रामाणिक असणारी कविता आहे.

□

## पुरुषोत्तम करंडक

पृष्ठ ८ वरून

एकांकिका सादर केली. यातील मिलिंद दाते (मोहन) आणि सुशील जोशी (डॉक्टर) यांच्या भूमिका लक्षणीय होत्या.

(१७) स. प. च्या 'इद्र इदम' मधील श्रीनिवास जोशी ( महादू ) माधुरी गद्रे (मथुरा), शेटजी, मुनीम आदी भूमिका लक्षणीय होत्या; परंतु तांत्रिक बाबी उण्या पडल्या. हीच गोष्ट फर्ग्युसनच्या 'सूर्य—विलाप' आणि लॉ कॉलेजच्या 'वेताळाची गोष्ट' यांचे बाबतीतही म्हणावी लागेल.

नाशिकच्या 'ओ विंड कम अगेन', या एच्. पी. टी. महाविद्यालयाने राजसत्ता उदय पावतात आणि अस्त पावतात, परंतु खरे स्वातंत्र्य कधीच मिळत नाही हे सांगणारी एकांकिका सादर केली. परंतु दुर्बोध प्रतीके, सुमार अभिनय आणि सामान्य दिग्दर्शन यामुळे हा प्रयोग निरस झाला. हीच गोष्ट राजगुरुनगरच्या राजगुरु कॉलेजच्या 'पाटचा', या प्रयोगाबाबत म्हणता येईल.

पुण्याच्या महिला विद्यापीठाने 'ज्योत केव्हाच मालवली', ही हृदयस्पर्शी एकांकिका सादर केली. यातील छाया गोखले (आई) यांचा अभिनय लक्षणीय होता.

बृ. म. कॉमर्स कॉलेजच्या "पातका"ने प्रयोग चांगला केला; परंतु उत्कृष्ट प्रयोग दाखविण्याचे पुण्य गाठले नाही !

वाडिया कॉलेजने सादर केलेल्या अभिरुचीहीन प्रकाराला प्रयोग म्हणावे किंवा नाही याबद्दल शंका आहे. स्पर्धेतला हा सर्वात निकृष्ट दर्जाचा प्रयोग होता !

### चिंतनीय बाब

या स्पर्धेत सादर झालेल्या एकूण ३२ नाट्यप्रयोगांपैकी १८ समूहनाट्ये होती. ही समूहनाट्ये राजकीय आणि सामाजिक आशय व्यक्त करणारी होती. विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणिवा किती प्रगल्भ आहेत याचेच ते द्योतक होते; परंतु या प्रचलित विषयाहून वेगळा आशय व विषय मांडणारे प्रयोग फारसे आढळले नाहीत. त्या दृष्टीने 'देव नवरी', 'देवाजीच्या नावाने...' हे

प्रयोग लक्षणीय वाटले तर 'विकणे आहे' या प्रयोगाचे निमित्ताने एक कल्पक आणि वेगळे तंत्र पाहण्यास मिळाले. 'चेस' आणि 'अभ्यास' या नाटिकांद्वारेसुद्धा समांतर पातळीवरील, नेहमीपेक्षा वेगळा अनुभव देणारा विषय कलात्मकतेने हाताळलेला आढळला. हे सर्व खरे असले तरी नाविन्यपूर्ण विषय कुणीही हाताळलेला आढळून आला नाही. वस्तुत: या अशा स्पर्धेत तेच अधिक अपेक्षित आहे! परंतु असे घडले नाही याची खंत वाटते.

या संपूर्ण स्पर्धेत ज्याचा खास आवर्जून उल्लेख करावा (एक्स्ट्रॉ ऑर्डिनरी) असा एकही प्रयोग आढळून आला नाही. ही बाब खरोखरीच खेदाची आणि चिंतनीय म्हणावी लागेल. एकंदरीत पाहता यंदा स्पर्धेचा दर्जा चांगला असला तरी उत्कृष्ट नव्हता असेच म्हणावे लागेल. यंदा पहिल्या आलेल्या प्रयोगाला करंडक बहाल न करता फक्त प्रथम क्रमांकाचे रोख पारितोषिक बहाल करणेच उचित ठरले असते असे माझे प्रामाणिक आणि स्पष्ट मत आहे!

### लांछनास्पद प्रकार

अंतिम निर्णय जाहीर होतेवेळी मेडिकल कॉलेजच्या काही विद्यार्थ्यांनी संयोजकांचे नावाने केलेला शिवराळपणा आणि नंतर शाहूच्या विद्यार्थ्यांनी अंधाराचा फायदा घेऊन मेडिकलच्या विद्यार्थ्यांना मारहाण करण्याचा एकंदर प्रकार तथाकथित सुशिक्षित कलावंतांना कमीपणा आणणारा होता यात शंका नाही. दुसऱ्या कॉलेजचा प्रयोग चालू असताना अचकट-विचकट कोट्या करणे हा त्यातलाच प्रकार.

### असमान स्पर्धा

टिब टिब गृहस्थ हे कलोपासकचे क्रियाशील सदस्य असून ते व्यावसायिक दिग्दर्शक असून स्पर्धेतील काही प्रयोग (उदा. अंधारवाडा, जादूचा खेळ व विकणे आहे.) त्यांच्या मार्गदर्शनाखाली केले गेले. इतर काही विद्यार्थ्यांनी स्वप्रयत्नाने प्रयोग सादर केले. या एकंदर प्रकारामुळे असमान स्पर्धा होते. हा प्रकार नेहमीच होतो. याबद्दलच्या असंतोषाचा यंदा विकृत स्वरुपात स्फोट झाला. घडली ही गोष्ट गैर आहे हे खरे परंतु संयोजकांनी स्वत: याबाबत निष्कलंक राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे अशी प्रतिक्रिया ऐकू आली.

या बाबत प्रा. माधव वझे म्हणाले की या स्पर्धेत बाह्य दिग्दर्शकांनी नाक खुपसू नये आणि धंदेवाईक दिग्दर्शकांनी तर मुळीच खुपसू नये. विद्यार्थ्यांना स्वत:ची वाट स्वत:च शोधू द्यावी.

श्री. अनंत ओक : निकालाबाबतच्या नाराजीबाबत बोलताना श्री. ओक म्हणाले की, सर्व स्पर्धकांनी स्पर्धेतले सर्व प्रयोग लक्षपूर्वक पाहिले पाहिजेत. त्यामुळे इतरांचा दर्जा काय आहे व आपला काय होता हे लक्षात येते परंतु तसे न करता फक्त आपली एकांकिका पाहून आपला तो बाळ्या या न्यायानं आरडाओरडा करायला सुरवात होते हे फार गैर आहे.'

### स्पर्धकांच्या सूचना।

(१) प्रेक्षकांच्या पसंतीचाही विचार व्हावा.

(२) परिक्षकांशी चर्चा करण्याची संधी मिळावी.

(३) नेपथ्यासाठी दिलेला १५ मिनिटांचाच वेळ अपुरा असून पहिल्याप्रमाणे २० मिनिटांचाच असावा.

याबाबत उलट – सुलट प्रतिक्रिया ऐकू आल्या.

(४) स्पर्धेच्या सुरवातीला सर्व डीमर्स कार्यक्षम असतात. नंतर नंतर काही निकामी होतात. परंतु दुरुस्त केले जात नाही.

### करंडक विजेत्यांचे मनोगत

बृ. म. कॉमर्स कॉलेजने यंदा लागोपाठ दुसऱ्यांदा हा करंडक मिळवला म्हणून प्राचार्य डॉ. सी. जी. वैद्य आणि प्रा. अनिरुद्ध देशपांडे यांची मुलाखत घेतली ते म्हणाले,

१. आम्ही विद्यार्थ्यांना जरुर त्या सुविधा आणि उत्तेजन देतो. अधिकाधिक मुलांना संधी मिळावी म्हणून समूहनाट्याची निवड करतो. विद्यार्थ्यांना जागा-वेळ आणि आर्थिक पाठबळही पुरवतो. यंदाच्या प्रयोगासाठी सुमारे रु. १५०० खर्च केल्याचे प्रा. देशपांडे यांनी सांगितले. तसेच बाह्य दिग्दर्शकांना वाव देत नाही असे सांगितले.

अतुल टेंबे 'दिग्दर्शक' म्हणाले, कॉलेजने सुविधा आणि आर्थिक सहाय्य पुरविले, आम्ही मनापासून मेहेनत केली त्याचे फळ आम्हाला मिळाले.

### फॉलो अप होणे जरूर

स्पर्धा भरवणे हा या उपक्रमाचा पहिला भाग आहे. संयोजक तो चोखपणे पार पाडतात परंतु स्पर्धा संपल्यानंतर स्पर्धकांना स्वत:चे गुणदोष कळणे अत्यंत आवश्यक आहे. एखादा प्रयोग पहिला का आला किंवा एखादा प्रयोग अयशस्वी का झाला? या मागची कारणे कळणे अत्यंत जरूर आहे. त्यासाठी स्पर्धा संपल्यानंतर एक दिवसाचे शिबीर भरवून परिक्षकांचा समवेत चर्चासत्र घडवून आणणे अगत्याचे आहे. हा फॉलो अपचा उद्देश पूर्ण होऊ शकत नाही. संयोजक आणि संबंधित महाविद्यालये व विद्यार्थी या उपक्रमाला साथ देतील का?

—सुभाष देशपांडे

---

# इंटरवल....

---

### ◻ मुंबईची हवा

पाऊस थोडासा कमी झालाय.

नाटकवाल्यांची सुस्तीही कमी झालीय.

महानगरपालिकेच्या सौजन्याने उघडले (स्वर्गाचे खड्डयांचे) द्वार, ही जोरात चालू आहे.

बाबासाहेब भोसले ह्यांची तिसरी शक्तीही एनर्जी ढोसून तयार आहे.

एकूण काय
शुक्रतारा आहे.
मंद वारा आहे.
मुंबईची हवा मस्त आहे...

### ◻ सौजन्याची ॲलर्जी

गेल्या महिन्यात टिव्हीवर

वसंत सबनिसांचे सौजन्याची ऐशी तैशी हे नाटक दाखवले जाणार होते पण त्याऐवजी भटांचा 'नटसम्राट' दाखविला गेला.

आता सौजन्य रद्द झालं ते तुतारी
सॉरी तातारीच जाणोत.

विनायक वासकरांचे (काय घोळ आहे... चासकरांचे) दिवस सध्या त्यांच्या विझलेल्या चिरूटमधल्या उडून जाणाऱ्या राखेसारखे आलेले दिसतात.

दर्शकांना हसविणारं
निर्भेळ करमणूक करणारं

इनोदी नाटक दाखवायचा चासकरी सौजन्यविचार.

मटानही थाटामटात ( सॉरी माटात ) झलक झळकावली पण सुदैवाने दूर-दर्शनची लेक लाडकी या घरची

म्हणजे माशी सौजन्य सोडून शिंकली.

आता माशीच ती, शिंकणार नाही तर काय तुतारी वाजविणार ?

सौजन्य झालं की वो पटकनी रद्द
कारण काय तर

त्यातली वाक्य चावट आहेत, द्वयर्थी आहेत.

दूरदर्शनला एवढी सोवळ्याची ॲलर्जी कधीपासनची ?

## ¤ नयना आपटेचं (तांडव) नृत्य

राजकपूर के साथ नर्गिस
धरम के साथ हेम्मा
राजेश के साथ रिणा
तसेच
राजा गोसावी के साथ नयणा...

ह्या अता कसं...एकदम संजय दत्तनं अमिताभचं वाक्य त्याच्या स्टाइलमध्ये बोलल्यासारखं वाटतं.

नयना आपटे म्हणजे राजा गोसावी.

हे गॉसीपी समीकरण गॉसीपतज्ज्ञांनी आधीच सिद्ध केले आहेच.

तर ह्या नयनाबाई चक्क नाचल्या.
म्हणा ह्याआधी त्या

कधी तरी कुठे तरी, बावनखणीत गायल्या होत्या. ( अर्थात सुरेखच )

पण
आता त्यांनी

माया जाधव, जयश्री टी, उषा चव्हाण, उषा नाईक, संजीवनी बीडकर, मधु कांबीकर आदी नृत्यांगनांच्या पायावर पाय द्यायचं पक्कं केलेलं दिसतं.

अरुण होर्णेकर दिग्दर्शित कीचकवध नाटकात

नयनाबाईंनी दिलखेचक (ते आधीच खेचलय म्हणा) नृत्य पेश केलंय.

त्यावर

आमचा खात्रीचा डोअरकीपर म्हणतो
'राजाभाऊंचं राजमान्य राजश्रीचं प्रकरण

नयनाबाईंना समजलं आणि थेट नयनाबाईंनी (तांडव) नृत्य करायला सुरुवात केली.'

## ¤ 'कोण म्हणतो अमोल मोठा नाही म्हणून ?'

अमोल पालेकर हो, त्याला चक्क आमचे मराठी रसिक (?) म्हणतात.

'तो ऱ्याय
मोठा कुठाय ?'

चित्राच्या शब्दात(नव्हे घोगऱ्या स्वरात) बोलायचं तर-- हॅं...बॅवळटच आहेऽऽत'

अमोल काय बावळटाचे रोल करतो.

मामा आहे, काका आहे, चुलता आहे...

असं म्हणून चक्क मराठी लोक नंतर नंतर अमोलचे पिक्चर्स न बघता नावं ठेवू लागले.

म्हणून विचारा अमोल
रजनीगंधाची फुलं घेऊन
व्यावसायिक रंगभूमीवर आला.

जोडीला तेंडूलकरी मुखवटे.

पण तिथेही मराठी रसिक...पहिल्या प्रयोगाला गर्दीच नव्हती...

मराठी लोकंच ती

दूरदर्शनवर नाट्यावलोकन पाहिल्याशिवाय

हल्ली नाटकांना गर्दी थोडीच करतात

म्हणून जेव्हा अमोलचं नाट्यावलोकन झालं

तेव्हा मुखवटे धंद्याला लागले.

अमोलनं दुसरं नाटक घेतलं, तिसरही घेतलं.

'तर लोकं म्हणू लागली
हिंदीत मार्केट डाउन
मराठीत थिएटरचं बुकिंग डाउन

म्हणून शेवटी, अमोल म्हणतो, बघु या नाटकात जाऊन.

पण
लोकहो
खरं सांगतो.

श्रीदेवी शप्पथ की सितू स्मिता शप्पथ म्हणू ?

अमोलचं मार्केट डाउन नाही की काही नाही.

अमोल पालेकरला एवढं बावळट समजून त्याला

नावं ठेवायची, कमी लेखायचं काम नाही कारण...

कारण अमोल बुडत्याला काडीचा आधार होतोय.

गांगारलात ना...
खरं सांगतोय
हृषिकेश मुखर्जींच्या नव्या चित्रपटात
अमोल पालेकरबरोबर कोण
आहे, माहितीय का ?...
अहो, आपला अमिताभ बच्चन.
म्हणजे

आहे की नाही सुपरस्टार पदारून खाली येणाऱ्या

बुडत्याला अमोलचा आधार !
आता तरी त्याला मोठा म्हणा हो.

## ¤ रमेश देव आणि चमनगोटा

गेली कित्येक वर्षं रमेश आणि अर्थातच सीमा देव मराठी रंगभूमी-चित्रपटक्षेत्रात वावर वावर वावरताहेत. कधी चुकून ऐकलं नव्हतं की, मिस्टर देवांनी देवाचीही नजर लागेल असा देवाशपथ थोर अभिनय केलाय म्हणून. बऱ्याच वर्षांनंतर कर्ताकरवितामध्ये चांगलं काम केल्याचंही ऐकलं. म्हटलं, चला इतक्या वर्षांच्या मेहनतीचं सार्थक झालं !

त्या खुषीत असतानाच 'लाल बंगली' भडक लाल रंगासह ढिसूळ भिंती आणि अनेक आलतूफालतू कलाकारवीरांसह आली. दिग्दर्शक आत्मारामबापूंनी आधीच दिग्दर्शन करून त्यातला आत्माच काढून टाकला होता. उरला होता तो 'राम'. तो रामही प्रचाट अभिनय करणाऱ्यांनी अभिनयानं घालवून टाकला. सीमा, मर्यादा, जयंत सावरकरांनी (त्यातल्या त्यात) ही लाल बंगली उभी रहाण्यासाठी प्रयत्नांची परा आणि काष्ठा, दोन्ही केली; पण... पण... आधीच उल्हास त्यात फाल्गुनमास ;म्हणतात ना त्यातली गत ! रमेश देवनं अभिनय चांगला करता यावा म्हणून चक्क चमनगोटा केला ! (म्हणजे गोट्याचा 'विग' लावला.)

पण... पण शिवाजीमंदिरातली हवा हळूच कानात येऊन कुजबुजते की, "अरे गोटा लावा नाय तर हाती सोटा घ्या,

धोतर नेसा नाय तर तुमानी घाला,

लालबंगली करा नाय तर पिवळी हवेली करा, आडात असेल तर गोट्यात येणार ना? रमेश देवाच्या अभिनयात फरक थोडाच पडतोय ?

—नाटक्या

# नाट्यपंढरी



## □ ‘वन्समोअर’

अहो, केशव (केशवराव भोसले) शारदेत ‘मूर्तिमंत भीति उभी’ ला आठ आठ वन्समोर घेई. ‘बालगंधर्वाचं कोणतंच गाणं तीन-तीन चार-चार वन्समोअर घेतल्याशिवाय पुढे जात नसे’ असे कौतुकाचे उद्‌गार, रसिक वृद्ध मंडळींकडून नाटकाच्या गप्पा निघाल्या की अजूनही हमखास ऐकविले जातात. रंगभूमीचे वैभवपर्व पाहिलेल्या त्या मंडळीचे ते म्हणणे बरेचसे खरेही आहे.

पण हा ‘वन्समोअर’ मराठी रंगभूमीवर आला कसा? असे सांगतात की, संगीत रंगभूमी सुरू झाली, तेव्हा ब्रिटिश राजवट स्थिरावली होती. इंग्रजी नाटकात कर्टन कॉल ची पद्धत होती. इंग्लिश नटांची नाटके मुंबईत होत होती. त्याच पद्धतीवर साहेबाचे राज्य असल्याने, अधिकारीवर्गाने एखादे गाणे आवडले, नि कौतुकाने टाळी वाजविली की, साऱ्या थिएटरमधून कडकडून टाळ्या पडत. गाणारे पात्र ते गाणे पुन्हा गाऊ लागे. सहाजिक साऱ्या प्रेक्षकांना त्या गाण्याचा पुन्हा आनंद लुटायला मिळे. सुरुवातीला ही पद्धत फारशी रूढ नव्हती. कदाचित एखाद्या गाण्याला ‘वन्समोअर’ मिळे. पण पुढे पुढे हे ‘वन्समोअर’चे वेड (फॅड म्हणा हवे तर), इतके वाढले की, प्रत्येक ‘वन्समोअर’गणिक त्या त्या नटाला ते ते पद गावेच लागे. किंबहुना किती ‘वन्समोअर’ मिळाले यावरूनच त्या नटाची महति ठरू लागली. याच उपद्‌व्यापातून भाडोत्री ‘वन्समोअर’ देणाऱ्यांची योजना होऊ लागली. अर्थात बालगंधर्व, केशवराव, मा. दीनानाथ यांची गोष्टच वेगळी. त्यांच्या निखळ गाण्यामुळेच त्यांच्यावर ‘वन्समोअर’चा पाऊस पडे. गुजराथी रंगभूमीवर तर म्हणे, ज्याला अधिक ‘वन्समोअर’ पडत, त्याला त्या नटाला, पगाराखेरीज त्या भूमिकेबद्दल ‘बोनस’ रक्कम मिळत असे.

## □ ‘वन्समोअर’ अभिनयाला!

संगीत नाटकात वन्समोअर समजू शकतो. तिथे फक्त गाण्याचाच प्रश्न असतो. पण गद्य नाटकात अभिनयाला– प्रवेशाला, वन्समोअर कधी ऐकला आहे?

हो– हो– हो–! मुंबईत नटसम्राट गणपतराव जोश्यांचे मॅकबेथ’ (मानाजीराव) चालू होते. नटवर्य बाळाभाऊ जोग लेडी मॅकबेथ’ (दुर्गाबाई)च्या भूमिकेत होते. शाहूनगरवासी नाटक मंडळीच्या हॅम्लेट नाटिका सारखेच त्यांचे मॅकबेथही अत्यंत लोकप्रिय होते. पाचव्या अंकातला झोपेत चालण्याचा नि जागेपणी केलेल्या भयंकर कृत्यांची तोंडाने बडबड करण्याचा लेडी मॅकबेथचा प्रवेश, बाळाभाऊंनी इतका उत्कृष्ट वठविला अभिनयाची अशी उंची गाठली की, प्रेक्षकांनी कडकडून टाळी दिली ‘वन्समोअर’ ‘वन्समोअर’ ओरडत हा प्रवेश पुन्हा झालाच पाहिजे, म्हणून हट्टच धरून बसले. काही केले तरी ऐकेनात. शिट्ट्या, टाळ्या नि ओरडा चालूच होता.


तेव्हा मात्र गणपतराव, मॅकबेथचा मेकअप उतरून रंगमंचावर आले नि लोकांना आपल्या समयसूचक भाषणाने त्यांनी मंत्रमुग्ध केले. खरे म्हणजे, ते ‘वन्समोअर’ वरचे थोडक्यात भाष्यच होते.

‘प्रेक्षकबंधूनो, आमच्या बाळाभाऊंनी प्रवेश उत्तम केला. तुम्हाला आवडला, तुम्ही टाळी देऊन आनंद व्यक्त केलात. येथपर्यंत हे सर्व ठीक झाले, पण तो सर्वच्या सर्व प्रसंग पुन्हा कसा दाखविता येणार? देव कुठलीही गोष्ट एकदाच करतो नाही का? आपण मोठे झालो की बाळपणीचा आनंद लुटता येतो का? लहान होता येते का? सूर्य उगवून माध्यान्हीला आला की, पुन्हा प्रातःकाळची सूर्योदयाची शोभा आपण पाहू शकतो का? तसेच आमच्या नाटकाचे आहे. जे होऊन गेले, घडून गेले ते पुन्हा नाही होणार. हं! आता संगीत नाटकात पदे पुन्हा पुन्हा म्हणतात! पण तो त्यांचा संगीत नाटकवाल्यांचा प्रश्न आहे. पण त्या बाबतीतही मी स्पष्टपणे म्हणेन की, गाण्यालाही ‘वन्समोअर’ स्वीकारू नये. त्यामुळे खेळाला खीळ बसते. आता अजूनही, बाळाभाऊंचा तो प्रवेश पाहण्याचा तुमचा हट्टच असेल तर तो पुरवायला मी तयार आहे. आता रात्रीचा दोनचा सुमार झाला आहे. मी आत जातो. मानाजीराव (मॅक बेथ) होतो, नि प्रयोग पुन्हा पहिल्यापासून सुरू करतो. म्हणजे तुम्हाला हवा असलेला प्रवेश पुन्हा पहाता येईल. आहे बसायची तयारी?’

सहाजिकच लोक चाट पडले नि नाटक पुढे सुरू झाले.

## □ खास–कुलीन स्त्रियांसाठी

आजच्या नाटकांचे शेकडयांनी प्रयोग होतात; पण एखाद्या नाटकाचे ‘खास स्त्रियांकरता’ प्रयोग झाल्याचे ऐकिवात नाही. ते भाग्य फक्त सौभद्रालाच लाभले. तेसुद्धा अण्णांच्या हयातीतच. पुण्या–मुंबईच्या स्त्रियांनी, आग्रह केल्याने ‘किर्लोस्कर मंडळी’ असे प्रयोग अधूनमधून करीत असे. नारायणराव बालगंधर्व, नेहमी म्हणत असत, देवा, आपल्या मायबहिणींना नाटक आवडायला हवे. त्यांना आवडले, की त्या आपले पतिराज, दीर, नणंदा, जावा अशा सगळ्या कुटुंबाला पुन्हा पुन्हा खेळासाठी आणतात, खरं ना?’ मला वाटते, नाटकाच्या यशाची ही खूणगाठ, बालगंधर्वांनी त्यांच्या पूर्वसूरींनी पाडलेल्या खास सौभद्राच्या पायंड्यातच असावी!



MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage–No. 11 ) Regd. No. PNCW–28



विसाव्या शतकाच्या शेवटाकडे प्रौढ झालेल्या
पिढीतल्या मध्यमवर्गीय स्त्री–पुरुषांची ही
संसारचित्रं दीर्घकाळ टवटवीत राहतील, ती
निर्विष नर्मविनोद आणि
प्रातिनिधिक चित्रणामुळं.

**काही दिवस श्यामचे**
**काही राधाचे**

लेखक
फिरोझ रानडे

पहिली आवृत्ती

: मूल्य :
पंचवीस रुपये

राजहंस प्रकाशन